# मुक्तेश्वरकृत महाभारत

## आदिपर्व ( खंड तिसरा )

संपादक
**अनंत काकबा प्रियोळकर**
डायरेक्टर, मराठी संशोधनमंडळ

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १४८०

मुंबई सरकार आणि मुंबई व पुणें विद्यापीठ यांच्या आश्रयाखालीं

REFBK-0009093

मुंबई
मराठी संशोधनमंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाकुरद्वार, मुंबई २.

१९५६

# मुक्तेश्वरकृत महाभारत

## आदिपर्व ( खंड तिसरा )

संपादक

अनंत काकबा प्रियोळकर

डायरेक्टर, मराठी संशोधनमंडळ

दा. क्र.

REFBK-0009093

मुंबई सरकार आणि मुंबई व पुणें विद्यापीठ यांच्या आश्रयाखालीं

मुंबई

मराठी संशोधनमंडळ,

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाकुरद्वार, मुंबई २.

१९५६

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | प्राक्कथन ... ... ... ... | ३—६ |
| २. | मुक्तेश्वर ... ... ... ... | ७—१४ |
| ३. | तिसऱ्या खंडांतील कथाभाग ... ... ... | १६ |
| ४. | आदिपर्व ( अ. २६—३८ ) ... ... ... | ५४७—८२३ |
| ५. | शब्दकोश ... ... ... | १—९ |
| ६. | शुद्धिपत्र ... ... ... | ११—१२ |


★

किंमत पांच रुपये


मुद्रक—के. एल. एन. राव

मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीज बिल्डिंग, मुंबई नं. ४.

प्रकाशक—अ. का. प्रियोळकर

डायरेक्टर, मराठी संशोधनमंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई नं. २.

# प्राक्कथन

मुक्तेश्वरी आदिपर्वाच्या पहिल्या खंडांत पाठचिकित्सेची आमची साधनसामुग्री, संपादकीय धोरण आणि मुक्तेश्वरासंबंधीं सुचलेले विचार विस्तारपूर्वक मांडिले आहेत. या खंडांत त्यांची पुनरावृत्ति करण्याची वस्तुतः आवश्यकता नव्हती; परंतु निरनिराळ्या विद्यापीठांमध्यें वरिष्ठ वर्गांना पाठ्यपुस्तक म्हणूनही याचा उपयोग व्हावयाचा असल्यामुळें, प्रत्येक खंडाला स्वयंपूर्णता लाभावी म्हणून कांहीं प्राध्यापकमित्रांच्या सूचनेवरून या तिसऱ्या खंडामध्येंही जुनी माहिती कमीजास्त करून निराळ्या स्वरूपांत थोडक्यांत पुनः छापीत आहोंत.

पाठचिकित्सेला विद्यापीठाच्या शिक्षणक्रमांत महत्त्व दिलें जात नाहीं, असें कळतें. तरीपण त्यासंबंधीं या खंडांतही दोन शब्द लिहिणें अवश्य वाटतें. विशेष माहितीकरितां जिज्ञासू विद्यार्थ्यांनीं आदिपर्वाचा पहिला खंड आणि रघुनाथ पंडिताच्या दमयंतीस्वयंवराची आम्हीं संपादिलेली प्रत पहावी.

पहिल्या खंडाच्या प्रकाशनापूर्वी आम्हांला आदिपर्वाच्या एकंदर एकोणतीस हस्तलिखित प्रती मिळाल्या होत्या. त्यांपैकीं बऱ्याचशा हस्तलिखितांच्या बाराही अध्यायांची व कांहींच्या कांहीं अध्यायांची पाठनोंदणी केली, आणि निर्णयसागरची काव्यसंग्रह छापील प्रत Vulgate कल्पून वरील हस्तलिखितांपैकीं प्रातिनिधिक व निर्दिष्टकाल अशीं अकरा निवडून त्यांच्या आधारानें पहिल्या खंडांतील बारा अध्यायांची संहिता निश्चित केली. त्यानंतर हस्तलिखितांच्या शोधार्थ आम्हीं पुष्कळ प्रवास केला. उज्जैन, कोल्हापूर, हुबळी, अलिबाग, नांदेड, परभणी वगैरे भागांतील आणखी वीसवर हस्तलिखितें पहावयास मिळालीं. परंतु पाठदृष्ट्या तपासणी करतां त्यांचें विशेष महत्त्व न वाटल्यामुळें पहिल्या खंडाकरितां उपयोग केलेल्या प्रतींचाच या तिसऱ्या खंडाच्या तेरा अध्यायांच्या कामीं उपयोग करण्यांत आला आहे. त्यांची बोधाक्षरांसह (Sigla) थोडक्यांत खालीं माहिती देतों.

---

१ Vulgate याचा अर्थ सध्यां लोकांसमोर असलेली एकाद्या ग्रंथाची संहिता असा आहे. ही संज्ञा प्रथम चवथ्या शतकामध्यें तयार झालेल्या लॅटिन बायबलाला लावण्यांत आली; पण सांप्रत हा शब्द कोणत्याही ग्रंथाच्या सर्वसंमत संहितेला (accepted form of a text) लावण्यांत येतो. याच्या उलट, शुद्ध केलेल्या संहितेला critical text (चिकित्सापूर्ण किंवा संशोधित संहिता) असें म्हणण्याचा प्रघात आहे. एकाद्या जुन्या ग्रंथाचें संशोधन करतांना प्रथम ही लोकांपुढें असलेली सर्वसंमत संहिता (Vulgate) मूळ धरून त्याच्याखालीं निरनिराळ्या हस्तलिखितांतील पाठांची नोंदणी करण्यांत येते, व अशा प्रकारें संशोधित संहिता निर्माण होते.

## छापील प्रती

( १ ) **नि**--काव्यसंग्रहमालेंत वा. दा. ओक यांनीं संपादिलेली **नि**र्णयसागरप्रत ( Vulgate ), मुंबई १८९३.

( २ ) **स**—माधव चंद्रोबा यांनीं संपादिलेली **स**र्वसंग्रहप्रत, मुंबई १८६५.

## हस्तलिखितें

( १ ) **औं**—कै. श्री. भवानराव पंडितप्रतिनिधि, **औं**ध, यांजकडून मिळालेली पोथी. लेखनकाल श. १६९२.

( २ ) **ख**—'**ख**ट्वांगग्रामीं समाप्त' केलेली पोथी. लेखनकाल श. १६८१.

( ३ ) **गो**—**गो**मंतकांत कै. व्यंकटेश शां. दळवी यांजकडून मिळालेली पोथी.

( ४ ) **गो** २—**गो**मंतकांतील दुसरी पोथी रा. गावणेकर यांजकडून मिळालेली.

( ५ ) **तं** **तं**जावर येथील सरस्वतीमहाल ग्रंथसंग्रहालयांतील क्रमांक १३७२ ची पोथी.

( ६ ) **धु**—**धु**ळें येथील श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांतील क्रमांक ९६० ची पोथी. लेखनकाल श. १६७६.

( ७ ) **नां**—**नां**देडचे श्री. वि. अं. कानोले यांजकडून मिळालेली प्रत. लेखनकाल श. १६७४.

( ८ ) **पु**—**पु**णें भारत इतिहास-संशोधकमंडळांतील ना. य. मिरीकर हस्तलिखितसंग्रह नं. १७६/१३ पोथी. लेखनकाल श. १६८४.

( ९ ) **पु**·४—पुणें येथील डेक्कन कॉलेज पोस्ट-ग्रॅज्युएट ॲंड रिसर्च इंस्टिट्यूटमधील पोथी. A. N. 6862. श. १६८८.


(१०) **मुं**—मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयांतील पोथी.

(११) **रा**—राजापूर संस्कृत पाठशाळेंतून पं. रघुनाथ कृष्णशास्त्री पाटणकर यांजकडून मिळालेली पोथी. लेखनकाल श. १७०६.

या ज्या वर मुख्य आधारभूत प्रती दिल्या आहेत त्यांचा परस्परसंबंध काय आहे. तें पहाः—

**नि** प्रत **स** वर आधारलेली असून तिच्यामध्यें पुष्कळ फेरफार केलेले आहेत.

वरील हस्तलिखितांचे त्यांच्या परस्पर साम्यावरून दोन वर्ग पाडतां येतील :



वरील पहिल्या वर्गाला **ख** वर्ग असें नांव दिलें आहे. यापैकीं दुसऱ्या वर्गांतील पाठ जास्त शुद्ध व ग्राह्य आहेत.

अर्थाच्या दृष्टीनें सुबोध, काव्याच्या दृष्टीनें सरस व आजच्या व्याकरणाच्या कल्पनांप्रमाणें शुद्ध असा जो पाठ तो **बरा** ही आपली कल्पना; परंतु हस्तलिखितांच्या पुराव्यावरून जो पाठ कवीच्या हातचा किंवा त्याच्या काळचा असें ठरेल, तोच पाठ **खरा.** '**बरा**' आणि '**खरा**' यांच्यामधील हा फरक अवश्य लक्षांत ठेवण्यासारखा आहे. पाठसंशोधनामध्यें '**बऱ्या**' पेक्षां '**खरा**' पाठच शुद्ध किंवा ग्राह्य मानावयाचा असतो. एकाद्या कुरूप बाईच्या फोटोमध्यें फरक करून चित्रकाराला तिला अप्सरा बनवितां येईल. हें त्या बाईचें रूप '**बरें**' (सौंदर्याच्या दृष्टीनें) होईल; परंतु '**खरें**' राहणार नाहीं. पाठसंशोधनालाही हाच नियम लागू आहे. एकाद्या कवीच्या काव्यांत असे बदल केल्यास तें काव्य त्या कवीचें म्हणतां येणार नाहीं. जुना **खरा** पाठ अपरिचित, दुर्बोध व आजच्या लेखनपद्धतीला किंवा आजच्या व्याकरणाला धरून नाहीं म्हणून तो बदलणें अशास्त्रीय आहे. ही गोष्ट पुष्कळशा जुन्या लोकांना माहीत नसल्यामुळें जुन्या ग्रंथांच्या संहितांना आज अशुद्ध व भिन्न स्वरूप प्राप्त झालें आहे. काव्यसंग्रहप्रतींत असे पुष्कळ संस्कार केलेले आहेत. लेखनपद्धतीसंबंधीं आम्हीं स्वीकारलेल्या मार्गाचें साधार विवेचन पहिल्या खंडाच्या प्राक्कथनांत केलेलें आहे, तें वाचकांनीं जरूर पाहावें.

आपल्यापुढें असलेल्या संस्कृत महाभारताच्या नीळकंठी संहितेला धरून जे मुक्तेश्वरी महाभारतांत पाठ नाहींत ते अशुद्ध असेंही म्हणण्याची कांहीं लोकांची प्रवृत्ति आहे. **नि** म्हणजे 'काव्यसंग्रह'प्रतींत तर असे बरेच बदल करण्यांत आलेले दिसतात. संस्कृत महाभारताच्या निरनिराळ्या पोथ्यांमध्येंही विलक्षण पाठांतरें असतात. आपल्यापुढें असलेलीच महाभारताची संहिता मुक्तेश्वरापुढें होती, असें मानणें चुकीचें होईल.

वरील धोरण लक्षांत ठेविलें म्हणजे आदिपर्वाची पुढील संहिता वाचतांना वाचकाला गोंधळल्यासारखें होणार नाहीं.

पाठांतरें देतांना निरनिराळ्या हस्तलिखितांचीं बोधाक्षरें वर दिलेलींच आहेत. पु पु४ किंवा गो गो२ अशा दोन हस्तलिखितांत एकच पाठ असल्यास तीं अनुक्रमें पु·४ व गो·२ अशीं दाखविलीं आहेत. (+) खूण आहे तो अधिक पाठ व (–) खूण आहे तो कमी पाठ समजावा. कसरींनें खाल्ल्यामुळें किंवा अन्य कारणानें एकादा पाठ दुर्वाच्य किंवा नष्ट झाला असल्यास तो (× ×) अशी खूण दाखवून निर्दिष्ट केला आहे, प्रक्षिप्त वाटलेल्या ओव्या तळटीपांत पाठांतरांबरोबर दाखविलेल्या आहेत. **प्रसंप्रा** याचा अर्थ 'प्रस्थापित संहितेप्रमाणें' असा समजावा.

जीं अशुद्धें लक्षांत आलीं त्यांचें शुद्धिपत्रक या पुस्तकाच्या शेवटीं जोडिलें आहे. पुस्तक वाचण्यास आरंभ करण्यापूर्वीं शुद्धिपत्राप्रमाणें त्याची दुरुस्ती करून घ्यावी, अशी विनंति आहे.

अशा संशोधनाला मनाची एकाग्रता व बारीक सारीक तपशिलांत शिरण्यास भरपूर सवड व स्वास्थ्य पाहिजे. इतर जबाबदाऱ्या सांभाळून आहे त्या परिस्थितींत जें करतां आलें तें यथाशक्ति व यथामति केलेलें आहे. तें अगदीं निर्दोष आहे किंवा अखेरचें आहे असा आमचा मुळींच दावा नाहीं. कै. डॉ. वि. स. सुखटणकर यांच्यासारख्या विद्वानांनीं आपल्या संस्कृत महाभारताच्या पहिल्या खंडाच्या ( १९२७ ) प्रस्तावनेंत काढलेले उद्गार आम्हीं आदिपर्वाच्या मागच्या खंडांत उद्धृत केले होते तेच पुनः येथें देतों—

"......that in these circumstances the editor will occasionally make mistakes–at times perhaps gross mistakes–is as certain as inevitable; for it is to be feared that there is no royal road to success in this incomparably difficult field... More than one attempt will probably have to be made before the ideal is attained. It will, therefore, be prudent not to expect too much from the *first* critical edition, nor to claim too much for it."

या ग्रंथाच्या शेवटीं जो शब्दकोश जोडला आहे तो सर्वसामान्य वाचकाच्या उपयोगाकरितां आहे. विद्यार्थ्यांनीं या आयत्या कोशावर अवलंबून न रहातां स्वतःच योग्य प्रतिशब्द शोधून स्वतंत्रपणें अर्थ लावण्याचा प्रयत्न करावा.

## आभार

आदिपर्वाच्या प्रस्तुत तृतीय खंडाच्या प्रकाशनाला मुंबई विद्यापीठानें ७५० आणि पुणें विद्यापीठानें २०० रुपयांची देणगी दिली, याबद्दल आम्ही या दोन्ही विद्यापीठांचे आभारी आहोंत.

मुंबई सरकार आणि मुंबई व पुणें विद्यापीठांप्रमाणेंच मराठी भाषिकांचीं जीं इतर सरकारें व विद्यापीठें आहेत त्यांच्याकडूनही मराठी संशोधनमंडळाला मदत मिळणें योग्य आहे. मराठी संशोधनमंडळाचें कार्यालय जरी मुंबई शहरांत असलें, तरी पण तें करीत असलेलें कार्य साऱ्या मराठी भाषिकांकरितां आहे. बृहन्महाराष्ट्रांतील इतर संस्थांनीं व व्यक्तींनींही या कार्याला आपल्या शक्त्यनुसार हातभार लावणें त्यांचें कर्तव्यच ठरतें. हें आपलें कर्तव्य जर सर्वांनीं जाणलें तर मुक्तेश्वराचीं उपलब्ध पांचही पर्वें शुद्ध स्वरूपांत आम्ही प्रसिद्ध करूंच, परंतु इतर कवींचीं पुढील पर्वें त्यांना जोडून 'चक्री महाभारत' महाराष्ट्राला सादर करणें आम्हांला शक्य होईल. याशिवाय कितीतरी अप्रकाशित ग्रंथांचें प्रसिद्धीकरण व द्रव्याच्या अभावीं अडून राहिलेले आमचे इतर बहुसंख्य संकल्प आम्हांला तडीस नेतां येतील.

१० मार्च १९५६ **अ. का. प्रियोळकर**

# मुक्तेश्वर

कवि या दृष्टीनें जुन्या मराठी वाङ्मयांत मुक्तेश्वराचें स्थान पहिलें आहे, ही गोष्ट त्याच्याविषयीं जुन्या नव्या पंडितांनीं जे उद्गार काढले आहेत, त्यांच्यावरून स्पष्ट दिसून येते.[1] मुक्तेश्वर हा जरी 'लोकोत्तर' कवि असला तरी त्याच्यासंबंधीं वयक्तिक माहिती असावी तितकी उपलब्ध नाहीं. युरोपांत तेथील अत्यंत जुन्या कवींच्याही चरित्रावर नवा प्रकाश पाडणारे समकालीन कागदपत्र मिळूं शकतात. फार काय, मुक्तेश्वराच्याही पूर्वीचा, आपल्या मराठीचा इंग्रज कवि, तोमास स्टीफन्स, याचीं स्वाक्षरीसह दोन अस्सल नवीं पत्र अलिकडेच रोम येथें उपलब्ध झालीं आहेत.[2] आपल्या इकडील जुन्या महाराष्ट्रीय मराठी कवींची स्वाक्षरी सोडाच; परंतु मोरोपंतासारखा एकादा अलिकडचा कवि वगळला तर खात्रीलायक म्हणतां येण्यासारखें त्यांचें हस्ताक्षरही उपलब्ध नाहीं !

ज्यांच्याभोवतीं भाविकतेचें वलय असतें अशा संतकवींचा संप्रदाय निर्माण होतो, व त्यांच्या शिष्यप्रशिष्यांमुळें चमत्कारपूर्ण कां होईना, खरीखोटी अतिशयोक्तीची माहिती जमा होते व ती मागें राहूं शकते. मुक्तेश्वर हा संतकवि नसून कलाकवि आहे. त्यामुळें अशाप्रकारें त्याची विशेष माहिती सांपडत नाहीं. तरीपण समाधानाची गोष्ट ही कीं, त्यानें आपल्या ग्रंथांमध्यें स्वतःसंबंधीं माहिती मधून मधून नमूद करून ठेवलेली आहे. पण त्याचें वाङ्मय शुद्ध स्वरूपांत आपल्यापुढें नसल्यामुळें अपपाठांनीं माहितीला क्वचित् विकृत स्वरूप प्राप्त झालें असून त्यापासून भलतेच समज पुढें आले. मुक्तेश्वराच्याच शब्दांत मुक्तेश्वर आपणास कसा दिसतो हें आतां पाहूं :—

१. मुक्तेश्वर हा एकनाथाच्या मुलीचा मुलगा होता :—

**मातृजनक** जनार्दनी । **येकनाथ** नमियेला ॥

— आदि० अ. १, ७७.

गुरु म्हणूनही त्यानें एकनाथाचा निर्देश केला आहे :—

मुक्तेश्वरें **एकनाथु** । यातें साष्टांग प्रणिपातु ।<br>**गुरुस्वरूप** म्हणोनि हेतु । ग्रंथारंभीं वंदावा ॥

— वन० उपोद्घात.

२. त्याचें वास्तव्यस्थान गोदावरीचा कांठ, गोत्र अत्रि, वडिलांचें नांव चिंतामणि व स्वतःचें मूळ वैयक्तिक नांव मुद्गल असें होतें :—

१. आदिपर्वाच्या पहिल्या खंडाच्या आरंभीं जोडलेला 'श्रीमुक्तेश्वराचा शोध' हा निबंध पहा. पृ. १–४.

२. अन्नमलाईनगर ( मद्रास ) येथें सर राधा कृष्णन् यांच्या अध्यक्षतेखालीं गेल्या डिसेंबरमध्यें भरलेल्या अखिलभारतीय प्राच्यपरिषदेपुढें आम्हीं या पत्रांसंबंधीं इतिहास-विभागांत एक निबंध वाचला.

सुचिरसहजवासें **गौतमीच्या तटाकीं** ।
अतुट भजनपंथें पंथ टाकीत टांकी ।
द्विजवर कवि**नामा मुद्गल अत्रिगोत्रीं** ।
— रामायण, ( युद्धकांड ) ४७.

प्रसिद्ध महाराष्ट्रदेशीं । **गोदावरीतट**निवासी ।
**अत्रिगोत्र** पवित्रवंशीं । जन्म जाहला जयातें ।
तो **चिंतामणिभूदेवकुमर** । दत्तांघ्रिपद्मभ्रमर ।
श्रोतयां विनवी मुक्तेश्वर ।
— आदि० ( उपसंहार ).

**गोदावरीतटनिवासी** । **अत्रिगोत्री** पवित्र ऋषी ।
**चिंतामणि** गुणैकरासीं— । पासाव जन्म जयाचा ॥
तो **मुद्गल चिंतामणिसुत** । **लीलाविश्वंभरा**नुग्रहीत ।
व्यासभारतींचा अर्थ । महाराष्ट्र बोलिला ॥
— सभा० ( उपसंहार ).

'मुक्तेश्वर' हें मुद्रानाम आपल्या आराध्यदेवतेच्या नांवावरून भारत रचतांना त्यानें धारण केलें.

मुक्तेश्वर आपल्या आईचें नांव कोठेंही नमूद करीत नाहीं. महीपतीनें भक्तिविजयांत (अ. २३) **गोदावरी** ही एकनाथाची कन्या व चिंतोपंताची वायको म्हटलें आहे. ग्रंथमालेंत ( सप्टेंबर १९०२ ) प्रसिद्ध झालेल्या ता. २२ जुलै १७२७ व ३ मे १७५९ च्या कोल्हापुरच्या छत्रपतीच्या सनदांत मुक्तेश्वराच्या आईचा उल्लेख **गंगा** असा केलेला आहे. राजवाडे म्हणतात तसें **गोदावरी** हें तिचें माहेरचें नांव आणि **गंगा** हें सासरचें नांव असेल; किंवा गोदावरी नदीलाच गंगा हें दुसरें नांव प्रचारांत असल्यामुळें गोदावरीबद्दल गंगा असाही नांवाचा घोंटाळा झाला असणें शक्य आहे. " मुक्तेश्वरानें आपल्या मातापितरांच्या नांवाचा निर्देश 'लीला-विश्वंभर' या सामासिक पदानें केला आहे, " असें काव्यसंग्रहकार ठिकठिकाणीं म्हणतात तें आम्हांला मान्य नाहीं. 'लीलाविश्वंभर' हें त्याच्या आराध्यदेवतेचें म्हणजे दत्तात्रयाचें नांव आहे.

३. कोल्हापुरची महालक्ष्मी व सोनारीचा भैरव या मुक्तेश्वराच्या कुलदेवता:—

करवीर**लक्ष्मी** विष्णुभाजा । **भैरव** सुवर्णपुरींचा राजा ।
उभय कुळदैवतीं माझा । मस्तक पायीं स्पर्शिला ॥ —आदि० ( उपसंहार ).

नमूं करवीरनिवासिनी । जे **महालक्ष्मी** विश्वजननी ।
वंदूं **सोनारी भैरव** । तेणें दिधला हा गौरव । —सभा० ( मंगलाचरण ).

या आपल्या कुलदेवतांच्या आरत्याही मुक्तेश्वरानें लिहिलेल्या उपलब्ध आहेत.

४. 'मुक्तेश्वर' हें या कवीच्या आराध्यदेवतेचें नांव आहे. मुक्तेश्वर म्हणजे शिवस्वरूपी दत्तात्रय. त्यालाच तो विश्वंभर किंवा लीलाविश्वंभर याही नांवानें संबोधतो :—

(१) देवतात्मक मुक्तेश्वराचे निर्देश पहाः—

कवतुकें वदेल कवींची वाणी । **मुक्तेश्वरप्रसादें** । —आदि० १–१९३.

कवि **मुक्तेश्वर शूलपाणी** । त्याचेनि प्रसादें हे वाणी ।
सुखी करो श्रोतियां ॥—आदि० ४–१८८.

**मुक्तेश्वरप्रसादें** ह्मणे । कविकिंकर आवडी ।—आदि० ५–१३१.

**मुक्तेश्वर अवधूतमूर्ती** । तत्प्रसादें श्रोतयांप्रती । कविकिंकर अनुवादे ॥
—आदि० १३–१२९.

(२) मुक्तेश्वर म्हणजेच लीलाविश्वंभर :—

आदिकवीचा आदिगुरु । विश्वेश **लीलाविश्वंभरू**
भक्तिशक्ती **मुक्तेश्वरु** । वाक्यपुष्पीं अर्चिजे ॥ —आदि० १४–१६६.

परेश **लीलाविश्वंभरू** । **मुक्तीश**वाणी **मुक्तेश्वरु** ।
वदेल तेथें प्रेमादरु । सज्जनीं केला पाहिजे ॥ —आदि० २१–८८.

(३) लीलाविश्वंभर म्हणजेच दत्तात्रेय :—

विश्वेश **लीलाविश्वंभरू** । **दत्तात्रय** जगद्गुरु ।
तत्प्रसादें मुक्तेश्वरु । निरोपी तें परिसावें ॥— आदि० २६–१२२.

चिन्मूर्ति **लीलाविश्वंभरू** । **दत्तात्रय** जगद्गुरु ।
त्याचेनि नामें मुक्तेश्वरू । कथा बोले भारती ॥— आदि० ३३–३८.

**लीलाविश्वंभर** स्वामिया । **दत्तात्रय** जगदात्मया ।
मनोभावें वंदूनि पाया । मुक्तेश्वर अनुवादे ॥— आदि० ४६–१०१.

**लीलाविश्वंभर** ईश्वरु । **दत्तात्रेय** जगद्गुरु ।
ज्याचेनि नामें भवसागरु । मागां तरले असंख्य ॥— सभा० १–६.

ॐ नमो जी **विश्वंभरु** । तो देव **दत्तात्रय** जगद्गुरु ।
जनार्दना अभयकरु । कटाक्षेंशीं बाणला ॥— एकनाथचरित्र.

वरील ओव्यांवरून लीलाविश्वंभर म्हणजे मुक्तेश्वराचीं मातापितरें नसून तो कोण आहे तें सहज कळून येईल.

५. विश्वंभर किंवा लीलाविश्वंभर याचा गुरु म्हणूनही हा कवि निर्देश करतो :—

विश्वंभर**गुरु**प्रसादें । मुक्तेश वदे आरुषशब्दें ।—आदि० ९–९७.

पवित्र मुक्तेश्वराचें वदन । विश्वंभर **गुरु**नामें ।—सभा० १४–१७१.

विश्वंभरश्री**गुरु**च्या प्रसादें । आनंदवाचा वदलों विनोदें ।—रामायण.

लीलाविश्वंभर **गुरु**चरणीं । पुष्पांजली वचनसुमनीं ।
मुक्तेश्वरें अर्पूनी मनीं । कृतकृत्यता मानिली ॥—वन० उपसंहार.

लीला ही मुक्तेश्वराची आई व विश्वंभर हा त्याच्या बाप ह्या कल्पनेला जरी काव्य-संग्रहकार, राजवाडे, पांगारकर वगैरेनीं उचलून धरलें असलें तरी बाळकृष्ण अनंत भिडे व दा. के. ओक यांनीं ती त्याज्य ठरविली आहे. परंतु विश्वंभरबोवा नांवाचा कवीचा मानवी गुरु होता, अशी त्यांची समजूत झालेली दिसते. वास्तविक आराध्यदेवतेलाच मुक्तेश्वर गुरुस्वरूप मानतो. पहा:—

मुक्तेश्वराचा **श्रीगुरु** । **दत्तात्रय** हा अवतारु ।।—सभा० ८–१६८.
शक्रविधिच्या मस्तकीं । ज्याची पादुका मिरवे निकी ।
तो **विश्वंभर गुरु पिनाकी** । विष्णु आपण विश्वात्मा ।।–विराट० ८–१२१.
**सद्गुरुपांडुरंग**चरणीं । स्पर्शों आली प्रवाहें ।।— आदि० ३२–१०४.
लीलाविश्वंभर **सद्गुरु** । सकळ सिद्धांचे ईश्वरु ।— आदि० ४८–११६.
मुक्तेश्वराचा श्रीगुरु । **दत्तात्रय** परब्रह्म अवतारु ।–हनुमंताख्यान.

सभापर्वाच्या अखेरीला काव्यसंग्रहादि जुन्या प्रतींच्या शेवटीं असलेल्या

तो मुद्गल चिंतामणिसुत । **लीलाविश्वंभर जगविख्यात** ।
व्यासभारतींचा अर्थ । महाराष्ट्र बोलिला ।।

या ओवींतील दुसऱ्या चरणांतील अर्थहीन **अप**पाठामुळें पुष्कळांचा चिंतामणि म्हणजेच लीलाविश्वंभर असा चुकीचा समज झाला. वास्तविक विश्वसनीय अशा सभा-पर्वाच्या अनेक हस्तलिखितांमध्यें 'लीलाविश्वंभर जगविख्यात' या चरणाऐवजीं **लीलाविश्वंभरानुग्रहीत** । असा चरण आहे आणि तोच खरा पाठ आहे. 'लीलाविश्वंभरानुग्रहीत' असें या कवीनें स्वतः अन्यत्रही ठिकठिकाणीं म्हटलें आहे. ( सभा० २–१३३, वन० १–१६०, ४–१६२ ).

६. एकनाथाचा गुरु जनार्दनस्वामी हा दत्तोपासक होता व त्याचाच सांप्रदाय एकनाथ व मुक्तेश्वर यांनीं पुढें चालविला :—

'एकनाथचरित्रा'च्या आरंभीं मुक्तेश्वर म्हणतो,

ॐ नमो जी विश्वंभरु । तो देव **दत्तात्रय** जगद्गुरु ।
जनार्दना अभयकरु । कटाक्षेंशीं बाणला ।।

आणि शेवटीं लिहितो,

एका जनार्दनीं स्वार्थ । मुक्तेश्वराचा मुख्य परमार्थ ।
धरूनि मूळचें सूत्र । लीलाविश्वंभर म्हणविलें ।।

आपणास 'श्रीदत्तांघ्रिपद्मभ्रमर' असें मुक्तेश्वरानें ठिकठिकाणीं म्हणविलें आहे.
( आदि० ८–९२, ११–१७१ )

एकनाथमुक्तेश्वराचा दत्तात्रयपंथ म्हणजेच अवधूतपंथ असावा. अवधूतपंथ हा नाथ-पंथाचीच एक शाखा असून त्याचा संस्थापक गोरक्षनाथ होता, असें कै. सरदार ना. य. मिरीकर लिहितात.[3] एकनाथानें आपल्या एका अभंगांत ( २०२ ) 'आत्रिनाथ दीनानाथ

---

३ **श्री ज्ञानेश्वरदर्शन**, भा. १, अहमदनगर, १९३४. पृ. ५०.

ब्रह्मरूप दत्तगुरु ।' असें म्हटलें आहे. 'नारायण विधि अत्रिनाथ । दत्त जनार्दन एकनाथ' ही परंपरा सांगणारा एकनाथांचा दुसरा एक अभंग[४] आहे :—

जो निर्गुण निराभास । जेथून उद्भव शबल ब्रह्मास ।
आदिनारायण ह्मणती ज्यास । तो आदिगुरु सर्वांस ॥ १ ॥

तयाचा ब्रह्मा अनुगृहीत । ब्रह्मा अत्रीस उपदेशीत ।
अत्रीपाद प्रसादीत । **श्रीदत्तात्रेय अवधूत** ॥ २ ॥

दत्तात्रेय परंपरा । सहस्रार्जुन यदु दुसरा ।
जनार्दन शिष्य तिसरा । केला कलीयुगीं खरा ॥ ३ ॥

जनार्दनकृपेस्तव जाण । समूळ निरसलें भवबंधन ।
एका जनार्दना शरण । झाली परंपरा संपूर्ण ॥ ४ ॥

मुक्तेश्वरानें एकनाथाचा गुरु म्हणून निर्देश केल्याचा उल्लेख वर आलाच आहे. मुक्तेश्वराच्या आदिपर्वाच्या संशोधित प्रतीमध्यें दोन ठिकाणीं '**मुक्तिनाथ**' असा अध्यायाच्या शेवटास पाठ आढळतो:—

'सेवा ह्मणे कविकिंकर । **मुक्तिनाथ** श्रोतियां ॥ –( आदि० १२ ).
'**मुक्तिनाथ** कवि वदे' –( आदि० ४४ ).

या सूचक नामांतरावरून एकनाथाची परंपरा पुढें चालविण्याचा कविमुक्तेश्वराचा भाव व्यक्त होतो.

'मुक्तेश्वर जो मी **अवधूत**' ( आदि० १–४४ ),
'मुक्तेश्वर **अवधूत**मूर्ती' ( आदि० १३–१२९ ),
**अवधूतपदजळ**सरोवरीं । मुक्तेश्वर सप्रेम शफरी ।' ( आदि० २९–१७२ ),

या निर्देशांवरून मुक्तेश्वराची अवधूतपथांविषयींची निष्ठा दिसून येत. शिव व विष्णु यांच्यामध्यें भेद नसून एकाच देवतेचीं तीं दोन अंगें आहेत, हें दाखविण्याकरितां श्री दत्तात्रयाची उपासना प्रथम सुरू झालेली दिसते; परंतु या अवधूतसांप्रदायांत पुढें शैव व वैष्णव असे दोन भेद निर्माण झाले असें म्हणतात. लीलाविश्वंभराच्या परब्रह्मस्वरूपाची मुक्तेश्वरानें दोन प्रकारें कल्पना केली आहे. आदिपर्वाच्या आरंभींच पहिल्या पंचायतनस्वरूपाचें त्यानें पुढील-प्रमाणें वर्णन केलें आहे :—

ॐ नमो लीलाविश्वंभरा स्वामी । तुझिये स्वरूपपरब्रह्मीं ।
पंचायतन पंचनामीं । कल्पिजेती अवयव ॥ १ ॥

---

४ **श्री एकनाथ महाराजांच्या अभंगांची गाथा**– ( तुकारामतात्या ), मुंबई, १९०३. अभंग ७२.

तेथें **शिव** तो निज मस्तक । **विष्णुसूर्य** द्वयहस्तक ।
सव्य चरण **विनायक** । वाम तो **शक्ति** साजिरा ॥ २ ॥



लगेच पांचव्या ओंवींत दुसऱ्या त्रिमूर्तिस्वरूपाचें म्हणजे श्री दत्तात्रयस्वरूपाचें त्यानें वर्णन केलें आहे तें पहा :—

कां नाभिपादांत **कमळासनु** ।
मध्यकंठांत **रमारमणु** ।
स्कंधावरुता **त्रिलोचनु** ।
अंगत्रयीं जो येकु ॥ ५ ॥

यावरून मुक्तेश्वर हा अवधूतसांप्रदायी शैव म्हणावा लागतो.

७. या कवीनें आपलें श्लोकरामायण प्रथम लिहिलेलें दिसतें. या ग्रंथाला 'संक्षेपरामायण' असें त्यानें नांव दिलें आहे. युद्धकांडाच्या अखेरीला 'सादरें शेवटीं ग्रंथ नेला' असें म्हणून,

द्विजवर कविनामा मुद्गल अत्रिगोत्रीं ।
विमल वचनमुक्तें लेववी संतश्रोत्रीं ॥

या श्लोकांत 'मुद्गल' असें आपलें मुद्रानाम त्यानें नोंदलें आहे.

मुक्तेश्वरकृत रामायण च्या उपलब्ध प्रतींत सांपडणारे आरंभींचे तीन संस्कृत श्लोक व शेवटचें उत्तरकांड हे भाग मूळ संक्षेपरामायणाला मागाहून जोडले गेले असावेत. त्यांत 'मुक्तेश' किंवा 'मुक्तेश्वर' हें त्यानें पुढें धारण केलेलें नांव नमूद आहे.

तो **मुद्गल** चिंतामणिसुत । लीलाविश्वंभरानुग्रहीत ।

या सभापर्वाच्या अखेरीच्या उपरिनिर्दिष्ट ओवींत 'मुद्गल' हें मूळ आपलें व्यक्तिनामच कवीनें गोवलें आहे. '**चिंतामणिसुत मुद्गलीं** सुख ठेलें ।' किंवा '**मुद्गल चिंतामणि** अनुसरे जाणा ।' असे शेवटास चरण असलेल्याही कविता अलीकडे आम्हांला उपलब्ध झाल्या. 'मुक्तेश्वर' हें पारमार्थिक नांव धारण करण्याच्या अगोदर त्या या कवीनें रचिलेल्या उघड दिसतात. वरील ओव्यांत आढळणारें 'मुद्गल' हें व्यक्तिनाम नसून उपनाम आहे, असा कांहीं लोकांचा आग्रह आहे; तो कितपत योग्य आहे तें वाचकांनींच ठरवावें. भिडे व भावे मुद्गल हें कवीचें व्यक्तिनामच मानतात. पांगारकरांच्या 'कविवर्य मुक्तेश्वर'

या पुस्तकाचें परीक्षण करतांना 'महाराष्ट्र – साहित्य'[5] मासिकांत भिड्यांनीं आपल्या मताचा जोरानें पुनः पुरस्कार केलेला नुकताच आमच्या वाचनांत आला.

८. मुद्गल हें जरी कवीचें मूळ व्यक्तिनाम असलें तरी 'मुक्तेश्वर' हें नवें नांव त्यानें केव्हां व कसें धारण केलें, यासंबंधीं आदिपर्वाच्या आरंभींच तो म्हणतो— :

हो कां डोळसु पायाळ निका । परी गुरुआज्ञेचें अंजन देखा ।
प्रसन्नतेची भाग्यरेखा । नसतां निधान कैं जोडे ॥ ४० ॥
ह्मणवुनी देवतारूपें वहिला । येक श्रीगुरु म्यां स्तविला ।
अभेदभक्तिचेनि भुलला । आज्ञापितु निजमुखें ॥ ४१ ॥
ह्मणे रे बाळकें घेतला थाया । तो साच करोनि दाखवी माया ।
तेवीं त्वां आदरिलें तें वायां । केवीं आह्मीं धाडणें ॥ ४३ ॥
**मुक्तेश्वर जो मी अवधूत । माझेनि नामें मुद्रांकित ।**
**कथा विस्तारीं भारत । महाराष्ट्रपद्बंधीं ॥ ४४ ॥**

'मुक्तेश्वर' हा देवतावाचक शब्द हा कवि आदिपर्वाच्या आरंभींच्या कांहीं अध्यायांतच वापरतो; परंतु आराध्यदेवता व कवि यांचें नांव एकच झाल्यामुळें घोटाळा होऊं नये म्हणून पुढें 'लीलाविश्वंभर' याच नांवानें तो आराध्यदेवतेचा निर्देश करतो. तरीपण आराध्यदेवतेचें नांव धारण करून आपण भारतकथा वर्णन करतों असें त्यानें पुढेंही म्हटलें आहे हें पुढील ओवीवरून दिसतें :—

चिन्मूर्ति लीलाविश्वंभरू । दत्तात्रय जगद्गुरु ।
त्याचेनि **नामें** मुक्तेश्वरू । कथा बोले भारती ॥ —आदि० ३३–३८.

कवीच्या आत्मचरित्रपर शब्दांत दिलेल्या या माहितीबद्दल शंका घेण्यास कारण आहे, असें आम्हांला वाटत नाहीं. हा **श्रीमुक्तेश्वर** देव कुठला हा मात्र प्रश्न आहे. म्हणूनच 'श्री मुक्तेश्वराचा शोध' (Search) हें नांव आदिपर्वाच्या पहिल्या दोन खंडांना आरंभीं जोडलेल्या निबंधाला आम्हीं दिलें होतें. महाराष्ट्रांत मुक्तेश्वराचीं देवालयें आहेत, हें प्रथम आम्हांला माहीत नव्हतें. आदिपर्वाच्या आरंभीं मुक्तेश्वरानें दक्षिणेंतील कांचीचा वरदराज वगैरे अनेक देवतांना नमन केलें असल्यामुळें कांचीला असलेला श्रीमुक्तेश्वरच आपल्या कवीची आराध्यदेवता तर नसेल, अशी आम्हांला प्रथम शंका आली. त्या देवालयाचा म्हणून एक फोटो आदिपर्वाच्या पहिल्या खंडांत आम्हीं प्रसिद्धही केला. अलिकडे दक्षिणेंतील कांहीं क्षेत्रें आम्हीं पाहिलीं. आणि कांचीला जाऊन या मुक्तेश्वराचें दर्शन घेण्याचा प्रयत्न केला. परंतु मुक्तेश्वराच्या देवालयाचा म्हणून जो उपरिनिर्दिष्ट फोटो आर्क्यॉलॉजिकल डिपार्टमेंट सदर्न सर्कलनें ( मद्रास ) आमच्याकडे पाठविला तो मुक्तेश्वराच्या देवळाचा नसून मातंगेश्वराच्या देवळाचा आहे, असें आम्हांस दिसून आलें! श्रीमुक्तेश्वराचें निराळेंच एक लहान देवालय आहे, तेंही आम्हीं पाहिलें.

---

५ महाराष्ट्र-साहित्य, मुंबई. पुस्तक ३, अ. १० ( १९२२ ). पृ० २७९.

अलिकडे महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं श्रीमुक्तेश्वराचीं देवालयें असल्याचें आढळून आल्यामुळें आपल्या कवीच्या आराध्यदेवतेचा शोध करण्यास मद्रासपर्यंत दूर जाण्याचें कारण आहे, असें वाटत नाहीं. ( महिकावतीच्या बखरीमध्यें " प्रतापदया मुक्तेश्वरीं स्नानास जातां आंधेरिस देशक मिळोन मारिला, " असें वर्णन आहे [६] त्यावरून बृहन्मुंबईतही श्रीमुक्तेश्वराचें देवालय होतें असें दिसतें. ) एकंदर विचार करतां पैठणच्या शेजारींच प्रवरा-गोदावरीसंगमावर असलेला कायगांव येथील श्रीमुक्तेश्वर हाच आमच्या कवीची आराध्यदेवता असणें जास्त संभवनीय आहे, असें आम्हांस वाटतें.

कवि मुक्तेश्वराचे अखेरचे दिवस कुरुंदवाडजवळ तेरवाड या गांवांत गेलेले दिसतात. त्याच्या पूजेच्या पादुका असलेलें एक लहानसें देऊळ तिकडे आहे. मुक्तेश्वराचें वृंदावन तिकडे असल्याचा कोल्हापूरच्या छत्रपतींच्या सनदांत निर्देश आढळतो; परंतु आज तें तेथें दिसत नाहीं. आम्ही तिकडे गेलों असतां मुक्तेश्वराच्या वंशजांकडून पुरानें तें वाहून गेल्याचें सांगण्यांत आलें.

मुक्तेश्वराच्या चरित्रापेक्षां त्याचें वाङ्मय जास्त महत्त्वाचें आहे. त्यानें प्रथम लिहिलेल्या श्लोकरामायणाचा उल्लेख वर आलाच आहे. मुक्तेश्वराचीं आदि, सभा, वन आणि विराट अशीं चारच पर्वें प्रथम उपलब्ध होतीं. अलिकडे त्याच्या नांवावर सौप्तिक हें मधलेंच एक पर्व सांपडल्यामुळें भारताची इतर पर्वेंही आज ना उद्यां उपलब्ध होतील अशी आशा बाळगण्यास जागा झाली. परंतु गेल्या दहा वर्षांत जो आम्हीं मुक्तेश्वरवाङ्मयाचा सर्वत्र कसून शोध केला, त्यावरून ती अनाठाई म्हणावी लागते. 'मुक्तेश्वरकृत स्फुट काव्यें,' या पुस्तकांत प्रसिद्ध झालेलीं हरिश्चंद्राख्यान, शुकरंभासंवाद, मूर्खांचीं लक्षणें, हनुमंताख्यान हीं काव्यें मुक्तेश्वराचीं आहेत; परंतु भगवद्गीता, गजेंद्रमोक्ष, विश्वामित्रभोजन, दुर्योधनशल्य-परिस्फोट, अर्जुनकामपूर्ति हीं काव्यें व कांहीं पदें महाभारतकार मुक्तेश्वराचीं असतील असें त्यांच्या भाषेवरून आम्हांस वाटत नाहीं. नांदेडचे रा. वि. अं. कानोले यांना अलिकडे रामायणाचें एक त्रुटित ओवीबद्ध युद्धकांड सांपडलें आहे व तें मुक्तेश्वराचें असावें, असें त्यांचें म्हणणें आहे. मुक्तेश्वराचें चरित्र व काव्य यासंबंधीं जास्त तपशीलवार माहिती तसेंच मुक्तेश्वरकृत व मुक्तेश्वरविषयक वाङ्मयाची यादी आदिपर्वाच्या पहिल्या दोन खंडांत दिली आहे, तीही जिज्ञासू वाचकांनीं अवश्य पहावी, अशी आमची सूचना आहे.

---

६ महिकावती उर्फ माहीमची बखर. सं. वि. का. राजवाडे, श. १८४६. पृ. ५८.

# मुक्तेश्वरकृत महाभारत

## आदिपर्व

### खंड तिसरा

# तिसऱ्या खंडांतील कथाभाग


**अध्याय २६ वा**—कुंती व माद्री यांचा पंडूशीं विवाह ( १–१६ ), पंडुदिग्विजय व वनवास ( १७–५० ), विदुरविवाह ( ५१–५२ ), गांधारीस शतपुत्रोत्पत्ति ( ५३–१०२ ), त्यांचीं नांवें ( १०३ –११८ ), दुःशलाजयद्रथविवाह ( ११९–१२२ ). पृ० ५४७–५६९.

**अध्याय २७ वा**—कर्दमाचा पंडूस शाप ( १–१३ ), पंडूचा वनवास ( १४–७९ ), कुंती व पंडु यांचा पुत्रप्राप्तीविषयीं संवाद ( ८०–१४७ ), पांडवांचें जनन ( १४८–२३१ ). पृ० ५७०–६०३.

**अध्याय २८ वा**—पंडूचें निधन व अंत्यविधि ( १–१०४ ), व्यासाचें भविष्य ( १०५–१२५ ). पृ० ६०४—६२३.

**अध्याय २९ वा**—कौरवपांडवांची वनक्रीडा ( १–३७ ), भीमाला विषप्रयोग, पातालगमन व प्रत्यागमन ( ३८–१७३ ). पृ० ६२४—६४८.

**अध्याय ३० वा**—कृप व द्रोण यांचा जन्म ( १–४५ ), द्रोणाचा विद्याभ्यास व द्रुपदाकडे विफल याचना ( ४६–९६ ), द्रोण व कौरवपांडवांची भेट, धनुर्वेदशिक्षण ( ९७–१६९ ), एकलव्याचें विद्यासाधन ( १७०–२०५ ), अर्जुनाकरवीं द्रोणाची नक्रापासून मुक्तता ( २०६–२४५ ). पृ० ६४९–६८४.

**अध्याय ३१ वा**—विद्यापरीक्षा ( १–१२८ ), कर्णार्जुनकलह व कर्णाचा राज्याभिषेक ( १२९–१९९ ). पृ० ६८५–७१२.

**अध्याय ३२ वा**—अर्जुनाकरवीं द्रुपदास शासन ( १–१०५ ). पृ० ७१३—७२७.

**अध्याय ३३ वा**—पांडवांचा दिग्विजय व धृतराष्ट्राची चिंता ( १–३८ ). पृ० ७२८—७३३.

**अध्याय ३४ वा**—कणिकनीति ( १–१०५ ). पृ० ७३४—७४८.

**अध्याय ३५ वा**—दुर्योधनधृतराष्ट्र-संभाषण ( १–२७ ), पांडवांचें वारणावतगमन ( २८–११६ ), जातुषालयप्रवेश ( ११७–१५३ ). पृ० ७४९—७७०.

**अध्याय ३६ वा**—जातुषालयांतून विवरद्वारा निर्गमन ( १–८५ ), पांडव जळाले म्हणून शोक ( ८६–१०३ ), गंगापार होऊन हिडिंबराक्षसवनांत प्रवेश ( १०४–१६० ). पृ० ७७१—७९३.

**अध्याय ३७ वा** — हिडिंबाचा वध ( १—५६ ), घटोत्कचाचा जन्म ( ५७—८७ ), व्यासदर्शन ( ८८–१०८ ). पृ० ७९४—८०८.

**अध्याय ३८ वा**—पांडवांचें एकचक्रपुरींत गमन व बकवध ( १–१०४ ). पृ० ८०९—८२३.

॥ श्री ॥

# अध्याय सत्तिसावा

श्रीगणेशाय नमः*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 9

* पुढील ३८ ओव्या या अध्यायाच्या आरंभीं नि व खवर्ग मध्येंच आहेत. (त्यांमध्यें हा सबंध अध्याय नाहीं.)

वदे[1] व्यासशिष्य[2] मंजुळवाणी । ऐकें[3] कुरुवंशचूडामणि[4] ।
ऐसा कर्ण तो काननीं । कुंतीजठरीं[5] जन्मला ॥ १ ॥

१ वेद पु४ मुं, (–) औं पु; २ व्यास मुं; ३ ऐके नि; ४ °वंशजचूडा° नि; ५ कोंती° पु४ मुं, कौंती° ख.

रमारमणपादारविंदीं । त्रयतापहर्ती[1] जन्मली नदी ।
तिचा नंदन[2] हृदयारविंदीं । विचार करी अमोघ ॥ २ ॥

१ त्रितापहरणी औं पु, त्रितापहंत्री नि, °तापहंती मुं पु४; २ कुमर पु४.

विदुरोक्ति[1] आठवून । ह्मणे पंडूचें[2] करावें लग्न ।
पुरोहितातें पत्र देऊन । कुंतिभोजाप्रति[3] पाठविलें ॥ ३ ॥

१ विदुरयुक्तीतें पु, विदुरोक्तितें मुं, विदुरुक्तते पु४; २ पांडूचें नि (स प्रसंग्रा); ३ कुंतिभोजा औं पु.

कुंतिभोजा[1] भेटतां[2] ब्राह्मण । मान्य केलें तेणें वचन ।
लग्नपत्रिका देऊन । भूसुरांतें बोलावी[3] ॥ ४ ॥

१ (+) प्रति नि पु४, तयाप्रति पु; २ भेटला औं पु, भेटोनि ख; ३ बोळविलें नि, पाचारिलें औं.

आपण घेऊनि सर्व संपत्ति । गेला वसुदेवपित्याप्रति ।
भीष्म सहपरिवारें त्वरितीं[1] । यादवनगरा[2] प्रवेशला ॥ ५ ॥

१ त्वरितगती नि; २ माद्रनगरा मुं, °नगर पु४ ख.

पंडुकुंतीचें लग्न । विध्युक्त[1] भीष्में[2] संपादून ।
अपार आंदण घेऊन । हस्तिनापुरा[3] पातला ॥ ६ ॥

१ विधियुक्त पु; १–२ भीष्म विध्युक्त नि; २ (–) मुं; ३ हस्तना° स पु४ मुं.

विदुरविचारें गंगानंदन । पुरोहितातें पाचारून[1] ।
पंडूसि दुसरें अंगनारत्न । मेळवावें प्रयत्नें ॥ ७ ॥

१ बोलाउन पु४ मुं.

( मागील पृष्ठावरून पुढें चालू )

**विप्र[1] धाडिले[2] मद्रदेशासी[3] । तेणें[4] जाऊनि सांगतां[5] त्यासीं ।**
**भीष्मआज्ञा[6] वंदूनि शिरसीं[7] । माद्री घेऊनि निघाला ॥ ८ ॥**

१–३ विप्रा धाडिलें मद्रेशासीं नि ; ४ म्हणे औं ; ५ सांगा औं ; ६ भीष्माची आज्ञा नि., तेणें भीष्म° औं ; ७ शिशीं पु ख , सिसीं पु४ मुं.

**सकळसंपत्तिसैन्यसमवेत[1] । आला[2] हस्तिनापुरा[3] नरनाथ[4] ।**
**पंडूसी लग्न लावूनि विध्युक्त[5] । स्वनगरासि[6] तो गेला ॥ ९ ॥**

१ °समेत औं मुं , °संपत्तिशैन्य° पु४ ख ; २–३ हस्तिनापुरा आला नि ; ४ नृपनाथ नि , नगरनाथ पु४ , नगरांत मुं ; ५ त्वरित नि पु४; ६ °नगरा नि, °नगरांत पु४ ; औं मध्यें पुढील ओवी अधिक आहे:—

**अपार आंदन दासदासी । गजवाजी नरयानासी ।**
**गोवृषभखिल्लासी । संख्या त्यासी असेना ॥ ९ अ ॥**

**पंडुरायातें द्वय मानिनी[1] । जाल्या अत्यंत विलासिनी ।**
**तेणें तो[2] सुखावोनि मनीं । कामिनींसी क्रीडतु ॥ १० ॥**

१ मालिनी नि , कामिनी औं पु मुं ; २ ( – ) औं.

**मग[1] भीष्म वदे[2] विदुरमतें[3] । अश्वमेध करावा[4] येथें ।**
**आज्ञापितां पंडुरायातें । स्वसैन्येसीं तो निघे[5] ॥ ११ ॥**

१ ( – ) औं पु४ ; २ वर्ते औं , म्हणे ख, ( – ) मुं; ३ विदुरातें ख ; ४ करावया नि पु मुं ; ५ निघाला नि.

**सेनावसनें[1] सर्व जगती । नेसवूनि पंडुनृपति ।**
**जिंकावया[2] भूभुजांप्रति[3] । उत्तरदिशे चालिला ॥ १२ ॥**

१ सैन्यवसनें औं पु ; २ जिंकोनिया औं पु ; २–३ जो कां जिंकावया भूपति मुं.

**सर्वे[1] सैन्य[2] अतितुंबळ । जैसे वज्राग्नीचे[3] ज्वाळ ।**
**कीं प्रतापअंबुनिधीचे[4] कल्लोळ[5] । उत्साहवातें[6] उसळती[7] ॥ १३ ॥**

१–२ स्वशैन्य ख ; ३ वडवाग्नीचे नि ( स प्रसंग्रा ); ४ प्रतापनिधीचें नि ; ५ जळ नि ; ६ उत्साहलहरी औं पु , उत्साहवीची पु४ , उत्साहातें मुं ; ७ उसळलें नि.

**भीष्मआज्ञा होतां त्वरें । व्यासात्मज चालिला उत्तरे ।**
**तेणें रायांचा मद उतरे[1] । शरण येती तयासी[2] ॥ १४ ॥**

१ वोंथरे मुं ; २ पंडूसी औं.

( मागील पृष्ठावरून पुढें चालू )

**कोण्ही करिती युद्धकंदन[1] । कोण्ही[2] चरणा[3] येती शरण ।**
**करभार अपार वोपून । समागमें[4] चालती ॥ १५ ॥**

१ युध्यकंदन पु४ ख ; २–३ चरणा कोण्ही पु·४ मुं ; ४ समारंभें मुं.

**आनर्तदेशींचा[1] नृपनाथ । बळभीम[2] जिंकिला त्वरित ।**
**शाकलद्वीपींचा नृपनाथ । प्रतिविंध्यनामा[3] जिंकिला ॥ १६ ॥**

१ अनंतदेशींचा औं पु ; २ बळें भीम पु४ ख ; ३ प्रतिधाननामा औं पु ख मुं.

**पुढें गंधर्वी[1] जिंकिला[2] देश[3] । तोही[4] जिंकोनि[5] नराधीश ।**
**सवालक्ष पर्वत अशेष[6] । नराधीश[7] पैं[8] जिंकी[9] ॥ १७ ॥**

१–३ देखिला गंधर्वदेश नि ; २ रक्षिला औं ; ४ तेही औं ; ५ जिंकिला नि जिंकी पु.४ , जितिले औं ; ६ विशेष नि ; ७ जराधीश नि ; ७–९ जो कांचना प्रसवता ख ; ८–९ जिंकिला नि.

**हिमवंत[1] श्वेत[2] पर्वत । किंपुरुषदेश समस्त ।**
**पद्मरागादि अपरमित[3] । रत्नें[4] अपार[5] आणिलीं[6] ॥ १८ ॥**

१ हिमंतपार्श्वी औं ; २ (–) औं; ३ अपरिमित नि ; ४–६ रत्नमाणिकें घेतलीं औं.

**गोरक्षपर्वत प्रसवे सुवर्ण । पुढां मानससरोवर विस्तिर्ण[1] ।**
**शरयूपाट तेथिंचा जाण[2] । जे[3] वंद्य[4] अयोध्या[5] ॥ १९ ॥**

१ गहन नि , जाण पु·४ औं ख ; २ पूर्ण औं ; ३–४ जो कां वाहे नि ; ५ अयोध्ये नि ख मुं.

**मानससरोवरीं[1] कमळणी[2] । भोंवत्या हाटकरत्नांच्या[3] खाणी[4] ।**
**प्रवाळलतिका जीवनीं । उतरल्या पैं[5] अमोघ ॥ २० ॥**

१–२ °सरोवरकमळिणी नि ; ३–४ °रत्नखाणी नि ; ५ (–) नि.

**कर्पूरकर्दळीचीं काननें कस्तूरीमृग[1] अतिपावनें[2] ।**
**करिशावकांचें[3] खेळणें । भूपाल नयनें पहातसे ॥ २१ ॥**

१–२ कस्तुरमलयचंदनवनें औं ; ३ करिणीशावकां° नि.

**मुक्ताफळगुछ[1] शोभती जळीं । दिव्य सर[2] सुवर्णकमळीं ।**
**स्वेछा[3] मराळ तामरसदळीं । सुखानंदें क्रीडती ॥ २२ ॥**

१ °फळगुंडे औं पु ; २ रत्नें नि , शर पु , शरयु औं , सुवास ख , सुरस मुं
३ स्वच्छंदें नि.

( मागील पृष्ठावरून पुढें चालू )

कोण्ही नेदितां सहजें । ज्यासि[1] आवडे तेणें घेइजे ।
सुवर्णरत्नें हेमांबुजें । मुक्ता[2] प्रवाळ[3] इत्यादि ॥ २३ ॥

१ ज्याला नि , ज्ञें ज्या मुं , ( – ) ख ; २–३ रत्नें मुक्तें औं.

उत्तरे हारी[1] वास[2] गंधर्वपुर । जेथें योजनप्राय[3] विखार ।
नांगीया भेदिती धर्राधर[4] । ऐसे वृश्चिक ते[5] ठायीं ॥ २४ ॥

१–२ हारिवीं नि ; १ हरी पु मुं ; ३ गजप्राय नि , योजनप्रमाण मुं ; ४ गिरिवर नि ख ; ५ जे औं पु.

उत्तरदिशा जिंकोनि[1] सकळ । वोढिया[2] जगन्नाथादि राज्य[3] तुंबळ[4] ।
पूर्वदिशेचे भूपाळ । वेगीं सर्वही जिंकिले ॥ २५ ॥

१ जिणोनि औं ; २ वडिया पु॰४ औं ख ; ३ राज पु४ मुं , देश नि , ( – ) ख ; ४ सकळ नि.

कराड[1] आणि कर्णाटक । चोलमंडळादि[2] अनेक ।
देश[3] मल्याळ[4] पंचभर्तारिक । पंडुरायें जिंकिले ॥ २६ ॥

१ वराड औं पु , वऱ्हाड ख ; २ चोडमल्लादि मुं ; ३ बारा ख ; ४ मल्लाळ औं मुं , मल्लार पु.

श्रीरंगपट्टण शिवकंची[1] । समुद्रवासी[2] गडवासियांचीं ।
स्थानें[3] जिंकोनि[4] दुर्जनांचीं[5] । अपार धनें[6] आणिलीं[7] ॥ २७ ॥

१ शिवकांची नि ; २ समुद्रबंदरें ख ; ३ स्थळें नि ; ४–५ जिंकोनियां ऐसीं मुं ; ६ वस्तू नि ; ७ आणिल्या नि.

चौदा चाळ[1] कोंकण । घेतलें कठीण कोळवण ।
अपार बंदरें घेऊन[2] । आणिली द्रव्यसमृद्धी ॥ २८ ॥

१ ताळ औं पु ; २ जिणोन औं.

कांबे काठे[1] कंकम खर । मछआहारी[2] अत्यंत क्रूर ।
सर्व जिंकोनि नृपवर । धनें अपार आणिलीं ॥ २९ ॥

१ काढे नि ; २ मानवआहारी नि.

पूर्व पश्चिम उत्तर दक्षिण । अष्टदिशांतें[1] जिंकोन[2] ।
हस्तिनापुरा आला आपण । अपार करभारेंसी[3] ॥ ३० ॥

१–२ जिंकोनि अष्टदिशा पूर्ण नि ; ३ करभार घेऊनी नि.

( मागील पृष्ठावरून पुढें चालू )

रत्नमांदुसा सहस्त्रश्रेणी । वाजीवारणउष्ट्रयानीं ।
अपार शकट[1] भरोनी । धन[2] आणिलें पंडूनें ॥ ३१ ॥

१ शकटें नि ; २ द्रव्य नि , संपत्ति औं.

नाना दिव्य[1] अळंकार । अपार वस्त्रांचे संभार ।
नेणों लोटले गिरिवर । हस्तिनापुर दिसेना[2] ॥ ३२ ॥

१ द्रव्यें पु४ ; २ प्रदेशीं नि.

सुवर्णनिष्क[1] सहस्त्रकोटी । जांबूनद[2] कनकाचिया[3] खोटी[4] ।
स्वकाळीं[5] होय मेघवृष्टी । तैसी संपत्ती[6] आणिली ॥ ३३ ॥

१ कनकानिष्क नि ; २–३ जांबूनदाच्या अनेक नि ; ४ कोटी नि पु·४ ; ५ सकळीं नि , प्रजन्यकाळीं औं , सकाळीं ख मुं , सहकाळें पु ; ६ संपदा नि.

दिग्विजय करूनि जाण । आला पंडु हें ऐकोन[1] ।
सैन्यासहित[2] गंगानंदन । सामोरा[3] जाय तयातें ॥ ३४ ॥

१ देखोन औं पु ; २ शैन्या° पु४ ख ; ३ सामोरां नि.

सन्मुख देखतां जाह्नवीसुत । पंडु रथाखालें उतरत ।
भावें पदांबुज[1] नमित[2] । येरु[3] आलिंगि[4] तयातें ॥ ३५ ॥

१ °बुजें नि ; २ वंदित मुं ; ३–४ आलंगीत येरु ख.

करूनि मस्तक[1] अवघ्राण । भीष्में करें कुरवाळून ।
सकळ कुशळ विचारून । पुढती रथारोहण[2] पैं[3] केलें[4] ॥ ३६ ॥

१ मस्तका नि ; २ रथारूढ नि ; ३ जिहीं औं पु ; ४ झाले नि.

मिरवत आले निजनगरीं । भीष्मासहित राजमंदिरीं ।
पंडु सत्यवतीतें[1] नमस्कारी । आणि माता आपुलिया[2] ॥ ३७ ॥

१ सत्यवतीस नि ; २ आपुल्या औं पु.

त्यांचा आनंद न माय त्रिभुवनीं । भीष्म तयांप्रति बोले वचनीं ।
पंडूनें दिग्विजयो[1] करूनी । वस्तु[2] अपार[3] आणिल्या ॥ ३८ ॥

१ दिग्विजय नि मुं ; २–३ अपार वस्तू नि.

[library stamp]

कुंतिभोज आपुलां[1] नगरीं[2]। स्वयंवर[3] मांडिलें महागजरीं।
भीष्मराजा हस्तनापुरीं। पंडुसहित निघाला ॥ १ ॥
सेना[1] चातुरंगणिसहित। वाद्यघोषें[2] गर्जना करीत।
ध्वजपताकाछत्रमंडित। समारंभें पातला ॥ २ ॥
राजे मिळाले[1] रंगस्थळीं। जैसे बहुवृक्ष मलयाचळीं।
चंदन[2] लक्षूनि[3] वेंटाळी। नागकन्या पद्मिणी ॥ ३ ॥
तैशा नृपवरांच्या पंक्ति[1]। अवलोकित[2] महासती।
मुक्तमाळा[3] धरूनि हातीं। दिव्य मराळी चामके ॥ ४ ॥
तवं सिंहा सारिखें वक्षस्थळ। गजेंद्रा तुल्य[1] स्कंद मांसाळ।
वृषभा ऐसे[2] चक्षु विशाळ। अजानबाहु नेटका ॥ ५ ॥
शातकुंभस्तंभसोज्वळा[1]। तैसी गोरेपणाची कळा।
प्रतापचंपकाचा कळा[2]। पुरुषाकारें साजिरा ॥ ६ ॥
लावण्य नळाहूनि आगळें। देखतक्षणिं[1] वेधले डोळे।
आवडी घालूनियां माळे। पंडुराजा वरियेला ॥ ७ ॥
सकळीं केले जयजयकार। सुमनीं वरूषले[1] सुरवर।
वाद्यें लागलीं अपार। महोत्साह जनांतें ॥ ८ ॥
विशेषाशीष[1] वोपिले[2] द्विजीं। अक्षयवाणें[3] आणिलीं[4] प्रजीं।
लज्जावधु वरूनि राजीं। जाते जाले स्वस्थाना[5] ॥ ९ ॥

---

१. १ आपुला रा धु गो२ तं; २ नघरीं गो२; ३ सैंवर गो धु.

२. १ शेना धु गो२; २ °घोशें रा गो धु

३. १ मिनले रा; २ (+) वृक्ष धु तं; ३ देखोनि रा.

४. १ पंक्तिं रा; २ अवलोकितां रा गो; ३ मुक्तामाळा गो२, मुक्तिमाळा रा.

५. १ सारिखे गो; २ सारिखे धु.

६. १ °कुंभसोज्वळा धु; २ पुतळा गो.

७. १ देखतक्षिणीं गो२.

८. १ वर्षले धु तं.

९. १ विशेशाषी गो, विशेषाषंक गो२, विशेषाशेष रा तं; २ वोपिली गो, वोपिलीं गो२; ३ अक्षवाणी गो, आक्षवाणें धु, अक्षैवाणें तं; ४ आंपैलीं धु; ५ स्वस्ताना गो२.

कुंतिभोजा अतिसंतोष । लग्नविवाह च्यारी दिवस ।
संपादुनियां बहुवस । धनें[1] रत्नें[2] वांटिलीं ॥ १० ॥
सोहिरे[1] बोळविले[2] उचितें । याचकें[3] अभर[4] केलीं[5] वित्तें ।
अन्नें तृप्त[6] जालीं क्षुधितें । धन्य[7] रे[8] धन्य[9] बोलती ॥ ११ ॥
पौलोमि आणि मघवा । देखतां संभ्रम जैसा देवां ।
तैसाचि संतोष मानवां । पंडुकुंतीदर्शनें ॥ १२ ॥
आज्ञा मागोनि नृपवरा[1] । भीष्म पातला[2] मद्रकपुरा ।
प्रीती भेटोनि मद्रेश्वरा[3] । उचित वस्तु वोपिल्या[4] ॥ १३ ॥
तयाची कन्या[1] स्वरूपतरुणी । बहुतां मुखीं ऐकिली श्रवणीं ।
ते माद्रवती मागोनि पत्नी । द्वितीय केली पंडूतें ॥ १४ ॥
पंडूनृपाचें सौंदर्य । पाहातां मद्रा अतिआश्चीर्य[1] ।
ह्मणे हा धरातळींचा सूर्य । पुरुषाकारें[2] मिरवत ॥ १५ ॥
तेथंहि धनें रत्नें वस्त्रें । अपार वोपिलीं मद्रेश्वरें[1] ।
ब्राह्मणादि अनेक पात्रें । दानोदकीं बुडविलीं ॥ १६ ॥
नगरा[1] धाडूनि भीष्मदेवो । दिग्विजया चालिला रावो ।
सर्वें सेनेचा[2] समुदावो । समुद्रप्राय[3] शोभतु[4] ॥ १७ ॥
पूर्व भेदूनियां समरीं । दशार्णव[1] त्रासिले झुंझारीं ।
वेढूनि परिव्राजगिरी । मागधरावो[2] कोंडिला[3] ॥ १८ ॥

---

१०. १–२ रत्नें धनें रा.

११. १ सोईरे रा धु तं; २ बोळवोनि गो; ३ याचक धु गो२; ४ अमर रा तं; ५ केले धु गो·२; ६ तृप्ति रा धु तं; ७–९ धंन्य धंन्य रे धु.

१३. १ नृपंवरा रा गो; २ पावला धु; ३ मद्रकेश्वरा धु तं; ४ वोपीलीया धु.

१४. १ कंन्या धु.

१५. १ अत्याश्चर्य गो, °आश्चर्य गो·२; २ प्रकाशकारें धु.

१६. १ मद्रकेस्वरें धु.

१७. १ नघरा गो२; २ शेना धु, शेनेचा तं; ३ °प्राये धु तं; ४ शोभला रा गो·२.

१८. १ दशार्ण रा तं; २ °राज गो; ३ वेढिला गो, कोंडूनियां धु तं.

तेणें अपार कोश[1] वाहनें। देऊनि आपण अंकित ह्मणे।
तेथूनि करुनियां धावणें। मिथिळानगरी[2] वेढिली[3] ॥ १९ ॥
जिंकोनि[1] विदेही[2] नृपवर[3]। अपार घेतला करभार।
हें ऐकोनि मंडळेश्वर। धाक यती सामोरे ॥ २० ॥
कण्व पौंड्र पांड्यदेश। जिंकितां न लगेचि[1] अर्ध निमिष[2]।
राजे ह्मणती हा अमरेश। मनुष्य नोहे सर्वथा[3] ॥ २१ ॥
आठहि[1] दिशांचे भूपाळ। समीप पातले उतावीळ[2]।
जोहारूनि ह्मणती सकळ। चरणसेवा[3] वोळगों[4] ॥ २२ ॥
येक जोडल्या[1] करसंपुटीं। उभे आज्ञा[2] वंदिती मुकुटीं।
घेऊनि धनाचिया[3] कोटी। भयें येती सामोरे ॥ २३ ॥
गरुडपाचू[1] गजमौक्तिकें। पद्मराग मणिमाणिक्यें।
जयांच्या मोला मही न तुके। ऐसीं अपार[2] आणिलीं ॥ २४ ॥
दुणें देवोनियां[1] कनक। लोह घेइजे येक तुक।
ऐसिया[2] वस्तु[3] पैं[4] अनेक[5]। राजे[6] भेटी[7] आणिती ॥ २५ ॥
पीठें चवया   भ्रमरपालक। विचित्र डोलारे मंचक।
प्रवाळाचे अतिसुरेख। येकीं भेटीसी आणिले ॥ २६ ॥

---

१९. १ कौशल्य रा, केश गो·२; २ मिथुळा° गो २; ३ वेष्टिली धु तं.

२०. १ जितोनि गो; २ विदेह गो·२; ३ नृपंवर रा.

२१. १ लगे गो·२; २ निसिष्य रा गो२; ३ सर्वदा गो२, सर्वथां तं.

२२. १ आठै रा, अष्ट गो·२ : २ उतावेळ धु; ३ °सेवे धु, चरणशेवा तं; ४ वोळघों गो२ तं.

२३. १ जोडला (लां) धु तं गो२; २ अज्ञा रा धु; ३ धनाचेया गो·२.

२४. १ °पाची तं; २ आपारें धु.

२५. १ दुनियां रा, देखोनियां गो२; २ तैशा गो·२; ३–४ लोहाच्या वस्तु धु तं; ५ आणीक धु; ६–७ राजभेटी धु.

२६. १ चवाया गो·२, चऱ्हुंवा तं.

पद्मरागाचे गणपति । नीळरत्नाच्या[1] विष्णुमूर्ति ।
पंचसूत्रीं निर्मिलीं निगुतीं । वैडुर्याचीं शिवलिंगें ॥ २७ ॥
विद्रुमाच्या शक्तिप्रतिमा । अष्टादश भुजीं[1] अतिउत्तमा ।
ऐसिया वस्तु निरोपमा । उचित राजे आणिती ॥ २८ ॥
चतुर्दश[1] श्वेतहस्तीं । गजमौक्तिकें भरूनि वरुतीं ।
सिंहलद्वीपींचे भूपति । घेऊनि आले अपार ॥ २९ ॥
द्वादशवरुषांच्या पद्मिनी । शृंगारूनि दिव्याभरणीं ।
श्वेतशावकांच्या वाहनीं[1] । सिंधुवासीं आणिल्या ॥ ३० ॥
अव्हाशंखांचिया भरणीं । येकीं आणिले स्पर्शमणि ।
दिव्यौषधी अमृतगुणीं । दिव्यतैलें अमोल्यें[1] ॥ ३१ ॥
समुद्रवासियांचे हातीं । सिंधुद्वीपीं जे निपजती ।
सुवर्णतुकें मोला[1] येती[2] । वस्त्रजाती बहुवर्णा[3] ॥ ३२ ॥
इंद्रगोप जपाकुसुमें । दाडिंबी[1] पालाश रक्तपद्में ।
ऐसिया वर्णांचीं उत्तमें । उर्णापटें[2] पटसूत्रें ॥ ३३ ॥
येकें नीळोत्पलदळनीळीं । जैसीं क्षाळिलीं यमुनाजळीं ।
येकें सुवर्णवर्ण[1] पिवळीं । खद्योतरंगें[2] झळकती[3] ॥ ३४ ॥
साबणवटिका शशिमंडळीं । मर्दूनि वोपिलीं जान्हवीजळीं ।
ऐसीं[1] श्वेतवर्ण[2] धवळीं । दृष्टि तरळे[3] लक्षितां ॥ ३५ ॥

---

२७. १ रत्नाच्या तं.

२८. १ भुजें तं.

२९. १ चतुर्दंत रा गो॰२.

३०. १ वहनीं रा.

३१. १ आमोलें रा धु.

३२. १–२ मोलावती धु ; २ येती गो२ ; ३ °वर्णी गो.

३३. १ दाळिंबी रा ; २ उर्णपटें धु तं.

३४. १ °वर्णें तं; २ खद्योतवर्णें धु तं; ३ झगमगिती धु, झमकती तं.

३५. १ तैसीं धु ; २ °वर्णें रा ; ३ करतळे रा.

गोरत्नें अश्वरत्नें । रथरत्नें कुंजररत्नें ।
कंबळाजिनें कवचास्तरण । सुवर्णरजतें[1] अपार ॥ ३६ ॥
ऐसिया संपत्ती अपारा । घेऊनि पातला हस्तनापुरा ।
परमाल्हाद[1] नारीनरां । श्रृंगारिती नगरातें ॥ ३७ ॥
शांतनूशासूनि भ्रष्टकीर्ति । पंडूनें[1] उद्धरिली[2] पुढती[3] ।
जैसा[4] मथूनि आपांपति । लक्ष्मी काढी केशव ॥ ३८ ॥
छपन्न देशींच्या संपत्ति[1] बहुता[2] । पुरें माजल्या जेवीं सरिता ।
येकत्र मेळविल्या[3] स्वसत्ता[4] । हस्तनापुरसागरीं[5] ॥ ३९ ॥
पूर्वीं कुरुराजाचीं[1] धनें । राजे हरिती उद्धतपणें ।
ते[2] सर्वही[3] होऊनि दीनें । करभारेंसीं[4] वोळगती[5] ॥ ४० ॥
संपत्ती[1] आणिल्या[2] अमोघ । त्याचे[3] करूनि अष्ट[4] भाग ।
पूज्य ते पूजियेले[5] सांग । पंडुराजें[6] आवडी ॥ ४१ ॥
येकें[1] भागें[2] भीष्मनृपति । येकें[3] पूजिली[4] सत्यवती ।
अंबिका अंबालिका सती । भाग[5] द्वय[6] त्यां दीधले ॥ ४२ ॥

---

३६. १ सुवर्णतेजें धु.

३७. १ परमउल्हास धु.

३८. १ ते पंडूनें धु तं ; २ उजळिली गो ; ३ पुढतीं गो·२ ; ४ तैसा धु.

३९. १ वस्तु ख ; १–२ वस्तुजाता नि ; ३ मिनल्या नि, मिळाल्या औं पु गो२ ; ४ तत्वता नि, समस्ता औं पु, पूर्णभरिता मुं ; ५ हस्तिना° नि ( स प्रसंप्रा ).

४०. १ °राज्याचीं पु·४ रा गो२, °रायांचीं नि औं मुं, °राजयाचीं ख ; २ तैसें पु४ ; ३ सर्व नि ; ४–५ वोळंगती करभारें नि.

४१. १ मग संपती औं पु, संपती पु४ ख मुं धु रा गो२ ; २ आणिली पु ; ३ त्यांचे नि ; ४ आष्ट पु·४ धु ; ५ पूजिले नि खवर्ग, पूज्य केले गो ; ६ पांडुराजें नि, °रायें औं ख गो·२.

४२. १ येका पु४, येक औं पु ख धु ; २ भाग औं पु ख धु ; ३ येक ख धु ; ४ पुजीलें पु४, भाग ख ; ५–६ भाग्यद्वय नि.

येक धाडिला धृतराष्ट्रातें । येक निवेदिला[१] विदुरातें[२] ।
नगरवासियां सुहृदांतें । तोषविलें भागें[३] येकें[४] ॥ ४३ ॥

येक वोपिला[१] ऋषिब्राह्मणा । भणगां वांटिली बहु दक्षणा[२] ।
स्तवन[३] करितां लोकवदना । तृप्ति नोहे[४] सर्वथा ॥ ४४ ॥

अपार वोपोनि संपत्ती[१] । प्रज्ञाचक्षूचिये[२] हातीं[३] ।
शत येक[४] अश्वमेध निगुती[५] । सांगोपांग करविले[६] ॥ ४५ ॥

जयवंत[१] देखोनि पौलोमि । संतोष पावे[२] अंतर्यामीं ।
पंडु देखोनि सुखाची उर्मी[३] । कौसल्येतें[४] नावरे ॥ ४६ ॥

संगें[१] घेऊनि[२] उभयपत्नी । नगरवास[३] न[४] रुचे[५] मनीं[६] ।
वसता जाला वनकाननीं[७] । मृगयाशीळ सर्वदा ॥ ४७ ॥

हिमवंतगिरीपाठारीं[१] । ताळतमालवनगव्हरीं[२] ।
दक्षिणपार्श्वीं[३] धनुर्धारी[४] । सिंह[५] तैसा विचरत ॥ ४८ ॥

---

४३. १ **दीधला** नि गो२, **मीरवीला** पु४ ; २ **स्त्रियांतें** औं पु ; ३–४ **भागैकें** नि तं, **भागेंकें** ख, **भागेकें** ध्रु रा गो·२.

४४. १ **ओपिला** नि; २ **दक्षिणा** नि औं तं ; ३ **स्तव** नि औं ; ४ **नव्हे** पु तं, **नाहे** रा गो.

४५. १ **संपती** पु·४ मुं रा गो·२ ; २ °**चिया** नि ; ३ **हस्तीं** नि ; ४ ( – ) औं पु ; ५ **यथानिगुती** औं पु ; ६ **करविला** औं पु.

४६. १·**जयंत** नि रा गो तं ; २ **मानी** नि, **वाटे** ख, **पावत** गो·२ ; ३ **उर्मीं** नि ; ४ **कौशल्येतें** नि खवर्ग रा.

४७. १ **सर्वें** नि ; २ **घे** पु४ ; ३–६ **नगरवासी नरां टाकुनी** पु, **नगरस्वामी नगर टाकुनी** औं ; ७ **काननीं** नि मुं तं.

नि मध्यें पहिल्या व दुसऱ्या चरणांची अदलाबदल आहे.

४८. १ °**गिरीच्या पाठारीं** नि, °**गिरीचा** ( चां ) **पाठारीं** औं पु·४ ख ; २ °**गव्हारीं** गो·२ रा ; ३ **दक्षण**° औं ख मुं ध्रु रा ; **दक्षण पारस्वद** पु ; ४ **निर्धारीं** औं पु ; ५ **सींहे** ध्रु.

करिणींमाजी भद्रजाती । तेविं उभयवनितापंक्ती[1] ।
पंडुराजा अहोराती । अरण्यक्रीडे[2] रातला ॥ ४९ ॥
भक्ष्यभोज्यादि[1] समस्त । धृतराष्ट्र धाडी[2] वनांत[3] ।
आज्ञा होतां असंख्य दूत । सामग्रिसीं[4] तिष्ठती ॥ ५० ॥
देवकराजकन्या[1] बरवी । जियेचें नाम[2] पारसवी[3] ।
भीष्में मागोनि[4] लग्नगौरवीं । भार्या केली विदुरासी ॥ ५१ ॥
तिच्या[1] पोटीं जन्मले[2] कुमर । पितयातुल्य विवेकचतुर ।
विनयवंत[3] गंभीरधीर[4] । महासमुद्र[5] क्षमेचे[6] ॥ ५२ ॥
यावरी[1] प्रज्ञाचक्षुरेतें[2] । शत पुत्र जाले[3] गांधारीतें ।
वेश्यागर्भीं जन्मला त्यातें । युयुत्सु नाम[4] जाण पां ॥ ५३ ॥
देवतावीर्यें[1] वनांतरीं । कुंतीमाद्रीचिये[2] उदरीं[3] ।
देवचि जाले[4] देहधारी[5] । धर्मादिक पांचही[6] ॥ ५४ ॥
विनवी राजचूडामणि । वैशंपायना चतुराग्रणी[1] ।
शतपुत्रांतें[2] येक[3] जननी । कैशापरी प्रसवली ॥ ५५ ॥

---

४९. १ °वनितांचे पंक्ती नि, °वनितासंगती ख, °वनितांमाजी पती मुं ; २ आरंण्य° पु·४.

५०. १ भक्ष्यभोज्यादि नि औं रा ; २ पाठवी नि ; ३ वनाआंत धु रा तं ; ४ सामुग्रीसीं नि ख, सामोग्रीसी मुं गो२, सर्व सामग्रीसी औं पु.

५१. १ देवकंन्या राजकंन्या खवर्ग ; २ नांव नि औं पु ; ३ पारशवी सं. म. भा. ४ सांगोक्ती पु, सांग औं, लागोनि रा.

औं पु मध्यें दुसऱ्या व तिसऱ्या चरणांची अदलाबदल आहे.

५२. १ तिचे नि मुं, तिचा पु४ धु गो ; २ जन्मेल पु४ मुं धु, जन्मला ख गो·२ ; ३ नियमवंत मुं ; ४ धीरगंभीर नि ; ५ मांहां पु·४ ; ६ क्षमेचा ख गो·२ मुं, क्षमेनां पु४.

५३. १ याउपरि पु·४ मुं, यापरी औं ख तं ; २ °चक्षुरायातें नि खवर्ग ; ३ जन्मले ख ; ४ नामा औं पु ख धु गो·२.

५४. १ °वीर्यं पु·४ गो·२ ; २–३ °माद्रीउभयजठरीं नि ; ४ जन्मले नि ; ५ जन्मधारी ख ; ६ पांचैजन औं पु.

५५. १ चातुर्यखाणी नि, चतुरायणि गो·२; २ °पुत्र ख धु ; ३ येकी गो२ तं.

येकदां किंवा[१] काळांतरीं । शतभरी[२] पुत्र यके[३] उदरीं ।
जन्मले हे[४] सुविस्तारीं[५] । सांग मातें सर्वज्ञा ॥ ५६ ॥
वेश्यागर्भीं एक नंदन । जन्मावया काय[१] कारण[२] ।
हेंही मातें[३] होय[४] ज्ञान । तैसें[५] प्रांजळ निरोपीं ॥ ५७ ॥
मनुष्यस्त्रियेचे[१] गर्भमुसे । देववीर्य[२] देवतावेशें ।
पुत्र जन्मले हेंही[३] कैसें । विस्तारूनि[४] सांग[५] पां[६] ॥ ५८ ॥
पंडितमंडळीं[१] वरमंडणा[२] । संशयवनखंडप्रखंडणा[३] ।
प्रचंडवक्तृत्वचंडकिरणा[४] । कथापंथा[५] प्रकाशीं[६] ॥ ५९ ॥
वैशंपायन म्हणे नृपति । निकेन[१] परिसें[२] सावधमति ।
गांधारीचे परमभक्ती । व्यास गेहा[३] पातला ॥ ६० ॥
भजनादरें[१] तोषला ऋषि[२]। कृपेनें[३] वरदोक्ति[४] वदला[५] ऐसी ।
येक[६] शत पुत्र तुझिये[७] कुसी । जन्मतील सदेवें[८] ॥ ६१ ॥

---

५६. १ कीं मुं, **परि** पु४; २ **शत** नि खवर्ग गो; ३ **येकचि** पु; ४ **हें** नि पु मुं रा; ५ **सविस्तरीं** नि-पु मुं, **सविस्तारीं** औं ख धु.

नि मध्यें चरणक्रम ३–२ असा आहे.

५७. १ **कोण** गो; १–२ **कारण कोण** रा तं; ३–४ **होय मातें** औं पु; ५ **तें** ख, **ऐसें** गो·२.

५८. १ °**स्त्रीचे** नि, °**स्त्रियांचे** पु·४ औं मुं; २ °**वीर्यें** नि; ३ **तेंही** मुं; ४ **विचारूनि** औं पु, **सर्व मातें** ख, **विस्तारेंसी** मुं; ५–६ **मज सांगें** नि.

५९. १–२ °**मंडळीवर**° नि ख, °**मंडळींवरिमंडणा** औं पु; २ **रवीमंडणां** पु४; ३ **वैशंपायना संशयखंडणा** नि, **संशयें नवखंडप्रचंडणा** पु४, °**वनखंडणा** गो मुं, °**वनप्रखंडणा** रा; ४ °**वसंतचंडकिरणा** नि (°**वस्तू चंडकिरणा** स), **प्रचंडवंशावचंड**° औं पु; ५ **कथाप्रकाश** धु तं; ६ **अभ्रक** तं.

६०. १ **निकें** नि खवर्ग गो२ (पु४ प्रसंप्रा), **निकेने** रा तं; २ **म्हणे** मुं, **परियेसें** तं; ३ **गृहा** नि.

६१. १ **भोजना**° नि (स प्रसंप्रा), **भजनें** ख; २ **रुषी** औं पु४ धु; ३ **कृपें** औं, **कृपेन** गो·२; ४ **वचनोक्ती** औं पु; ५ **वदे** ख; ६ (–) नि ७ (–) औं पु; ८ **सुदैवें** नि.

व्यास वदोनि गेलियां[1] राजा । ऋतुस्नात[2] सुबळात्मजा ।
प्रज्ञाचक्षुवीर्यवोजा[3] । धरिती जाली गर्भातें[4] ॥ ६२ ॥
गर्भ[1] थाविल्या[2] पवित्रोदरीं[3] । पंचविंशति मासवरी ।
प्रसूति[4] नोहे[5] ह्मणूनि[6] थोरी[7] । चिंता वर्ते दोहींतें[8] ॥ ६३ ॥
वार्ता[1] सांगिजे ऋषिब्राह्मणीं[2] । कुंतीलागीं[3] महावनीं[4] ।
ज्येष्ठ[5] पुत्र जन्मला गुणी । बाळसूर्यासारिखा ॥ ६४ ॥
हें[1] ऐकोनि ईर्षामनें[2] । धृतराष्ट्रातें[3] न[4] कळतां[5] मौनें[6] ।
उदर[7] ताडिलें पाषाणें[8] । निष्ठुरकरें रागिटा[9] ॥ ६५ ॥
उदर ताडितां दाक्षिणकुसीं[1] । गर्भ गळाला तात्काळेंसीं ।
रक्तवर्ण मांसपेसी[2] । तळीं पडली लवथवित[3] ॥ ६६ ॥
जालें देखोनि गर्भपतन[1] । सौबळी करी दीर्घरुदन[2] ।
ह्मणे व्यासाचें वरदान[3] । विपरीत केलें अदृष्टें ॥ ६७ ॥

---

६२. १ गेलिया नि मुं गो·२ तं ; २ रुतु° पु मुं, रुतुश्नात पु४ धु रा ; ३ °वीर्यं वोजा नि, °वीर्येवोजा पु४ गो२, °वीर्यबीजा औं ; ४ गांधारी औं.

६३. १–२ पाळिल्या गर्भ गो२ ; २ धाविल्या धु तं, थांवल्या पु४ मुं, थाबल्या रा, थांववल्यां ख, स्थिरावला नि औं, स्थिरावल्यां पु ; ३ उद्‌रीं नि ; ४ प्रसूत नि पु ख रा ; ५ नव्हे नि औं ख मुं ; ६–७ कवणेपरी नि ; ८ उभयांतें औं.

६४. १ तंव वार्ता धु तं, वार्त्ता पु ख रा ; २ ऋषीं ब्राह्मणीं नि, बाह्मणी औं ; ३–४ कुंती प्रसूत झाली वनीं नि ; ४ महाविजनीं औं, मांहामुनिवनीं पु४, माहावंति जनीं पु ; ५ जेष्ट औं पु·४ ख रा गो २ तं धु.

६५. १ ऐसें गो२ ; २ विषममनें नि, हरुषमनें पु, द्वेषमनें औं, ईर्षमान पु४, °मनीं धु तं ; ३ °राष्ट्रा औं पु ; ४ (–) नि ; ५ कळत धु रा ; ६ मौन्यें पु रा गो·२, मौन पु४, मौनी धु तं ; ७ उद्‌रीं पु४ ; ८ पाषाण पु४, पाषाणीं धु तं ; ९ रागिष्टें नि (रागिष्टें स), ते काळीं औं, रागिटें गो, रागिट ख मुं.

६६. १ द्‌क्षण° पु ख मुं धु रा ; २ पेशी नि, मांसपिशी औं मुं, मांसपिछी पु, मांशफेसिं रा ; ३ लवलवीत नि, येकसरां औं.

६७. १ पतन पु४ ; २ रोदन नि ; ३ वरदवचन गो२ धु तं.

ऐसें बोलतां[1] खेदभूत[2] । तवं व्यास प्रगटला[3] अकस्मात ।
ना भी ह्मणोनि आश्वासित । कृपावचनीं कृपाळु ॥ ६८ ॥
अन्यथा नाहीं[1] मद्वचनासी । ह्मणोनि[2] जळ[3] प्रोक्षिलें[4] पेसीं[5] ।
हस्त स्पर्शे[6] तवं[7] आपैसी । भेदावली शतभागें[8] ॥ ६९ ॥
फणसामाजील[1] बीजकण । काढितां[2] निघती[3] भिन्न भिन्न ।
तेवीं अंगुष्ठपर्वप्रमाण[4] । मांसगोळे निवडिले ॥ ७० ॥
शत कुंभीं भरूनि घृत । येकेक[1] सूदला करूनि गणित ।
संख्या होतां येक शत । गांधारियां[2] प्रार्थिलें ॥ ७१ ॥
येकी[1] कन्येची वासना । ते[2] मज द्यावी द्वैपायना ।
निकें म्हणोनि विशेषकणा । आगळे कुंभीं घातलें[3] ॥ ७२ ॥
शत्रपुत्रावरी[1] आगळी । कन्या जन्मली[2] रूपशाली[3] ।
दुःशीलानामें[4] राजबाळी । बंधुवर्गा पढियंती ॥ ७३ ॥
गर्भबीजाचे भिन्न[1] अंश । घृतीं जालिया समरस ।
घांटुनियां[2] येकमूस । व्यासें केलें[3] हस्तकें[4] ॥ ७४ ॥

---

६८. १ बोले औं; २ सखेद° ख, खेदोद्भुत औं; ३ प्रकटला रा तं, प्रग्रटला गो·२.

६९. १ नोन्हे नि, नोहे औं पु ख, नन्हे मुं; २ म्हणौनि औं पु तं; ३ जळें नि ख मुं रा गो·२ तं; ४ प्रोक्षी पु४, प्रोक्षितां ख, प्रोक्षिली मुं तं; ५ तियेसी नि, पिसीं औं, पिसी मुं, पेशी तं, फेसीं रा; ६–७ स्पर्शतां नि; ८ °भाग नि, शतशृंगें मुं.

७०. १ कणसा° पु४, °माजी औं गो; २ तैसे ख; ३ (+) गरे औं पु; ४ अंगुष्ठप्रमाण नि ख मुं रा गो, अंगुष्ठप्रायप्रमाण औं पु.

७१. १ एक एक नि, एकैक औं पु; २ गांधारीतें नि (गांधारियें स).

७२. १ एक नि मुं रा गो, येके ख गो२ तं; २ जाली ते धु तं; ३ घातला नि, भरियलें औं.

७३. १ शतपुत्राहुनी पु४; २ जन्मेल ख रा गो·२, नेमिली पु४; ३ गुणवेल्हाळी नि, रूपविशाली पु·४ गो; ४ दुःशला° नि (स प्रसंग्रा), (दुश्शला सं. म. भा.)

७४. १ (+) भिन्न नि; २ घोटुनियां धु, रस घालुनि औं; ३ केली नि; ४ स्वहस्तकें नि, निजहस्तकें पु, विभागहस्तें औं.

रक्षा करूनि मंत्रमेळीं । कुंभ ठेविले निगूढस्थळीं[1] ।
दीप लावूनियां जवळीं । रक्षणा[2] नारी ठेविल्या ॥ ७५ ॥
मार्जारमूषकनिवारण[1] । करूनि विलोका[2] सावधान ।
नवमास होतांचि[3] संपूर्ण[4] । आकारती[5] अवयवीं[6] ॥ ७६ ॥
ऐसें सांगोनि व्यासमूर्ती । तपश्चर्ये[1] मानसगती ।
गेला हिमालयाप्रति । योगमार्गें योगिया[2] ॥ ७७ ॥
मासमासाच्या[1] अंतरीं । जन्म पावले कुंभोदरीं ।
ज्येष्ठ त्यामाजी निर्धारीं । दुर्योधन दुरात्मा ॥ ७८ ॥
जन्मतक्षणीं[1] बाळभावें । टाहो फोडिला रासभरवें[2] ।
त्याचा यत्नें[2] न[3] करितां क्षय । केवीं अक्षय आपण[4] ॥ ८७ ॥
हातीं गवसलें घाली तोंडीं । न पवत्या[1] दुरूनि[2] मारी धोंडीं ।
मध्यस्त दंडें झोडोनि[3] पाडी । बनकर[4] जेवीं[5] फळातें ॥ ८८ ॥
दरिद्र[1] दुष्काळ[2] व्याधी व्यसनें । शरण ह्मणोनि भावितां[3] करुणें ।
तोही शत्रु सोडितां प्राणें । सद्य[4] प्राणा[5] मुकीजे ॥ ८९ ॥
सबळ शत्रु सांपडे[1] डाईं[2] । तवं[3] सिणावें कठिणोपाईं[4] ।
आलस्यउपेक्षेचे[5] ठाईं[6] । स्पर्शों आंगा नेदिजे[7] ॥ ९० ॥
मुसळें[1] दाऊन अंगपतन । करी बहुधान्य[2] खंडन[3] ।
तेवीं घालोनि लोटांगण । शत्रुकंदन[4] साधावें ॥ ९१ ॥
नमनीं लवविजे[1] उत्तमांग । मनें[2] लक्षिजे अपायअंग[3] ।
मस्तक खालाऊनि चांग[4] । मृग विंधी पारधी ॥ ९२ ॥

---

८६. १ आपुलियाहूनि नि खवर्ग ; २ त्यासी नि ; ३ वचनें औं पु.

८७. १ त्याचें मुं गो·२ ; २ यत्न नां धु गो·२ ; ३ ( – ) औं पु मुं गो ; ४ आपणा पु४ मुं नां रा गो२.

८८. १ पवे त्या नि खवर्ग ( नां प्रसंप्रा ) ; २ ( – ) नि पु४ ; ३ सोडोनि गो·२ ; ४–५ जेंवी वनतरु नि , जेवीं बनकर खवर्ग.

८९. १ दारिद्य नि , दारिद्र औं नां धु गो ; २ दुकाळें औं पु , दुष्काळें ख नां मुं ; ३ भाकितां नि औं पु गो , पोसितां पु४ , भासितां ख नां ; ४ सद्यः नि ; ५ प्राणें गो·२.

९०. १ झोडिजे नि ( स प्रसंप्रा ) , सोडिजे औं पु·४ ख मुं ; २ ठाईं औं पु गो२ ; ३ मग औं मुं ; ४ कठीण पाहीं गो ; ५ आलस्यअपायाची नि , आलस्यउपायाची औं पु·४ नां मुं , अल्पउपायाची ख ; ६ शायी नि पु४ मुं , सोई औं ख नां , साई पु ; ७ न दिजे नि औं.

९१. १ मुसळ नि नां ; २ °धान्याचें नि पु४ नां ; ३ कंडण नि औं पु·४ , कंदण धु मुं ; ४ °कंडण नि , शत्रुकदन गो रा.

९२. १ लववावें नि , लविजे ख नां मुं धु ; २ मनीं नि पु४ गो अपायमार्ग नि , अपायव्यंग धु ; ४ मग मुं.

सन्मुख सरळ[१] मवाळ[२] व्यक्ती[३] । सदां वर्तणें धर्मपंथीं[४] ।
पायां लागूनि दुःख देती । कंटक जेवीं[५] जगातें ॥ ९३ ॥
तेवीं अंगबळ मानोनि उणें । शत्रु साधावा बुद्धिबाणें ।
अपाय करितां साधेल[१] जेणें[२] । तेचि[३] पुढां योजिजे ॥ ९४ ॥
आभिषगर्ता जाळिया[१] फांसें[२] । बाणसंधानें[३] श्वानहुताशें[४] ।
श्वापदें साधिजेति सायासें । पारधियें ज्यापरी ॥ ९५ ॥
तेवीं मारिता न फवे[१] यत्नीं । तरी निजेल्या गृहीं[२] लाविजे अग्नि[३] ।
फळतांबूलभोजनपानीं । विषप्रयोग करावा ॥ ९६ ॥
पणीं जिंकोनि आणिजे हारी । नियमीं गोविजे सत्योत्तरीं ।
जुझीं[१] मारिजे[२] बहुतां करीं । न्यायान्याय[३] न[४] विचारें[५] ॥९७॥
सर्पासि नाहीं ब्रह्महत्या । व्याघ्रासी नलगे[१] धेनुहत्या[२] ।
शत्रूसि नाहीं शत्रुहत्या । हें[३] निर्धारें[४] जाण पां ॥ ९८ ॥
आतां सहस्र गोष्टींचीं सारगोष्टी[१] । अपांडवी करूनि भृष्टी[२] ।
पुत्रेंसहित[३] राज्यपटीं । भोग भोगीं चिरकाळ[४] ॥ ९९ ॥
जीत[१] असतां हे पांडव । पुत्रांसि न जिरे राणीव ।
हेचि[२] जाणसी तरी[३] जाणीव । श्रेष्ट ऐसें मग मानूं[४] ॥१००॥

---

९३. १–२ **मावळे सरळ** गो·२ ; ३ **युक्ती** नि पु नां ; ४ **धरापंथीं** गो·२ ; ५ **जैसे** नि.

९४. १ **साधिलें** गो·२ , **साधे** औं ख मुं ; २ **ज्याणें** नि ; ३ **तेंचि** नि औं पु मुं , **तोचि** गो·२.

९५. १ **जालियां** औं पु नां ; २ **पाशें** धु तं ; ३ **बाणसाधन** औं पु ख, **बाणसाधनें** पु४ नां मुं ; ४ **श्वानें हुताशें** नि , **श्वान बहुवसें** खवर्ग.

९६. १ **पवे** नि ख धु , **फावे** औं पु·४ नां गो , **कळे** मुं ; २ **ग्रहीं** पु४ ख नां , **घरीं** गो , ( – ) रा ; ३ **वन्ही** रा तं.

९७. १ **झुजीं** नि ; २ **मारविजे** धु तं ; ३ **न्यायान्यायें** पु४ , **न्याय अन्याय** नि ; ४–५ **बहुविचारें** पु४ ; ५ **विचारितां** नि औं पु , **विचारी** मुं.

९८. १ **नाहीं** नि खवर्ग ( **कैंची** पु ) गो ; २ **गोहत्या** नि खवर्ग ; ३–४ **हा निश्चय** नि.

९९. १ **गोष्टी** नि औं मुं ; २ **सृष्टी** नि ; ३ **पुत्रांसहित** नि गो·२ ; ४ **सर्वही** मुं.

१००. १ **जीवंत** मुं ; २ **ऐसें** नि ; ३ **तरीच** नि , (–) नां मुं ; ४ **वानु** नां

पंडुपुत्रांचा[१] समंधु[२] । खंडे तरीच विखंडे[३] खेदु ।
पुत्र पावती अक्षयानंदु । येरवीं मृत्य[४] पावाल[५] कीं[६] ॥१०१॥
यापरी बोधूनि वसुधापति । कणिक गेला स्वगृहाप्रती[१] ।
राजा पडिला चिंतावर्ती । विचार कांहीं सुचेना ॥ १०२ ॥
उद्वेगज्वरें[१] जाकळे रावो[२] । पुढें मांडिला तोचि प्रस्तावो ।
यावरी वर्तला कथेचा भावो[४] । भाविक भावें परिसतु[५] ॥१०३॥
इति श्रीमहाभारते[१] आदिपर्वणि । मुक्तीशगिरा[२] तारका[३] र्णी[४] ।
अर्थचंद्रमा[५] सुधाकिरणीं । जिववी[६] श्रवणचकोरां[७] ॥ १०४ ॥
परंतु[१] श्रीगुरुकृपेचि[२] पौर्णिमा । फावे[३] तरीच लाहे उपमा[४] ।
येऱ्हवीं वल्गना तितुकी[५] अमा[६] । आह्मां मूढ कवींची ॥ १०५ ॥

इति श्रीमहाभारते आदिपर्वणि चतुस्त्रिंशोऽध्यायः ॥

---

१०१. १ पांडु° नि ; २ संबंधु नि ; ३ फिटेल नि , खंडे खवर्ग ; ४ मृत्यु नि मुं पु रा तं ; ५–६ पालवीं औं पु·४ नां मुं गो·२ रा, पावसी ख.

१०२. १ गृहाप्रती पु.

१०३. १ उद्वेगवळें पु४ ; २ राव नि ; ३ प्रस्ताव नि ; ४ भाव नि ; ५ परिसोत नि.

१०४. १ श्रीभारते खवर्ग गो२ रा ; २ मुक्तेश्वरगीरा नि : ३–४ तारकावर्णीं नि ( कावर्णी स ) गो नां , तारकवर्णी औं पु गो२ , ताम्रपर्णी ख मुं ; ५ अर्धचंद्रमा नि पु४ ख नां धु गो२ रा , आर्कचंद्रमा पु , अति चंद्रमा औं ; ६ जेंवि नि ; ७ श्रवणीं आर्त चकोरा नि

१०५. १ ( – ) नि खवर्ग ; २ श्रीगुरु ज्ञानकृपेची नि, श्रीगुरूची गो·२ ; ३ पाहे नि खवर्ग रा , पाहो गो·२ ; ४ प्रतिमा स ; ५–६ नये कामा नि ; ६ आह्मां औं पु·४ गो·२ रा.

॥ श्री ॥

# अध्याय पस्तिसावा

## श्रीगणेशाय नमः

बळाधिक्यें[1] भीमसेन । अस्त्रविद्ये[2] श्वेतवाहन[3] ।
विवेकराजा[4] नीतिनिपुण[5] । धर्मराजा सर्वार्थी ॥ १ ॥

ऐसें जाणोनि सकळ[1] प्रजा । ह्मणती पुरातन पंडुराजा ।
ज्येष्ठ[2] त्याचिया[3] आत्मजा । राज्यपदीं[4] अधिकारु[5] ॥ २ ॥

चक्षुहीन प्रज्ञाचक्षु । भीष्म स्वनेमें निरपेक्षु ।
यालागीं आमुचा राजा मुक्षु[1] । युधिष्ठिर निर्धारें ॥ ३ ॥

सर्वही[1] मिळोनि येकाचित्तें[2] । राज्यीं[3] अभिषेकुं[4] धर्मातें ।
भीष्मद्रोणकृपादिकांतें[5] । विचारणें लागेना ॥ ४ ॥

सहज[1] इछिजे मानसें । तेंचि[2] वोढवल्या दैवविशेषें[3] ।
तरी तें[4] नेघे[5] नावडे ऐसें । ह्मणे[6] कोण[7] सांग[8] पां[9] ॥ ५ ॥

---

१. १ **बळाधिक्य** औं पु ख मुं तं, **बळाधिक** नि गो·२ ; २ °**विद्येंत** नि, °**विद्या** नां गो·२, **अस्त्रवीद्ये** धु, **अल्पविद्या** औं ख मुं, **आल्पविद्या** पु·४ ; ३ **दुर्योधन** खवर्ग ; ४ **विवेकी** नि खवर्ग, (+) **हा** खवर्ग ; ५ **राजनीति**° नि, **निपुण** खवर्ग.

२. १ **सर्व** नि ; २–३ **मग जेष्ठाच्चिया** खवर्ग ; ४ °**पदा** नि ; ५ **अधिकारी** खवर्ग गो·२. खवर्ग मध्यें चरण २ व ३ ची अदलाबदल आहे.

३. १ **मुख्यू** नि खवर्ग.

४. १ **अवघे** नि ; २ **एकमतें** नि ; ३–४ **राज्याभिषेकुं** स औं पु गो तं ; ५ °**कृपाचार्यांतें** नि खवर्ग.

५. १ **सर्व** पु४ ; २ **तेवीं** गो·२ ; ३ **दैवदशें** नि नां, **दैववशें** औं पु मुं ; ४ (+) **नांव** नि ; ५ **नेघों** नि, **न घडे** पु४ ख ; ६–९ **म्हणता कोणी असेना** नि.

आतां संशयाचा[1] हातु[2] । मुरडूनि शीघ्र साधिजे[3] अर्थु ।
विलंबीं घालितां मनोरथु । काळ ग्रासी रसातें ॥ ६ ॥
ऐसें ऐकोनि दुर्योधन[1] । क्रोधें धडकला हुताशन[2] ।
विदुर नसतां अति उद्विग्न । रायापासीं पातला ॥ ७ ॥
ह्मणे पितया[1] अनर्थ पाहीं । उदेला तो ऐकिला कांहीं ।
येरु ह्मणे कळला नाहीं । ज्ञात[2] करीं[3] स्ववाचा[4] ॥ ८ ॥
अंधत्वदोषें[1] वाळूनि[2] तूतें । तृणाग्रीं बांधोनि भीष्मातें ।
पादांगुष्ठें[3] लोटूनि मातें । येकशत बंधूंसी ॥ ९ ॥
अन्यज कुंतीगर्भधामीं[1] । जो[2] जन्मला[3] व्यभिचारधर्मीं[4] ।
त्या धर्मातें राज्यलक्ष्मी[5] । द्यावया सर्वही[6] सिद्ध[7] जाले[8] ॥ १० ॥
पुरीं[1] राष्ट्रीं[2] प्रजा[3] लोक । ब्राह्मणादि वर्ण अनेक ।
सेवक संमंधी[4] सकळिक । तेचि मिळणीं मिळाले[5] ॥ ११ ॥
हें[1] निश्चयें[2] जालें[3] जाण । यया बोला[4] नाहीं[5] आन[6] ।
कनिष्ठ भिक्षा[7] अथवा[8] मरण । तुझिया[9] भागा पातलें ॥ १२ ॥

---

६. १–२ **संशयाची मात** धु ; ३ **सिद्धिजे** धु, **सांगीजे** गो॰२. या ओवीऐवजीं नि व खवर्ग मध्यें पुढील ओवी आहे:—

**सुयोधनें[1] नायिकतां । शकुनीसही न कळतां ।**
**शीघ्र साधिजे या अर्था । विलंब कांहीं[2] न करावा ॥ ६ ॥**

१ दुर्योधनें नि ; २ सर्वथा नि नां , आतां पु४.

७. १ **हुताशन** ख ; २ **दुर्योधन** ख.

८. १ **राया** नि गो॰२ ; २–३ **अनर्थकर** खवर्ग ; ४ **स्ववाचे** नि, **सर्वांचा** खवर्ग ( **सर्वथा** ख ).

९. १ °**दोष** नि खवर्ग तं ; २ **दाऊनि** नि, **लाऊनि** खवर्ग ; ३ °**गुष्टीं** औं मुं गो तं.

१०. १ °**धामा** खवर्ग ; २–४ **व्यभिचारकर्में पावला जन्मा** खवर्ग ; ५ **राज्यधर्मा** खवर्ग ; ६ **सर्व** नि पु ख मुं ; ७–८ **उद्यत** औं पु, **सिद्धते** नां गो॰२.

११. १–२ **पुरी राष्ट्र** नि खवर्ग ; ३ **सर्व** ख ; ४ **संबंधी** नि तं ; ५ **मीनले** मुं गो॰२.

१२. १–३ **हाची नीश्चय जाला** ख ; ४–६ **लागी आपण** पु४ ; ७–८ **पक्षा आति** पु४ ; ९ **मांझीया** पु४.

राजा ह्मणे ऐक आतां । पंडु माझा सहोदर भ्राता ।
पुत्रां[1] त्याच्या गुणवंतां । केवीं वोखटें[2] चिंतावें[3] ॥ १३ ॥
भंगती[1] विश्वाचीं[2] मानसें । भीष्मद्रोणा वाटेल कैसें ।
नेमिले[3] न[4] वचती[5] सायासें। तरी[6] मग[7] यत्न[8] असेना ॥१४॥
त्यांचेनि सुखें पावती सुखा । त्यांचेनि दुःखें पावती[1] दुःखा ।
ऐसी त्यांची ललाटरेखा । सांग कोणें मोडावी ॥ १५ ॥
आगळें देखोनि पराचें । मिळणीं मिळावें[1] तयांचे ।
या वेगळे प्रयत्न[2] वाचे । काय[3] बोलों[4] सांग[5] पां[6] ॥ १६ ॥
सुयोधन[1] ह्मणे ऐक[2] जनका । उच्छेदावया धर्मादिकां ।
आप्तवर्गाची आशंका । कल्पुं नको मानसीं ॥ १७ ॥
भीष्म येथें न घली[1] मन । दोनी पक्ष[2] त्या समान ।
विदुर बोले धर्मवचन । परी तो[3] स्वार्थें[4] गुंतला ॥ १८ ॥
अश्वत्थामा माझा प्राण । जिकडे पुत्र तिकडे द्रोण ।
कृपाचार्य द्रोणाधीन । तिघे[1] येक[2] निर्धारें ॥ १९ ॥
मुख्य पांडवांचा वैरी । कर्ण हें[1] जाण[2] साचारीं[3] ।
शकुनि सर्पाचिये परी । संधी पाहे दंशावया[4] ॥ २० ॥

---

१३. १ पुत्रा स पु४ ख नां मुं धु तं ; २ वाईट नि ; ३ करावें गो॰२.

१४. १ क्षोभती नि खवर्ग ; २ सकळांचीं नि, सर्वांचीं खवर्ग ; ३-५ नेमिलें करिती नि खवर्ग ; ६-७ त्यासि नि खवर्ग ; ८ उपाय नि, सायालि पु४.

१५. १ मानिती पु धु तं.

१६. १ मिळती नि गो, मिळणें पु४ ख नां, मिळाले मुं ; २ ये पु, यया औं ; ३ मी काय नि ; ३-६ सांग पां मी काय बोलों खवर्ग.

१७. १ दुर्योधन औं मुं गो॰२ ; २ ऐकें नि.

१८. १ घाली नि मुं तं ; २ (+) पैं नि, तव पु४ नां ; ३ (−) पु४ ख नां मुं ; ४ स्वार्थी नि.

१९. १ दोघे नि खवर्ग ; २ येती नि.

२०. १-२ जाण पां नि खवर्ग ; ३ निर्धारीं नि रा ; ४ डंखावया नि औं पु४, खंडावया ख मुं, डंकावया पु नां.

प्रजासेवक द्रव्यदानें । वोळगती[1] जैसीं श्वानें ।
आतां[2] शवें[3] साडिलीं[4] प्राणें । तेवीं[5] जीतचि[6] करावीं[7] ॥२१॥
प्रस्तुत ऐकें एक शब्दु । निकट असतां नित्य समंधु[1] ।
क्षणक्षणा उपजे खेदु । मनोभंग मानसा[2] ॥ २२ ॥
देखोनि उत्कर्षाची राहाटी । विषादवणवा धडके पोटीं ।
घटिकेमाजी[1] अनर्थ कोटी । केवीं धैर्य धरावें ॥ २३ ॥
हे ठेवावे स्थळांतरीं । राजधानीपासूनि दूरी ।
इतुकेन भयाची गळसरी । अर्थ[1] तुटली[2] जाण[3] पां[4] ॥ २४ ॥
बाहेर न पडे[1] न्यून पूर्ण । विचारीं संचरेना आन[2] ।
प्रजा[3] प्रधान[4] सेवकजन[5] । निज[6] मर्यादा[7] वर्तती[8] ॥ २५ ॥
खळा आणि कंटकातें । दोनीच[1] प्रकार बोलिजे[2] येथें[3] ।
उपानहीं[4] भंगावें मुखातें[5] । कां[6] वर्तणें दूरस्थ ॥ २६ ॥
ऐकोनि राजा आठवी मनें । कणिक[1] बोलिला[2] तीं वचनें ।
तात्काळ पातलीं[3] खुणें । विलंब कांहीं न लगतां[4] ॥ २७ ॥

---

२१. १ वोळंगती नि मुं; २–४ अनुसरती जीवें नि खवर्ग; ५–७ आह्मांलागीं सर्वथा नि खवर्ग; ६ निस्तेज धु.

२२. १ संबंधु नि, द्वंद्व औं; २ मानसीं नि, मानसें गो·२.

२३. १ घडीमाजी नि खवर्ग.

२४. १ अर्थीं नि, अर्थें गो·२; २–४ तंतु सुटला पु, तंतु तुटला औं ख मुं, तंतु तुटली पु४ नां.

२५. १ पडतां नि; २ मन नि; ३–४ सामोपचारें नि; ५ बाह्य-गमन नि, सकळही जन खवर्ग; ६–८ करिती ऐसें करावें नि; ८ वर्ततां रा तं.

२६. १ दोन नि; २ बोलिले ख रा तं; ३ ते औं, त्यातें ख, तेथें गो२; ४ उपानई स, उपानःहीं धु तं, उपायें औं पु·४, उपाई ख नां; ५ मुख्यत्वें नि खवर्ग ( दुरस्तें ख ); ६ कीं नि.

२७. १–२ कणिकें बोलिलीं नि ( स प्रसंप्रा ) पु४ ख नां मुं; ३ पावलीं औं रा; ४ लागतां नि ख गो२.

मग ह्मणे गा[1] बुद्धिनिपुणा । हेंचि मानलें माझिया मना ।
सामोपचारें बाह्यगमना । करिती ऐसें करावें ॥ २८ ॥
नृपें प्रेरिले असतां मंत्री । सुवार्ता परिसावीति श्रोत्रीं ।
अवलोकितां सर्व धात्री[1] । स्थळ येकचि दिसताहे ॥ २९ ॥
कनकरत्नाचे डोंगर । दिव्यद्रुमाचे दिव्यागर[1] ।
सरिता वापी सरोवर । स्फटिक शिळीं बांधले ॥ ३० ॥
होमशाळा देवतायतनें[1] । वेदसुघोषशास्त्राध्ययनें[2] ।
सत्रागारें[3] प्रपास्थानें[4] । विश्रामकरें[5] शोभती ॥ ३१ ॥

---

२८. १ ( – ) नि पु, रे औं.

२९. १ धरित्री धु.

३०. १ दीव्याबर धु. २९ व ३० या ओव्या नि खवर्ग मध्यें नसून त्यांच्या जागीं दुसऱ्या पुढील चार ओव्या आहेतः—

ऐसें दुर्योधनेंसी[1] अनुवादन । करी प्रज्ञाचक्षु आपण ।
पुत्रातें आज्ञा देऊन । मग[2] बैसे निवांत ॥ २९ ॥

१ सुयोधनासीं नि ; २ ( – ) औं पु. पु४ मध्येंही ही ओवी नाहीं.

ऐसें चिंतार्णवीं निमग्न । दुरात्मयाचें अंतःकरण ।
तवं पातला प्रधान । तेचि समयीं त्या स्थळीं[1] ॥ २९ अ ॥

१ ठाया नि, जवळीं ख.

करद्वय जोडूनि नमिला[1] नृपति[2] । वृत्तांत सांग तयाप्रति[3] ।
वार्ताहर[4] वारणावती[5]–। हूनि[6] आले[7] नृपवर्या ॥ ३० ॥

१–२ सुमती नि ; ३ राजयाप्रती नि ; ४ वार्ताहेर औं पु नां ; ४–५ वार्ता बाहेर वाखाणिती स ; ६–७ ह्मणोनि आलों स. ख मध्यें ही ओवी नाहीं.

तिहीं वारुणावतीचें[1] वर्णन । केलें तें ऐकें सावधान ।
इंद्रभुवना समसमान । शोभा आली तयासी ॥ ३० अ ॥

१ वारूणावताचे पु४ नां.

३१. १ देवतायनें औं पु ख नां ; २ वेदघोष° नि खवर्ग ; ३ छत्रागारें नि ( छात्रागारें स ), शस्त्रागारें मुं ; ४ प्रवाहस्थानें स, प्रयाणस्थानें नां, प्रणवस्थानें मुं, प्रयास्थानें गो२ ; ५ विश्रांतीकरें औं पु.

फळें[1] शाका[2] सर्व धान्यें । सर्व रसांचीं रसपानें[3] ।
सर्वानंद भोगिजे[4] जनें[5] । स्वर्गातुल्य ते ग्रामीं ॥ ३२ ॥
वारुणावत[1] नामें[2] नगर[3] । सुंदर रमणीक[4] मनोहर[5] ।
उपमे तुळितां अमरपुर[6] । किरातपल्लीसारिखें[7] ॥ ३३ ॥
राजा बोले मधुर वचनीं[1] । धर्मा[2] भीमा[3] मानेल मनीं ।
तरी जाऊनि[4] कौतुक[5] नयनीं[6] । अवलोकूनि येइजे ॥ ३४ ॥
सर्वे घेऊनि बंधु माता । आरुढोनि कांचनरथा[1] ।
छत्रछायेतळीं पंथा । महोल्हासें[2] लोटिजे ॥ ३५ ॥
विनोदवाटिकाशृंगारवनीं[1] । पुरीं[2] सद्नीं शय्यासनीं ।
वस्त्राभरणीं भोजनपानीं । सुख भोगीजे मनेछा ॥ ३६ ॥
माने तवंवरी वसिजे वीरा । पुढती येईजे हस्तनापुरा[1] ।
प्रशस्त वाटेल[2] जरी विचारा । तरीच[3] तैसें[4] वर्तावें ॥ ३७ ॥

---

३२. १ फळ पु४ तं, सफळ औं ; २ शाखा खवर्ग ( ख प्रसंप्रा ) धु गो तं रा ; ३ सर्व पानें नि, संपादनें नां, रसायनें मुं गो·२ ; ४ भोगिती नि ; ५ मनें स नां मुं धु तं.

३३. १ वारणावती नि, वरुणा° पु नां गो·२ ; २ नाम नि ख नां गो·२ ; ३ नगरी नि ; ४–५ आणि मनोहारी नि ; ६ °पुरी नि ; ७ °सारिखीं नि. नि खवर्ग मध्यें पुढील ओवी अधिक आहे:—

ऐकोनि मंत्रियाच्या उत्तरा । पाचारूनि युधिष्ठिरा ।
सन्निध बैसउनि अतिआदर[1] । करिता जाला साक्षपें[2] ॥ ३३अ ॥

१ आदरा नि, अति सत्वर नां, सादर मुं ; २ कौतुकें औं.

३४. १ वाणीं नि ; २–३ ह्मणे धर्मा नि औं, ह्मणे धर्मा भीमा पु·४ मुं ; ४–६ वारुणावती जाउनी औं.

३५. १ कनकरथा नि औं ख मुं ; २ महोत्छायें औं पु.

३६. १ शृंगारवाटिकाविनोदवनीं नि ; २ सुख नि, विश्राम ख ; ३ भोगीं नि.

३७. १ हास्तिनपुरा नि ( स प्रसंप्रा ) ; २ मानेल नि ; ३–४ तरी ऐसेंच नि ; ४ ऐसें औं पु गो.

ऐकोनि नृपाननींची[1] गोष्टी । सुजाणा जाणवलें पोटीं ।
ह्मणे निरोपिसी तें मुकुटीं । पुष्प तैसें वंदिलें[2] ॥ ३८ ॥
पिता गुरु तूं देवमूर्ति । तुझी सेवा ते विष्णुभक्ति ।
तुझी आज्ञा[1] कोटी मुहूर्तीं[2] । तुळितां विशेष[3] अपाडें ॥ ३९ ॥
येचिक्षणीं करीन[1] गमन । ह्मणोनि चरणा[2] केलें[3] नमन ।
कुंतीसहित पांचहि[4] जण । निघते जाले तत्काळीं ॥ ४० ॥
वंदिला[1] भीष्म भारद्वाज । विदुर आणि गौतमात्मज ।
गांधारीचे[2] पादरज[3] । भावें भाळीं चर्चिले[4] ॥ ४१ ॥
चालिले देखोनि महाबळी । दुर्योधन येकांतस्थळीं ।
बैसोनि पाचारिले जवळीं[1] । प्राणमित्र आपुले ॥ ४२ ॥
शकुनि कर्ण दुःशासन । चौथा आचार्यपुत्र जाण ।
पांचै[1] जणीं अपायदान[2] । धर्मोद्देशें[3] कल्पिलें[4] ॥ ४३ ॥
पांडव होमावे हुतांशीं[1] । निश्चय करोनि निज मानसीं ।
पुरोचन पापरासी । पाचारिला जवळिके ॥ ४४ ॥
तो दुरात्मा यवनयाती[1] । दुर्योधनें धरोनि हातीं ।
ह्मणे मित्रा माझिये मती । विश्वासिक तूं येक ॥ ४५ ॥

---

३८. १ नृपाननाची औं पु ; २ वंदीन नि खवर्ग.

३९. १ (+) ते नि खवर्ग ; २ सुमुहूर्तीं नि , मूर्ती पु मुं ; ३ उणी नि.

४०. १ करीं मुं धु गो ; २–३ केलें चरणा खवर्ग रा गो॰२ ; ४ पांचै औं पु ख गो॰२ रा.

४१. १ वंदिले नि खवर्ग ; २–३ °चें पदरज नि पु नां ; ४ स्पर्शिलें नि खवर्ग गो॰२.

४२. १ जंवळीं गो॰२.

४३. १ पांचा नि ; २ आनंदोन नि , अपायपूर्ण औं ; ३ धर्मद्वेषें औं पु४ गो॰२ ; ३–४ पांडवां अपाय कल्पिला नि.

४४. १ हुताशीं नि मुं गो॰२.

४५. १ यवनजाती नि ( स प्रसंप्रा ) .

ऐश्वर्येंसी पृथ्वीतळ । माझें तैसें[1] तुझें सकळ ।
मजसमान भोग अचळ । भोगवीन[2] निर्धारें ॥ ४६ ॥
माझें ऐश्वर्य तुझें जालें । तेथें[1] जें[2] कांहीं अरिष्ट आलें ।
तें पाहिजे निर्मूल केलें । आत्मकार्य[3] ह्मणोनी ॥ ४७ ॥
आज्ञा देऊनि पंडुसुतां । रायें धाडिलें वारुणावता[1] ।
तुवां वळघोनि दिव्यरथा । पुढां गंतव्य करावें ॥ ४८ ॥
मेळवूनि नगरवासी । बहु सन्मानें[1] नेइजे[2] त्यांसी[3] ।
वोपूनि संपत्तीच्या रासी । भोगसुखें भुलवावें[4] ॥ ४९ ॥
विश्वास[1] दाऊनि[2] मानसा । मग पाडावे[3] मृत्यपाशां[4] ।
तोही प्रकार ऐक[5] ऐसा । मी सांगेन त्या रीती[6] ॥ ५० ॥
सहस्र शिल्पिकारां हातीं । महेंद्रसदनातुल्य[1] निगुती ।
आलय रचावें जे[2] युक्ती । चतुरातेंही[3] अगम्य[4] ॥ ५१ ॥
तैलगर्भतरूचां[1] काष्टीं । थाट बांधोनि भूतळवटीं ।
सणसूत्राच्या[2] बांधाटी[3] । आवळावें सुबद्ध[4] ॥ ५२ ॥

---

४६. १ तें नि ; २ ( + ) तुज नि.

४७. १ आणि तेथें औं पु; २ (–) नि औं पु ख गो॰२; ३ आप्तकार्य औं पु.

४८. १ वारणावता नि पु४.

४९. १–२ सन्मान देइजे नि ; ३ त्यांसीं नि ; ४ भुलवावे नि औं पु नां गो॰२.

५०. १–२ विश्वासोनि पु॰४ ख नां मुं ; ३ पाडिजे औं पु ; ४ मृत्युफांसा नि पु॰४ ख नां मुं गो॰२ ; ५ ऐकें नि पु४ गो ; ६ परी नां मुं.

५१. १ महेंद्रातुल्य पु॰४ ख नां मुं , महेंद्रालयातुल्य औं; २ जें स गो॰२ ; ३ चतुरांचिये औं पु ; ४ अचोज खवगं गो॰२ रा.

५२. १ तैल्यगर्भ तरूच्या नि , °तरूचा औं पु रा; २ मेण° नि ; ३ बांधवटी नां धु तं ; ४ सुबंध पु गो२.

वंश सलंब[१] सरळ[२] मोठे । दुरी करून अंतरगांठे[३] ।
अग्नियंत्रऔषधपिष्टे । मुखमर्यादा[४] भरावें[५] ॥ ५३ ॥
ते[१] माझारी[२] देऊनि[३] तया[४] । भेंड मुंज[५] सणकाठिया[६] ।
वंशपात्रीं[७] मढूनियां[८] । मथूनि सारें[९] लेपिजे[१०] ॥ ५४ ॥
राळकर्पूरगंधकतैलें । लाक्षा सर्पिष[१] येकमेळें ।
कालऊनि कर्दमगोळे । भिंतीभाग[२] निर्मावे[३] ॥ ५५ ॥
त्यावरी मृत्तिकेचा लेप । कीजे अत्यंत बहु ना[१] स्वल्प ।
सप्तरंगी दावि[२] वोप । तैसीं[३] चित्रें[४] रेखावीं[५] ॥ ५६ ॥
चतुःशाळा वरि[१] उपरिका । गोपुर[२] शृंगी[३] ध्वजपताका[४] ।
भद्रपोठें[५] रणभूमिका । चैत्यासनें निर्मावीं ॥ ५७ ॥
भरी घालूनि अतसीचूर्ण[१] । भूमी[२] करावी समसमान ।
रमणीकपणें[३] पाहातां मन । कदाकाळीं उठेना[४] ॥ ५८ ॥

---

५३. १ **लंब** पु४ नां मुं ख ; १–२ **सरळ लंब** नि ; ३ **अंतर गोटे** मुं गो२ ; ४ °**मर्याद** स औं पु, °**मर्यादे** नां ; ५ **भरवी** नि ( स प्रसंप्रा ), **भरावी** पु४ , **भरावि** पु ख नां गो·

५४. १ **तें** औं पु मुं ; १–४ **पेशी आइती करूनियां** नि ; २–३ **देउनि माझारी** खवर्ग ; ५ **मुज** स गो·२ तं ; ६ °**काडिया** नि खवर्ग ; ७ °**पात्रें** नि ; ८ **वेढुनिया** पु·४ नां मुं धु , **वेष्टुनियां** औं ख , (+) **सविया** गो·२ , (+) **समया** रा , (+) **सनि (?) या** धु ; ९–१० **सार लपविजे** गो·२ ; १० **लिंपिजे** नि औं पु ख नां मुं.

५५. १ **सर्पिसा** पु४ ख नां ; २ **संधिभाग** नि ; ३ **लिंपावे** नि खवर्ग.

५६. १ (–) औं पु ; २ **दावावी** नि , **दाविजे** औं , **दाखवी** रा तं ; ३ **पेशीं** नि , **तैसें** पु४ ख गो·२ रा तं ; ४ **चित्र** पु४ ख गो·२ तं रा ; ५ **रेखावें** पु४ ख गो·२ रा.

५७. १ (–) नि ; २ **गोपुरे** पु४ ख नां धु ; ३ **शृंगें** औं पु·४ , **शृंग** गो·२ , **शृंगावरी** नि खवर्ग ; ४ **पताका** नि खवर्ग ; ५ °**पीठ** नि औं पु·४ मुं.

५८. १ **अस्थि चूर्ण** नि , **अंतरीं चूर्ण** गो तं ; २ **भूमिका** औं पु ; ३ **रमणीक** औं पु गो·२ ; ४ **नुठावें** नि , **विटेना** औं पु नां.

सर्व संपती[1] भरूनि पुर तें । वस्ती[2] वोपिजे पांडवांतें ।
वर्ष येकपर्यंत तेथें । सुखाडल्या[3] विश्वासें[4] ॥ ५९ ॥
संकेत करूनि[1] ते अवसरीं[2] । पावक प्रदीप्त कीजे[3] द्वारीं ।
अग्नि लागोनि निमाले घरीं[4] । ऐसें लोकीं रूढवावें ॥ ६० ॥
तिळतुल्य वन्हि लागतां देखा । येकसरें[1] उठे[2] भडका ।
ऐसिया गृहीं त्या गृहमखा-[3] । माजी वैरी होमावे ॥ ६१ ॥
कळों नेदिजे[1] आपुल्या मना । तेथें केवीं[2] ठाउकें[3] पडे[4] आना ।
ऐसिया युक्ती[5] विचक्षणा । गुप्त कार्य[6] साधावें[7] ॥ ६२ ॥
ऐसीं दुर्योधनाचीं वचनें । येरें[1] झेलिलीं अंतःकरणें ।
जेवीं कां वांती होतां श्वानें । त्वरें चाटुनि घेइजे[2] ॥ ६३ ॥
माडवृक्षापासूनि देखा । अळुमाळ श्रवतां[1] मद्योदका ।
मद्यपानी[2] वोढवी मुखा । धांवोनिया लगबगें[3] ॥ ६४ ॥
शंखध्वनीचा[1] संतोष[2] । त्यावरी[3] पातला फाल्गुणमास[4] ।
कीं व्यभिचारिया[5] मल्याळदेश । दैवयोगें[6] लाधला ॥ ६५ ॥

---

५९. १ **संपत्ती** नि औं ; २ **वस्तीस** नि औं पु ; ३–४ **विश्वासेंसी सुखवावें** नि.

६०. १ **करूं** नि ; २ **अवस्वरीं** औं पु ख नां , **आवश्वरीं** धु; ३ **करिजे** नि , **करोनि** गो ; ४ **वरी** गो·२ रा.

६१. १ **कसरें** स ; २ **उठी** औं पु नां , **लागेल** मुं ; ३ **गृहमुखा** नि पु४ ख नां मुं रा.

६२. १ **नेदितां** औं पु ; २ (–) नि पु४ , **कें** पु रा , **क** ख नां ; ३ (+) **न** नि पु४ ; ४ **होय** औं पु नां ; ५ **बुद्धी** नि , **कार्य** ख ; ६–७ **कृत्य करावें** ख.

६३. १ **येरीं** नि ; २ **जाइजे** नि.

६४. १ **स्रवती** नि , **श्रवती** गो·२ ; २ **पद्मपाणी** औं पु , **मद्यपानीं** नि ; ३ **लगबगां** नि गो२.

६५. १ **आर्दीच शंखध्वनींचा** नि ; २ **उल्हास** नि ख ; ३ **त्यातें** नां गो तं , **त्यांत** औं पु रा गो२ , **त्यामाजी** ख ; ४ **फाल्गुनमास** नि औं मुं ; ५ **विभिचारिया** पु ख नां धु गो रा तं ; ६ **दैवंयोगें** औं पु नां.

तेवीं साधूंचा उछेदु । करावया दुर्जना अतिआनंदु[1] ।
कुरंगसमुदाय[2] देखोनि व्याधु । हांव[3] बांधे[4] वधावया[5] ॥ ६६ ॥
तेवीं अवश्य ह्मणोनि वचनीं । पुरोचन निघाला तेचिक्षणीं[1] ।
रासभरथातें[2] पिटोनि । वारुणावता पातला ॥ ६७ ॥
येरीकडे[1] पांडववीर । निघतां कौरवांचे भार ।
बोळवीत पातले द्वार । उलंघूनि[2] नगराचें ॥ ६८ ॥
प्रजा प्रधान करिती रुदना[1] । निंदिती भीष्मा दुर्योधना ।
ह्मणती[2] मर[3] हृदयमलिना । धृतराष्ट्रा[4] पापिष्ठा ॥ ६९ ॥
पुत्रलोभें राज्यस्वार्थे । दूरी दवडिलें पांडवांतें ।
आह्मीं जाऊं त्यांसांगातें[1] । धनें सदनें त्यागुनी[2] ॥ ७० ॥
धर्मावीण अधर्मनगरीं[1] । कोण राहील[2] दुराचारी ।
सर्व[3] प्रजा सहपरिवारीं । पांडवांपाठीं चालिल्या[4] ॥ ७१ ॥
हस्तनापुरीं पुत्रांसहित । धृतराष्ट्र आणि गंगासुत ।
राज्य करु[1] आनंदभरित । अनंतकाळ धर्मात्मा[2] ॥ ७२ ॥
वनवासा निघतां श्रीरामें । प्रजा चालिल्या समागमें ।
कीं मथुरे जातां यादवोत्तमें[1] । गोपीजन[2] ज्या परी ॥ ७३ ॥

---

६६ १ °आल्हाद नि ; २ मृग° नि ; ३ हाव नि पु४ ; ४ बांधी नि पु४ ; ५ धरावया धु.

६७. १ तेथुनी औं पु , तत्क्षणीं नि ख ; २ वृषभ° ख नां.

६८. १ तवं येरी° औं पु ; २ उल्लंघूनि नि, लंघोनियां औं धु.

६९. १ रोदना नि ; २ मर खवर्ग ; ३ (+) रे नि औं पु४ मुं , (+) हे पु , (−) ख नां ; ४ धार्तराष्ट्रा औं.

७०. १ °संगातें नि ; २ सांडुनि औं पु.

७१. १ अंधनगरी स धु , धर्म° पु४ गो·२ ; २ राहेल नि मुं तं , राहे औं पु गो२ ; ३ सकळ नि , धर्म तं ; ४ चालिली नि , चालिले गो·२ नां तं.

७२. १ करो नि ( करा स ) पु , करोत औं ख , करूनि पु४ मुं नां धु तं ; २ अधर्मी औं , धर्मात्मे धु.

७३. १ देवोत्तमें नि खवर्ग ; २ गोपीरमणें गो·२.

देखोनि पौरजांचा[1] प्रेमा । अत्यंत श्नेह[2] जाकळी[3] धर्मा ।
आलिंगूनि ह्मणे हो[4] तुह्मां । चित्त माझें न विसंबे ॥ ७४ ॥
राजआज्ञेनें वारुणावर्ती । किंचित्काळ करूनि वस्ती ।
सीघ्र येईन तुह्मांप्रती । हें निश्चयें जाणा[1] पां[2] ॥ ७५ ॥
अळुमाळ विषमतेचा वात । लागतां मातें[1] जाणवा मात ।
तात्काळ येऊनि मनोरथ । पूर्ण करीन मी[2] तुमचा ॥ ७६ ॥
यापरी राहवूनि समस्तां । धर्म वळघतां[1] विजयरथा[2] ।
कौरव ह्मणती विदुरा आतां । आज्ञा माग[3] माघारी[4] ॥ ७७ ॥
संकेत जाणवावया[1] शब्दीं । विदुर पाहे येकांत संधी ।
भवतीं दुर्जनांची मांदी । रक्षीत ठेले तयातें ॥ ७८ ॥
बर्बर बोलती बर्बरदेशीं । म्लेंछभाषा बोलिजे[1] तीसी ।
ते भाषेनें[2] चातुर्यरासी । सावध[3] करी धर्मातें ॥ ७९ ॥
प्रज्ञा शब्दार्थसंकेत जाणे । तो प्राज्ञ[1] ऐसें बोलती शाहणे ।
पराची प्राज्ञा वोळखे[2] मनें । नीतिशास्त्रें[3] सोज्वळीं[4] ॥ ८० ॥
लोहो नव्हे परी अतितिक्षण[1] । काळीज भेदूनि निवटी प्राण ।
तें शस्त्र वोळखे त्या मरण । शत्रुपासाव[2] असेना ॥ ८१ ॥

---

७४. १ **पौरप्रजांचा** नि ; २ **श्नेहें** गो तं, **प्रेमें** नि मुं, **प्रेम** औं पु ख नां, ३ **जाकळे** नि औं ख मुं ; ४ ( – ) औं पु नां मुं.

७५. १ **जाण** पु·४ ख नां मुं गो तं ; १–२ **जाणावें** नि, **जाणिजे** औं.

७६. १ **मज** खवर्ग ; २ ( – ) खवर्ग गो२.

७७. १ **वळंघे** नि पु. **वळघला** औं ख मुं नां ; २ **रथावरुता** नि ; ३ **मागा** नि, **मागे** पु४ गो·२ ; ४ **माघारीं** नि

७८. १ **जाणावया** पु४ औं गो२.

७९. १ **ह्मणती** औं पु, **बोलती** पु४ नां मु ; २ **भासेन** गो·२, **भाषणें** औं ; ३ **संज्ञा** नि.

८०. १ **प्रज्ञावंत** औं पु ; २ **ओळखी** नि पु४ ; ३ °**शास्त्री** नि मुं, °**शास्त्र** पु·४ ख ; ४ **सोज्वळ** नि खवर्ग.

८१. १ **अतितीक्ष्ण** नि मुं तं ; २ **कल्पांतिहि** नां.

विवरगर्भी असतां प्राणी । वणवा[1] अथवा सूर्यकिरणीं ।
दाहिला न वचे हें[2] सुजाणीं । जाणितलें पाहिजे ॥ ८२ ॥
मार्ग नोळखे चक्षुहीन । न कळे दिशा केउती[1] कोण ।
अधैर्य पुरुषातें कल्याण । उभय लोकीं असेना ॥ ८३ ॥
सकामातें[1] न साधे सिद्धी । सुख[2] न पवे[3] अशांत क्रोधी ।
अधैर्यवंत ऐश्वर्यपदीं । पावो न शके सर्वथा ॥ ८४ ॥
शत्रुसमंधीं[1] असावधान । आलस्य निद्रा अधैर्य पूर्ण ।
तेणें प्रयत्नेंकरूनि[2] मरण । निज पालवीं बांधले[3] ॥ ८५ ॥
अमित्रमुखींचा[1] शब्द सुरस । तो विषकमळाचा[2] सुवास ।
आलिंगनीं मैंदपाश । अतुट कंठीं शिरकला[3] ॥ ८६ ॥
अन्नस्वरूपें काळकूट । गृहस्वरूपें हव्यवाट ।
द्यूतस्वरूपें पाश कपट[1] । उत्तरोत्तर जाणावें ॥ ८७ ॥
मन राखोनि सावधवृत्ती । हितोपदेश धरणें[1] चित्तीं ।
आत्महिताचे गूढपंथीं[2] । नित्याभ्यासें[3] वर्तिजे[4] ॥ ८८ ॥
अहोरात्र अटण करितां । तो रात्रीही न चुके पंथा[1] ।
नक्षत्रज्ञानिया सर्वथा । दिशाभूली न[2] भूले[3] ॥ ८९ ॥

---

८२. १ अग्नीनें नि पु नां, ( – ) पु४ मुं ; २ ( – ) नि ख नां.

८३. १ कोणती मुं.

८४. १ सकामतेनें नां मुं, सकाम पु४, सकामतेची धु ; २ सुखा नि धु गो ; ३ पावे नि पु४ ख मुं गो२ तं.

८५. १ शत्रुसंबंधीं नि तं ; २ आवंतूनियां नि, प्रयत्न करूनि ख रा तं ; ३ बांधिलें नि

८६. १ असित्रसुखाचा रा तं ; २ विषकंदाचा ख, विषपद्माचा औं ; ३ शिरकमला गो॰२ तं.

८७. १ प्रगट नां, कुट मुं.

८८. १ मानूनि नि, धरूनि खवर्ग ; २ निगूढ॰ औं पु ख, मुगुटपंथीं पु४ ; ३ नित्याभ्यासीं नि, अभ्यासवीत ख ; ४ वर्तावें नि, असिजे ख, वर्तती नां.

८९. १ पथा नि; २–३ भुलेना औं पु ख ; ३ पडेची नि.

हृदई वर्तला वृत्तांत[1] । तो पंचप्राणासींच विदित ।
ज्ञाते आपुला गुह्यार्थ । बाह्य[2] प्रगटों नेदिती ॥ ९० ॥
ध्रुवमंडळ[1] घालोनि पाठीं । अगस्तिचक्र लक्षूनि दृष्टी ।
दक्षण[2] भेदितां जगजेठी । विजयी जाला हनुमंत ॥ ९१ ॥
श्रेष्ठ जाणती श्रेष्ठ गुण । हृदई असतां[1] श्रीकृष्णस्मरण[2] ।
अपायकाळीं संकटहरण । उपाय रचे[3] आपैसा[4] ॥ ९२ ॥
मानस[1] धाडिजे कृष्णापासीं । कां[2] कृष्ण[3] ठेविजे निज[4] मानसीं ।
तैं[5] अरिष्टें भंगोनि आपैसीं । उपाय येती सामोरे[6] ॥ ९३ ॥
बुडवितां[1] बुडऊं न शके आप । दंशिते[2] मित्र[3] होती[4] सर्प[5] ।
विषें मरतया अमुप । अमृत[6] जोडे[7] प्राशना[8] ॥ ९४ ॥
गृहीं[1] धडकतां[2] प्रळयाग्नि । विवरीं[3] मार्ग दे मेदिनी ।
षडेंद्रियां[4] चक्रपाणि । सर्वे[5] रक्षी सातवा[6] ॥ ९५ ॥
येकट[1] वनामाजी पडतां । धैर्य देऊनि दवडी[2] व्यथा ।
अपाय चिंती विष्णुभक्ता । तोचि आधीं[4] विनाशे[5] ॥ ९६ ॥

---

९०. १ व्रतांत पु४, वृतांत पु नां धु गो·२; २ बाहेर नि नां.

९१. १ ध्रुव° औं पु ख नां धु गो·२ रा, ध्रुरु° मुं; २ दक्षिण नि औं तं.

९२. १ स्मरतां नि; २ श्रीकृष्णचरण नि गो·२, श्रीकृष्ण पु; ३–४ येती सामोरे नि.

९३. १ मन गो, मनासि गो२; २ कीं खवर्ग, (–) नि; ३ कृष्णच्चि नि पु ख; ४ (–) नि औं पु नां मुं; ५ तेणें नि; ६ सामोरें पु४ मुं गो·२ रा.

९४. १ बुडतां औं धु तं; २ दंशकतें नि, दंशितां गो·२; ३–५ सर्प होती अकोप नि; ६–७ उदक न मिळे पु४; ८ प्राशनीं नि.

९५. १ ग्रहीं पु४ ख नां, घरीं गो·२; २ धडकल्या नि, धडकल्यां औं पु; ३ विवर नि; ४ षडिंद्रियें नि; ५ सत्व नि; ६ पांचवा गो·२.

९६. १ एकटें नि; २ बुडवी नि; ३ वेथा औं ख नां धु गो, व्येथा पु·४; ४–५ पावे नाशातें औं.

रात्री[1] उमजे मार्गरेखा । जललंघनीं सांपडे नौका ।
आतुडतां राक्षसमुखा । तेथेंही[2] रक्षी[3] श्रीकृष्ण[4] ॥ ९७ ॥
संकटीं क्षमा विष्णुस्मरण । त्यासी[1] तात्काळ[2] गुरुदर्शन ।
गुरुदर्शनें समाधान । आपदा वाटे संपदा ॥ ९८ ॥
भंगूनि विघ्नाचा उमाळा । विजयलक्ष्मी घाली माळा ।
पुढती[1] आत्मपदाचा सोहळा । भगवद्भक्त पावती ॥ ९९ ॥
जाळितां न जळे दैत्यकुमर । जाळितां न जळे हनुमंत[1] वीर ।
गाईगोपाळांचा[2] भार । जळतां कोणें रक्षिला[3] ॥ १०० ॥
तेंचि[1] स्मरण धरितां पोटीं । जगीं स्फुरेल[2] चतुर्थ[3] गोष्टी ।
मेघश्याम असतां पाठीं । ताप संताप असेना ॥ १०१ ॥
ऐसें बोलोनि विदुर सुमति । ह्मणे धर्मा भेदलें चित्तीं[1] ।
कळलें कळलें ह्मणोनि हातीं । चरण येणें[2] वंदिले ॥ १०२ ॥
असो हें[1] राहऊनि समस्तां । पांडव चालिले[2] वारुणावता ।
मार्गीं आदरें विचारी माता । ज्येष्ठपुत्रा सुजाणा ॥ १०३ ॥
विदुर बोलिला संकेत वचनें । दोघे[1] पावलेति येके खुणें ।
तें काय ऐसें[2] आमुच्या मनें । जाणीतलें पाहिजे ॥ १०४ ॥
जननीलागी बोलिजे धर्में । विषाची बाधा येकल्या भीमें ।
भोगिली[1] आतां कौरवाधमें । अपाय सर्वां रचिलासे ॥ १०५ ॥

---

९७. १ रात्रीं नि (स प्रसंप्रा); २ तेथें नि पु; ३ रक्षकु औं पु ४ श्रीविष्णु नि, परि विष्णु खवर्ग, त्रिष्णु धु.

९८. १–२ तात्काळ त्यासी नि खवग.

९९. १ (–) नि खवर्ग.

१००. १ हनुमान् नि, हनुमा खवर्ग (नां प्रसंप्रा) धु तं रा गो॰२ २ °गोपाळाचे औं पु ख; ३ रक्षिले पु४ ख नां, राखिले औं पु.

१०१. १ तेचि नि पु४ ख; २ स्फुरली नि; ३ चातुर्य नि.

१०२. १ चीतिं पु८ नां; २ येरें नि औं पु४ गो॰२ रा.

१०३. १ (–) औं पु; २ निघाले औं पु.

१०४. १ दोघें नि (स प्रसंप्रा); २ (–) औं पु४ गो.

१०५. १ सोसिली नि.

गृहापासूनि उपजेल वन्ही । तेणें घालितां प्राणांत[1] व्यसनीं ।
कृपा करूनि चक्रपाणि । विवरोदरीं रक्षील ॥ १०६ ॥
वनोपवनीं भोगितां क्लेश । वर्षें लोटती[1] द्वादश ।
प्राप्त जालिया[2] स्वाडदिवस[3] । क्लेश सर्वही[4] नासती ॥१०७॥
होतील सुहृदांचिया भेटी । पुढती बैसोनि[1] राज्यपटीं[2] ।
विदुर बोलिला त्या[3] गोष्टी- । माजी अर्थ ऐसा हा[4] ॥ १०८ ॥
असो[1] सत्वरा[2] क्रमोनि पंथा । पांडव पातले[3] वारुणावता ।
पुढां[4] राजदूतीं वार्ता । पौरजांतें[5] जाणविली ॥ १०९ ॥
रथ कुंजर अश्वपृष्टीं[1] । वळघोनि[2] जनाचिया थाटी ।
उपायनें घेऊनि भेटी । येते जाले असंख्य[3] ॥ ११० ॥
सडे चौक[1] रंगमाळिका । मखरें तोरणें ध्वजपताका ।
पांडवागमनें[2] पवित्र लोकां । परम[3] आल्हाद[4] न संटे[5] ॥१११॥
अष्टमीमाजी शनि रोहिणी । शुभ[1] योगीं[2] मंगळ दिनीं[3] ।
मंगळ वाद्यांचिये ध्वनी । धर्म नगरीं प्रवेशे ॥ ११२ ॥

---

१०६. १ **प्राण** नि.

१०७. १ **लोटतील** नि तं; २ **जालियां** औं पु·४ तं; ३ **सुवाडदीस** नि, **भाग्यदिवस** औं पु, **पुण्यदिवस** नां, **आठदिवस** तं; ४ **सर्व** नि पु४ नां मुं, **सर्वै** रा. ख मध्यें २ व ३ चरण पुढीलप्रमाणें आहेतः— **प्राप्त जालियां पुण्यदिवस । तंव आवघिया सुहृदास ।**

१०८. १ **बैसों** नि पु; २ **राजपटीं** नि नां गो२; ३ **ते** औं पु; ४ **कीं** नि, **असे** औं पु मुं

१०९. १ **ऐसे** औं पु; २ **सत्वर** नि औं पु मुं धु; ३ **पावले** नि ख नां; ४ **पुढें** नि औं पु४ मुं; ५ **पौरजनातें** नि.

११०. १ **अश्वपुष्टी** औं पु·४ नां गो·२; २ **वळंघूनियां** नि; ३ **सन्मुख** नि.

१११. १ **चोक** नि (स प्रसंप्रा); २ **°गमन** नि, **°गमें** औं पु; ३-४ **परमानंद** औं पु ख; ५ **संठे** नि मुं. नां मध्यें ३ व ४ चरण पुढीलप्रमाणें आहेतः—**घरोघरीं उभविले देखा । धर्म आगमन तोष ।**

११२. १ **शोभन** नि खवर्ग; २ **योग** नि औं मुं; ३ **सदनीं** पु४.

जीर्ण विशाळ राजसदन । प्रथम[1] वोपिलें[2] वस्तीस्थान[3] ।
नाना उपभोग संपदा[4] जन[5] । घेऊनि पुढां[6] वोळगती[7] ॥११३॥
नित्यनैमित्यधर्माचरण[1] । वेदशास्त्रपुराणश्रवण[2] ।
ब्राह्मणभोजनें अनेक दान[3] । दिवसदिवसां[4] आगळीं[5] ॥ ११४ ॥
बंधु माता ऋषीसहित । दहा दिवस लोटल्या तेथ ।
पुढें वर्तलें विपरित । तें तूं[1] परिसें नरेशा[2] ॥ ११५ ॥
नगराधिकारी पुरोचन । पारपत्य[1] तया आधीन[2] ।
धर्मासि करोनियां नमन । बद्धहस्तीं[3] विनवितु[4] ॥ ११६ ॥
श्रेष्ठ रायाचें आज्ञावचन । इंद्रभुवना समसमान ।
चित्र विचित्र राजसदन । धर्मालागीं निर्मावें ॥ ११७ ॥
तेथें करऊनियां वस्ती । सेवा करावी अहोराती ।
जें[1] जें[2] इछिल[3] मनोवृत्ती । तें तें तात्काळ निवेदा[4] ॥ ११८ ॥
ऐसी राजाज्ञा समर्थ । कथिल्याहूनि विशेष[1] येथ ।
रचना[2] केलीसे अद्भुत । ते स्वामीनें[3] पाहावी ॥ ११९ ॥
राजाज्ञेनें निर्मिलें धाम । राजाज्ञेनें सुखविश्राम ।
स्वामीनें[1] केलियां संभ्रम । श्रवण[2] होईल जनकातें ॥ १२० ॥

---

११३. १–३ **पांडववस्ती नेमिलें जाण** औं ; ३ **वसतिस्थान** नि ; ४ **संपत्ती** नि , **संपति** ख धु ; ४–५ **संपादून** औं पु ; ५ **जाण** मुं धु ; ६ **पुढें** नि पु गो तं ; ७ **वोळंगती** नि. औं मध्यें चौथा चरण पुढीलप्रमाणें आहे:— **पुरोचन ते काळीं** ।

११४. १ °**चरणें** स औं पु ख नां धु ; २ °**श्रवणें** स औं पु·४ ख नां धु ; ३ °**दानें** स औं पु·४ ख नां धु रा ; ४ **दिवसें दिवस** नि औं पु मुं ; ५ **आगळें** नि.

११५. १ ( – ) खवर्ग ; २ **नरेंद्रा** नि औं पु ख.

११६. १ **पारिपत्य** नि मुं ; २ **अधीन** नि ; ३ °**हस्तें** नि मुं ; ४ **निववीत** स , **मीरवीत** पु४. ही व पुढील दोन ओव्या गो२ मध्यें नाहींत.

११८. १–२ **जे जे** पु ख धु ; ३ **इच्छिजे** नि ; ४ **निवेदीं** नि.

११९. १ **अधिक** औं पु ; २ **जे जे रचना** औं पु ; ३ **स्वामीनीं** नि औं मुं गो.

१२०. १ **स्वामीनीं** नि औं ; २ **सुख** नि खवर्ग.

माझी सार्थक करावी सेवा । संतोष द्यावा नरपार्थिवा ।
आजिचा मुहूर्तयोग[१] बरवा । गृहप्रवेशा[२] कारणें[३] ॥ १२१ ॥
परिसोनि पुरोचनाचें वचन । बंधुसहित कुरुनंदन ।
गृह[१] प्रवेशे विचक्षण । आठवूनि विदुरोक्ति ॥ १२२ ॥
उपरिकामध्य[१] गर्भागार[२] । भिन्न[३] शाळा[४] बाह्य[५] प्रकार[६] ।
रचना देखोनि पामर[७] नर[८] । ह्मणती[९] धन्य[१०] कर्त्याची ॥१२३॥
सुंदर[१] रमणीक दिव्य[२] मंदिर[३] । ऐसें बोलती[४] नारी नर ।
धर्मावेगळा[५] गुह्य विचार । आन कोणी जाणेना ॥ १२४ ॥
दांभिकभजनाचा[१] पसारा । आदर उपजवी नारीनरां[२] ।
अंतरीं[३] असत्यदोषथारा[४] । तो[५] येक[६] जाणे[७] ईश्वर[८] ॥१२५॥
जेवीं मैंदाचा पवित्राचार । प्रगट[१] दिसे अतिसुंदर ।
कां[२] वेश्येचा[३] मुखशृंगार[४] । भूली पाडी कामिकां[५] ॥ १२६ ॥
बचनाभी[१] कांडी गुळगुळी । सर्पआंगींची[२] मवाळी ।
खदिरांगाराची सोज्वळी । रत्नमाळा अभासे[३]॥ १२७ ॥

---

१२१. १ **सुमुहूर्त** स, **सुमुहूर्त आहे** औं पु; २–३ °**प्रवेश करावया** नि.

१२२. १ **गृहीं** नि, **ग्रह** पु४ ख नां गो२ रा.

१२३. १ °**मध्यें** नि, **उपरिकाधाम** औं, **उपरिका** पु·४ ख नां मुं; २ **गाभाकार** पु, **चित्राकार** औं; ३–६ **माजी शोभले मंडपाकार** औं; ५–६ **बाह्याकार** गो·२; ७ **नागर**; ८ (–) औं; ९–१० **धन्य ह्मणती** नि.

१२४. १ (–) ख; २–३ **मनोहर** गो; ४ **ह्मणती** खवर्ग; ५ **अधमावेगळा** स.

१२५. १ **दांभिकजनाचा** ख नां धु; २ °**नरा** नि पु४ ख नां तं; ३ **अत्यंत** औं पु, (–) ख; ४ **दोषाचा थारा** नि औं पु, **दोषाचा वारा** ख; ५ **तें** नि पु, **ते** पु४ नां; ५–८ **तेथ जाणता ईश्वर** औं.

१२६. १ **बाह्य** नां; २ **कीं** नि; ३ **वैश्येचा** औं पु·४ ख मुं; ४ **शृंगार** नां मुं, **अतिशृंगार** पु४; ५ **कामिका** नि पु·४ ख नां गो२

१२७. १ **बचनागाची** नि पु गो, °**नाग** औं पु४ ख नां मुं; २ **नातरी सर्प**° औं पु, **सर्पाआंगींची** नि; ३ **आभासे** नि पु४.

व्याघ्र दयाशील लोकीं । धेनु[१] कुरवाळी[२] निजनखीं[३] ।
फणाग्रीं[४] वाऊनि[५] उदकीं । सर्प खेळवी भेकांतें[६] ॥ १२८ ॥
सवंचोराची[१] निर्लोभ सेवा । जाणतां[२] विश्वास नुपजे[३] जीवा ।
तेवीं ते गृह देखोनि पांडवा । गोड न वाटे मानसा[४] ॥१२९॥
बोलतां तर्क न[१] पडे[२] जना । ऐसीया दाऊनि संकेतवचना ।
ह्मणे डोळसा भीमसेना । गृह दृष्टी[३] लक्षिजे[४] ॥ १३० ॥
आपणा ह्मणविसी विचक्षण । तरी येथें प्रगटीं[१] शाहाणपण[२] ।
निकें मानलें[३] निकेतन । वासा[४] योग्य आम्हुतें ॥ १३१ ॥
गृह किंवा गृहाचें मुख । क्षय[१] किंवा क्षयकारक ।
क्षमालय[२] कीं निज निष्टंक[३] । यमालय हें[४] सांग पां[५] ॥१३२॥
भिंती स्पर्शोनियां पाणी । अवघ्राण करीं आपुलें घ्राणीं ।
कुवास[१] सूचना सांगे मनीं । गृहवास[२] कुवास[३] ॥ १३३ ॥
गंधक वसा[१] तैल[२] घृत । लाक्षाशाल्मलीसारभरित[३] ।
त्रिविध पिंडिका[४] मेण[५] मिश्रित । कर्पूर भरीं[६] भरलासे ॥१३४॥

---

१२८. १–२ **बाह्य शौच्यता** औं पु ; ३ **पैं टाकी** पु, **प्रगट निकी** औं, **नखीं** पु४ ख मुं, **कौतुकीं** नां ; ४ **फणी** औं पु ; ५ **वाहूनि** नि नां ; ६ **बेडुका** नि.

१२९. १ **सवें चोराची** नि नां गो·२ ; २ **जाणता** नि, **जाणत्या** औं पु ; ३ **नुपजवी** नि ; ४ **मानसीं** नि औं पु.

१३०. १ (–) स पु४ धु तं ; २ **पडेल** नि ; ३ **दृष्टीं** नि (स प्रसंप्रा) पु तं ; ४ **देखिलें** नि औं पु मुं, **लक्षिले** ख नां धु गो तं.

१३१. १ **प्रगट करीं** नि ; २ **निज ज्ञान** औं पु, **ज्ञान** नि पु४ ख नां मुं ; ३ (+) **कीं** पु, **हें** औं ; ४ **वस्ती** औं.

१३२. १ **अक्षय** नि नां ; २ **क्षेमालय** नि मुं गो ; ३ **निष्टंक** नि ; ४ **मज** नि ; ५ (–) नि पु ख.

१३३. १ **सुवास** स ; २ (+) **कीं** नि खवर्ग ; ३ **सुवास** नि (स प्रसंप्रा) पु४ ख नां मुं, **वनवास** औं पु.

१३४. १ **रस** औं पु·४ नां मुं, **वास** धु गो·२ ; १–२ **तैल रस** नि ख ; ३ **लाखशाल्मली°** पु४ ख नां मुं गो ; ४ **पेंडी** औं पु ; ५ (–) गो·२ ; ६ **भारी** ख, **सरिसा** गो, **परी** तं.

द्रव्यें प्रत्यक्ष सांगती[1] नयनीं । वसती त्यांतें भक्षील[2] वन्ही ।
अग्नियंत्र[3] रचिलें[4] धरणीं । गृहाकार[5] जाण पां ॥ १३५ ॥
विदुर बोलिला त्या त्या[1] युक्ती । तात्काळ पातल्या प्रतीती[2] ।
भीम ह्मणे सर्वज्ञ सुमति[3] । विनंति[4] ऐकें[5] समर्था[6] ॥ १३६ ॥
येवढा दिसे[1] जरी[2] अनर्थ । तरी अगत्य काय वसाव्या[3] येथ ।
पूर्वी वास्तव्य केलें जेथ । तेचि गृहीं[4] वसावें ॥ १३७ ॥
धर्म ह्मणे नव्हे युक्ति । आह्मीं नेणतीं[1] सर्वार्थी[2] ।
ऐसें मानलें[3] वैरियां चित्तीं[4] । तेंचि[5] यथार्थ दावणें[6] ॥१३८॥
कुड[1] मंत्र केला वधावया । तो सूचला[2] पांडवां[3] ययां[4] ।
ऐसें जाणतां महा[5] अपाया । तात्काळिक करितील[6] ॥ १३९ ॥
फावेल[1] त्याचा[2] करितील घात । येकाचेनि मृत्यें[3] सकळां[4] मृत्य ।
यालागीं सांगेन तो सिद्धांत । सर्वही[5] तुह्मी स्वीकारा[6] ॥१४०॥
अग्नीपासाव गृही[1] मरण । ऐसा निश्चय मानूनि[2] पूर्ण ।
अहोरात्र सावधान । होऊनि येथेंचि वसावें ॥ १४१ ॥

---

१३५. १ दिसती औं पु ; २ ग्रासील औं पु , ३ °यंत्रें नि गो·२ ; ४ रचिलीं नि गो·२ ; ५ °कारें औं पु मुं रा.

१३६. १ ( – ) नि ; २ प्रचीति नां तं ; ३ मूर्ती स पु४ ख नां मुं ; ४–६ विज्ञापना परियेसीं नि.

१३७. १–२ जरी दिसे मुं गो·२ ; ३ वसावया नि खवर्ग धु ; ४ स्थळीं नि.

१३८. १–२ नेणते सर्वार्थी नि ; ३ मानेल पु नां ; ४ चीतिं पु४ नां मुं गो२ ; ५ तेचि नि पु४ मुं रा ; ६ दाखवणें औं पु.

१३९. १ कुडा नि ; २ सुचविला नि , सुचावला रा ; ३–४ पांडवेया नि ; ५ ( – ) औं पु ; ६ रचितील मुं.

१४०. १ फावल्या नि ; २ ( – ) नि ; ३ मरणें पु·४ ख नां मुं रा तं ; ४ ( + ) सी नि पु ; ५ सकळै नि , सकळही औं पु·४ , सकळीं नां ख मुं ; ६ करावा मुं गो२.

१४१. १ गृह नि पु·४ नां मुं ; २ जाणोनि पु४.

पुरोचनेंसी[1] विश्वास । विशेष[2] दावणें दिवसेंदिवस ।
त्याचिया कापटयाचा[3] लेश[4] । नेणों[5] ऐसें[6] दावावें[7] ॥ १४२ ॥
घेऊनि भोळिवेची बुंथी । आपणा रक्षिजे सावधवृत्ती ।
वैरीसीं[1] तरावे[2] सुमती । बुद्धिबळें आपुलिया ॥ १४३ ॥
विवरद्वारा करूनि वाट । सेखीं[1] पुरोचनासकट[2] ।
गृहीं[3] लावोनि हव्यवाट । साहींजणीं निघावें ॥ १४४ ॥
ईश्वरसाधुऋषीश्वरां[1] । भीष्मद्रोणादि[2] थोरथोरां[3] ।
कौरवांचिया अनाचारा[4] । उघड[5] दृष्टी दावावें[6] ॥ १४५ ॥
दुष्ट दुरात्मे विश्वासघाती । धार्तराष्ट्र पापमूर्ती ।
ऐसें सकळांचे प्रतीती । माने तैसें[1] करावें ॥ १४६ ॥
साक्षी[1] असलियां[2] साधुजन । सात्विकां वाढतें[3] कल्याण ।
दुर्जन पावती अकल्याण । हें निश्चयें जाण पां ॥ १४७ ॥
ऐसें वदोनि[1] पांडवाधीश । पुरोचनेंसी[2] अतिविश्वास ।
दाखऊनि[3] गृहप्रवेश । करिता जाला संतोषें[4] ॥ १४८ ॥

---

१४२. १ **पुरोचनासी** नि ; २ **विषद** पु ; ३ **कपटाचा** नि खवर्ग ; ४ **अंश** नि ; ५ **नेणों** नि औं पु ; ६ **ऐसा** नि ख ; ७ **दावणें** नि पु४ ख , **वर्तनें** औं , **दाखवणें** पु मुं.

१४३. १ **वैरियांसि** नि ; २ **तरावें** नि गो·२ रा तं

१४४. १ **शेखीं** पु·४ ; २ °**सगट** नि औं पु नां ; ३ **गृहा** नि.

१४५. १ °**ऋषीश्वर** नि, °**ऋषेश्वर** औं पु ; २ °**द्रोणा** नि ख , °**द्रोणां** धु ; ३ °**थोर** नि औं पु ; ४ **कपटाचार** नि, **अनाचार** औं पु ; ५ **प्रगट** नि ; ६ **दावणें** नि , **दाखवणें** औं पु.

१४६. १ **ऐसें** ख मुं. ही ओवी औं पु·४ मध्यें नाहीं.

१४७. १ **साक्ष** स औं पु ; २ **असतां** नि खवर्ग, **असल्या** गो·२ , **असिल्या** तं ; ३ **वाटतें** नि औं पु गो२.

१४८. १ **बोलोनि** नि ; २ **पुरोचनासीं** नि ; ३ **दावूनियां** नि औं पु ; ४ **साक्षेपें** ख.

वेदविदुष[1] दशायुत[2] । घृतशर्करापायसयुक्त ।
सेवितां भोजनीं जाले तृप्त । ह्मणती निर्विघ्न राजया ॥ १४९ ॥
धेनु वस्त्रें[1] द्रव्य[2] दक्षणा[3] । इछेनें देतां बहु ब्राह्मणां ।
तोषले देती आशीर्वचना । रिपुक्षयोस्तु[4] ह्मणउनी ॥ १५० ॥
करूनि पारधीच मिष । वनोपवनीं लोटिती दिवस ।
रात्रीं सावध पांचै[1] पुरुष । हरिकिर्तनीं[2] जागती[3] ॥ १५१ ॥
वर्षपर्यंत[1] ऐसीया रीती । जातुषगृहीं[2] केलिया[3] वस्ती ।
पुढें वर्तलें[4] तें[5] नृपति[6] । जन्मेजया परियसें[7] ॥ १५२ ॥
इति श्रीभारते[1] आदिपर्वणि । सभाग्य श्रोतियां तीर्थपर्वणी ।
प्रयोजी[2] मुक्तेश्वराची वाणी । मनें[3] सुस्नात व्हावया ॥ १५३ ॥

इति श्रीभारते आदिपर्वणि पञ्चत्रिंशोऽध्यायः ॥

---

१४९. १–२ विवेकविषाददशायुत नि, विवेकविदुष° खवर्ग.

१५०. १ वस्त्र नि; २ बहु नि गो; ३ दक्षिणा नि मुं; ४ °क्षयो औं पु.

१५१. १ पांचही नि औं पु४ नां धु तं; २ °कीर्तनें पु·४; ३ गर्जति ख.

१५२. १ वर्षयेक औं; २ जातुषालयीं नि; ३ केली नि खवर्ग; ४–५ वर्तली ते औं पु; ६ युक्ती पु, उक्ती औं; ७ परियेसीं नि.

१५३. १ °भारत नि ख नां; २ प्रयाग नि ( स प्रसंप्रा ); ३ मन नि.

॥ श्री ॥

# अध्याय छत्तिसावा

## श्रीगणेशाय नमः

अयनद्वय सावधानें । जातुषालयीं[1] कुरुनंदनें ।
वास्तव्य करितां पुरोचनें । परम आल्हाद मानिला ॥ १ ॥
कौरवांचे अपराध सर्व । विसरोनि[1] विसरले पांडव ।
आमुच्या अपायाचें[2] नांव । अळुमाळ[3] कांहीं[4] नेणती[5] ॥ २ ॥
दुर्योधनें कथिलें शब्दीं । तें कार्य साधूं ऐसिये संधी[1] ।
विलंबीं घालितां कुबुद्धी[2] । आप्त[3] मातें ह्मणतील ॥ ३ ॥
संकेत होतांचि अळुमाळ । गृहीं प्रदीप्त करूं अनळ[1] ।
इतुकेनि निःशैल्य[2] जालें सकळ । जेवीं आरोग्य रोगिया ॥ ४ ॥
मग भूपाळ दुर्योधन । तैसाचि[1] विभागी[2] पुरोचन ।
देवेंद्रपदा[3] समसमान[4] । भोग[5] भोगीन[6] इहलोकीं ॥ ५ ॥
ऐसें विचारूनि दुष्ट । पाहे कौरवाज्ञेची वाट ।
येरीकडे भाग्य श्रेष्ठ । पांडवांचें परियेसा[1] ॥ ६ ॥
ध्याना येऊनि कृष्णमूर्ती । उपबोध[1] करी विदुरा चित्तीं[2] ।
पांडव पाडावया पावकावर्ती । अपाय[3] दृष्टी[4] रचिलासे[5] ॥७॥

---

१. १ जत्वालईं पु४.

२. १ समुळ पु४ ; २ अपराधाचें खवर्ग ; ३–५ नाहीं अळुमाळ ठाऊकें नि खवर्ग रा ; ५ असेना गो२.

३. १ सिद्धी स ; २ बुद्धी पु ; ३ अनाप्त नि पु नां , अनाम औं.

४. १ अनिळ नि ; २ क्षेम नि , निःशल्य औं तं.

५. १ (+) मी औं पु ; २ (+) मी नि पु४ मुं ; ३ °पदैंसीं औं ; ४ पदसमान औं रा , समान ख धु गो ; ५–६ सुख भोगूं नि.

६. १ परिसीजे धु.

७. १ उपायबोध नि , उपावबोध धु , उद्बोध औं पु ख नां मुं ; २ प्रती औं पु ख नां तं ; ३ उपाय पु४ ख नां मुं ; ४ दुष्टीं औं मुं गो२; ५ रचीयेला पु४.

यालागीं अत्यंत विश्वासिक । सीघ्र प्रेरिला पाहिजे खनक[1] ।
ज्यातें प्रगट नोळखे लोक । जेवीं[2] प्राकृत[3] सिद्धातें[4] ॥ ८ ॥
धरा करावया भारातीत । अवतार[1] धरीं[2] मी[3] अनंत[4] ।
जन्मलों यादवकुळाआंत । हें तूं येक जाणसी ॥ ९ ॥
निर्दाळावया कौरवांतें । त्यांचे अपराध निमित्य[1] त्यांतें ।
करणें असे[2] निश्चितें । वर्म तूतें कळलेंसे ॥ १० ॥
यालागीं खनकाचिये करीं । मार्ग रचोनि विवरद्वारीं ।
रात्रींत[1] न्यावें देशांतरीं । असंख्यात योजनें ॥ ११ ॥
प्राप्त होतां[1] विषम स्थळें । रक्षिजेतील[2] त्यां गोपाळें ।
पुढां[3] प्रगट होतील काळें । कृपाबळें माझिया ॥ १२ ॥
विजयलक्ष्मी वोपुनि त्यांतें । उणें आणीन[1] वैरियांतें[2] ।
यालागीं पाठवीं[3] खनकातें । मनोवेगें[4] सुमित्रा ॥ १३ ॥
मानसपूजा करितां ध्यानीं । हृदयनिवासी[1] चक्रपाणि ।
बुद्धिबोधक[2] उन्मेषदानीं । प्रेरक जाला या[3] रिती[4] ॥ १४ ॥
विदुरें उघडोनियां नेत्र[1] । परोपकारी अतिपवित्र ।
खनक आपुला प्राणमित्र । वातवेगें[2] प्रेरिला ॥ १५ ॥

---

८. १ खणिक औं मुं, सेवक गो रा; २–४ जीव प्रकृति स्वभावें मुं. नि मध्यें ८ व ९ ओव्यांची अदलाबदल आहे.

९. १–४ अवतरलों मी श्रीअनंत नि.

१०. १ निमित्त नि; २ आहे नि औं पु ख नां मुं, (+) हें पु४ मुं गो॰२ तं, (+) तें धु.

११. १ रात्रींतूनि नि खवर्ग (पु४ प्रसंप्रा).

१२. १ झालिया नि; २ तेथ रक्षीजेल ख, तेथ रक्षिजे औं, रक्षिजेल नि पु॰४, रक्षिजे मुं; ३ पुढें नि तं.

१३. १ आणुनि औं पु; २ कौरवांतें औं पु नां; ३ प्रेरीं नि; ४ °वेगीं नि.

१४. १ हृदयवासी औं धु; २ °बोध औं पु नां, °बोधें पु४ ख मुं; ३–४ अनंत नि, तयातें औं पु नां, दयाळु पु४, तो असे ख.

१५. १ स्वनेत्र औं पु॰४ नां मुं; २ बोधूनि वेगें नि.

जातां म्लेंछभाषावचनें । विदुर बोलिला[1] आपुल्या[2] वदनें[3] ।
तेचि[4] पढऊनि[5] प्रत्ययखुणे[6] । निरोप धर्मा धाडिला ॥ १६ ॥
तो निर्लोभ परम साधु । विष्णुभजनीं सदा[1] सावधु ।
वंदूनि धार्मिकाचा[2] शब्दु । धर्मांप्रति[3] पातला[4] ॥ १७ ॥
दर्शन घेतलें येकांतीं । क्षेमाळिंगणीं[1] समान[2] प्रीती ।
सार्थक विदुराच्या[3] उक्ती[4] । धर्माकर्णीं सूदल्या[5] ॥ १८ ॥
अत्यादरें युधिष्ठिरु । ह्मणे तूं मार्ग दाविता गुरु ।
दुष्ट संकट कष्टांधकारु[1] । निस्तरणें[2] तुझेनी ॥ १९ ॥
हृदईं आमुची आवडी असे[1] । त्यावरी विदुराज्ञा विशेषें ।
आतां कर्तव्य तें[2] अनालस्यें । संपादिलें पाहिजे ॥ २० ॥
अवश्य ह्मणोनि विश्वासनिधि । अंतरगृहाचे[1] निगूढसंधी[2] ।
सुरंग चालविला कुशळबुद्धी । पाताळपंथासारिखा ॥ २१ ॥
द्वारीं लाविलें गुप्त कपाट । जें[1] सहस्रनयना नव्हे प्रगट ।
जेविं कां[2] अनुभव[3] कळाविकट । वेदशास्त्रा न[4] लक्षे ॥ २२ ॥
गर्भागारीं प्रगटे नीर । तवंवरी कूप[1] निर्मिला[2] थोर ।
तेथूनि आडवें महाविवर[3] । दक्षण[4] दिशे चालविलें ॥ २३ ॥

---

१६. १–३ बोधी त्याकारणें औं ; ४ तोचि नि पु४ ; ५ पुढें प्रेरूनि नि ; ६ प्रत्यक खुणे औं पु , प्रत्येक खुणे ख , पवित्र खुण पु४ , खुणें नि.

१७. १ अति औं पु ख , परम मुं रा ; २ धर्मादिकांचा गो ; ३ (+) हो औं पु ; ४ चालिला गो२.

१८. १ क्षमाळिंगन पु४ ख नां , क्षमाळींगनीं धु गो२ रा ; २ परम रा ; ३–४ ज्या कां विदुरोक्ती खवर्ग ; ४ विदुरोक्ती धु गो रा तं ; ५ सुचविल्या औं पु.

१९. १ अंधकारु औं पु नां मुं ; २ तें निस्तरणें नि.

२०. १ वसे पु४ ख नां मुं गो२ रा तं ; २ (–) औं ख.

२१. १ °गृहींचे गो२ ; १–२ अंतर्गृहाचेनि गूढसंधीं नि.

२२. १ (–) नि रा ; २ (–) नि ख नां ; ३ अनुभवी नि ; ४ (–) औं पु४.

२३. १–२ निर्मिला कूप नि ; ३ विवर नि नां ; ४ दक्षिण नि ख गो२ तं.

वारुणावत सांडोनि दुरी । सप्तयोजनें वनगव्हरीं[1] ।
तोंड उघडोनि[2] तया[3] द्वारीं । प्रचंड शिळा लाविली[4] ॥ २४ ॥
धर्मा भीमा धरूनि[1] करीं । मार्ग दाविला सेवटवरी ।
ह्मणे निर्गम जालियां[2] विवरीं[3] । मार्ग मोडूनि सांडावा ॥ २५ ॥
कृष्णचतुर्दशीचे रजनीं । पुरोचन गृहीं[1] लावील वन्ही[2] ।
ऐसी सूचना सांगोनि गुणी[3] । खनक गेला स्वस्थाना ॥ २६ ॥
तोचि आठव धरूनि चित्तीं[1] । पांडव वर्ततां[2] सावधवृत्ती[3] ।
पुरोचनाची काळतिथी । प्राप्त जाली स्वभावें ॥ २७ ॥
ते कृष्णचतुर्दशीचिये दिनीं[1] । दानोद्देश[2] प्रकटूनि[3] जनीं[4] ।
द्विजवर्य[5] द्विजेंद्रपत्नी[6] । आमंत्रिल्या भोजना ॥ २८ ॥
अयुत ब्राह्मण ब्राह्मणवनिता[1] । वस्त्राभरणीं शृंगारयुक्ता ।
भोजनीं[2] तृप्त केल्या सरिता । मेघवृष्टीनें[3] ज्यापरी ॥ २९ ॥
स्तवनीं तोषवूनि कुंती । सर्वही[1] गेल्या[2] स्वगृहाप्रती[3] ।
तवं पंचापत्यें धरोनि हातीं । निशादी[4] येकी[5] पातली ॥३०॥

---

२४. १ वनगंव्हारीं गो·२ तं, °गंव्हरी पु४ ख; २ उघडोनियां नि पु४ ख नां; ३ ( – ) नि, ते पु४ ख नां मुं; ४ दाटिली औं पु·४ नां गो·२ रा, टाकिली मुं.

२५. १ घेउनी ख; २–३ झालियावरी नि पु४ ख नां मुं.

२६. १ गृहा नि औं, द्वारीं पु४; २ अग्नी औं पु ख धु; ३ ( – ) ख.

२७. १ चीतिं पु४ नां धु गो२; २ वर्तती नि; ३ सावधमति नां, सावधरिती ख, सावधबुद्धि औं.

२८. १ रजनीं ख; २ दानोद्देशें पु४ नां; ३ मानोनि नि; ४ मनीं नि, ( – ) नां; ५ °वर औं पु नां; ६ द्विजपत्नी औं धु.

२९. १ सहित वनिता नि धु, सह वनिता पु, वनिता गो२; २ भोजनें नि; ३ °वृष्टी खवर्ग गो·२.

३०. १ सर्व नि ख मुं; २ गेलीं नि ख धु, गेलियां औं पु; ३ स्वस्थळाप्रती नि; ४ निषादी नि पु·४ तं; ५ एक नि औं मुं.

प्रेरिली[१] असतां मृत्युकाळें । घेऊनि पातली पांचहि[२] बाळें ।
भोजन मागतां स्नेहाळें । दे आदरें यादवी ॥ ३१ ॥

इछाभोजनीं[१] करूनि तृप्त । मद्यपानीं[२] जाली मस्त[३] ।
निशाकाळीं पुत्रेंसहित[४] । कुंतीगृहीं पहुडली ॥ ३२ ॥

पुरोचन कुटिळमति[१] । भोजन सारी[२] धर्मपंक्ती ।
पांडव जाळणें[३] आजिचे[४] राती । निश्चय चित्तीं केला[५] असे[६] ॥ ३३ ॥

विचार विवरी अंतःकरणीं । चतुर्थ प्रहरीं लावणें वन्ही ।
चित्रशाळे मंचकासनीं । प्रथम प्रहरीं पहुडला ॥ ३४ * ॥

रात्री[१] लोटल्या[२] द्वादश घटिका । भीमसेनें घेऊनि उलुका[३] ।
प्रथमद्वारदेशीं देखा । प्रतिष्ठिला हुताशन[४] ॥ ३५ ॥

पुरोचन पहुडला जियेस्थानीं[१] । तेथें सभोंवता लाविला वन्ही ।
मग गृहाचे चहुंकोनीं[२] । ज्वाळमाळा प्रज्वळिल्या[३] ॥ ३६ ॥

स्पर्श होतांचि अळुमाळ । धडधडाटें[१] उठती[२] ज्वाळ ।
अंतरगृहीं[३] लावूनि अनळ । उलुका[४] हातींची[५] टाकिली ॥ ३७ ॥

---

३१. १ प्रेरिलें नि ; २ पांचै नि गो रा.

३२. १ °भोजनें नि मुं गो२ तं; २ °पानें नि पु मुं रा; ३ मत्त नि पु·४ ख; ४ पुत्रांसहित नि औं.

३३. १ कुटिल कुमती नि पु; २ सारिलें औं पु; ३–४ जाळूं आजचे नि; ५–६ केलासे नि पु·४ ख मुं, केला तेणें औं.

३४. * नां मध्यें तिसरा व चौथा चरण पुढीलप्रमाणें आहेतः—
मग ग्रहाच्या चहुं कोनि । ज्वाळामाळा प्रज्वळिल्या ॥

३५. १ रात्र नि पु मुं गो·२; २ लोटली नि खवर्ग (गेली पु४); ३ उल्का नि ख नां, उलका पु तं; ४ हुतांशु औं पु नां ख मुं गो तं.

३६. १ जये° नि मुं; २ चौकोनी औं पु ख धु गो; ३ प्रज्वळल्या नि, पाजळिल्या गो२ रा तं

३७. १ धडधडाटे नि पु४; २ उठला नि धु, उठले ख; ३ अंतर्गृहीं नि; ४ उल्का नि, दीपिका औं पु; ५ तेथें नि औं पु.

तैलदीपिका धरूनि त्वरित । कपाटद्वार[1] केलें मुक्त ।
पुढती[2] न[3] लवीच[4] तो[5] पंथ । मोडावया पावकें ॥ ३८ ॥
बंधु माता धरूनि करीं । साहीजणें निघालीं[1] विवरीं ।
मागां[2] पुढां[3] धीरोत्तरीं । सांभाळीत चालिला[4] ॥ ३९ ॥
गुप्तपंथें[1] क्रमूनि कुहर । मुहूर्तामाजी टाकिलें द्वार ।
हृदईं स्मरोनि यादवेश्वर । दीपिका तेथें विझविली[2] ॥ ४० ॥
बिळद्वारींच्या पाषाणें । मार्ग सोडिजे[1] लोटितां चरणें ।
जन्म पावलीं साहीजणें[2] । पृथ्वीगर्भापासूनी ॥ ४१ ॥
बिळद्वारीं[1] ताडितां[2] लात[3] । गुहा जाली पांशुभरित[4] ।
विवर ना तो विवरपंथ । समसमान धरत्री[5] ॥ ४२ ॥
लाखाजोहरापासूनि त्वरित । ऐसियापरी[1] परम भक्त ।
कडे पडिले हें[2] सामर्थ्य[3] । कृपा श्रीकृष्णरायाची[4] ॥ ४३ ॥
गृहीं पेटला प्रळयाग्नी । जेवीं पुछाग्नी लंकाभुवनीं[1] ।
घोर सुसाट[2] वाजतां[3] गगनीं । नगरलोक चेइले ॥ ४४ ॥

---

३८. १ कपटद्वार नि ; २ पुडती औं पु·४ ; ३–५ निरोधिलिया नि.

३९. १ रिघालीं नि औं पु नां तं ; २–३ मागें पुढें नि पु४ मुं तं ; ४ चालिले नि.

४०. १ °पंथीं नि गो ; २ निजविली नां गो·२ रा , बसवीली पु४.

४१. १ मोडिजे नि ख , मोडिले पु , मोडिला औं , सोडिलें पु४ ; २ पांचै जनें औं पु.

४२. १ गुहाद्वारीं खवर्ग ( गुप्तद्वारीं मुं ) ; २ झाडितां नि खवर्ग ; ३ लाथ पु४ ; ४ पाषाणभरित नि औं पु·४ मुं , पाशभरित ख धु रा ; ५ धरित्री नि.

४३. १ यापरी औं पु ; २ (–) नि , जे पु४ , हो मुं ; २–३ परम अप्त नां ; ३ समर्थ नि मुं गो रा तं ; ४ कृष्ण° नि. यापुढें नि खवर्ग मध्यें पुढील ओवी अधिक आहेः–

येरीकडे पुरोचन । निद्रिस्त असतां हुताशन ।
लागला तेणें तडफडोन[1] । पतंगप्राय[2] भस्मला ॥ ४३ अ ॥

१ दडपोन नि ; २ °प्रायें औं पु·४.

४४. १ लंकादहनीं खवर्ग ; २ सुसाटें औं पु ; ३ लागतां नि , भाजतां पु , माजतां औं.

तेथें[1] ज्वाळांचा धडधडाट । वंशकाष्टांचे[2] तटतडाट ।
लाख कढतां[3] खळखळाट[4] । कुवास व्योमीं दाटला ॥ ४५ ॥
पंचपुत्रेंसीं[1] निषादी । दुष्ट पुरोचन पापबुद्धि ।
भस्म जालीं[2] जातवेदीं । नगरलोकीं[3] नेणिजे ॥ ४६ ॥
कोट्यानकोटी शंखध्वनी[1] । हाहाकारें गर्जिजे जनीं ।
ब्रह्मांड जाळी[2] ऐसा वन्ही । दिसे भ्यासुर[3] क्षोभला ॥ ४७ ॥
लोक रुदना[1] करिती शोकें[2] । कौरवांतें निंदिती मुखें ।
भूमीं हाणिती मस्तकें । येक हृदय पीटिती ॥ ४८ ॥
लाक्षागृह[1] रचूनि कपटें । पांडव जाळिले दुष्टनष्टें[2] ।
धृतराष्ट्रा हें पाप मोटें[3] । तुझें तूतें[4] फळेल[5] ॥ ४९ ॥
पांडव होमिले महा[1] अनळा । तो वन्ही लागो तुझिया कुळा ।
पुत्रशोकाच्या महाज्वाळा– । माजी पडसी पापिष्टा[2] ॥ ५० ॥
ऐसीं[1] विलपती पुरुषनारी । आपुलालिया गृहगोपुरीं ।
उभे ठाकूनि निशा थोरी । परम कष्टें लोटली[2] ॥ ५१ ॥

---

४५. १ जेथें नि धु ; २ °काष्ठांचा नि खवर्ग ; ३ जळतां नि खवर्ग ; ४ भडभडाट नि, कडकडाट धु तं.

४६. १ °पुत्रांसह नि ( °पुत्रांसीं स ); २ जालियां पु मुं धु ; ३ हें नगर° खवर्ग.

४७. १ शब्दध्वनि गो२ ; २ ग्रासी नि, जाळील औं पु ; ३ भयासुर धु गो२ तं.

४८. १ रोदना नि ; २ दुःखें नि मुं. ही ओवी मुं व गो२ मध्यें नाहीं. औं मध्यें यापुढें पुढील ओवी अधिक आहे:—

येक लोळताती धरणी । अश्रुधार श्रवती नयनीं ।
म्हणती पांडव साधु जनीं । आठउनी सद्गुणी विलपती ॥ ४८ अ ॥

४९. १ लाखागृह पु४ नां मुं, लाखाजोहर ख ; २ कपटें नष्टें पु मुं, कपटनष्टें पु४ नां ; ३ मोठें नि ; ४ तुज औं पु ख नां गो२ ; ४–५ फळेल तुजलागीं नि.

५०. १ जया नि ; २ पापिष्ठा नि मुं.

५१. १ ऐसें नि गो२, ऐसे औं धु ; २ लोटिती नि औं पु४ ख मुं.

येरीकडे[1] युधिष्ठिर । सर्वे माता माद्रीकुमर ।
अंगीं[2] निद्रेचा अतिभर[3] । तेणें गात्रें न चलती ॥ ५२ ॥
भीमसेन पाहे दृष्टी । तवं अंधकार[1] कोंदला[2] भृष्टी[3] ।
गुल्मलता वृक्षदाटीं[4] । तृणें मार्ग लक्षेना[5] ॥ ५३ ॥
निशाचरी श्वापद पक्षी । घोर[1] गर्जना करिती कक्षीं[2] ।
वोळकंबले[3] महावृक्षीं[4] । अश्वल[5] आणि वाघुळा[6] ॥ ५४ ॥
वनदेवता यक्षिणीपाळें । धुमकसु[1] घालिती गदारोळें ।
दीपिका दाऊनि[2] बंबाळें[3] । गुप्त होती अप्सरा[4] ॥ ५५ ॥
प्रेतगण स्मशानवासी । रूपें धरूनि[1] भ्यासुर वेशीं ।
छळिती अशुची मानवांसी[2] । रक्तमांसभक्षणा[3] ॥ ५६ ॥
दिवाभीतांचे घुंघाट । पिंगळे[1] करिती[2] किलकिलाट ।
भालू[3] भुंकती सैराट । टिटवे थोर टिवटिविती ॥ ५७ ॥
चक्रवाकांचे आर्तस्वर[1] । कुमुदीं[2] भ्रमरांचे झुंकार[3] ।
मस्तकमणितेजें[4] विखार[5]। जीव[6] आहारा[7] शोधिती[8] ॥ ५८ ॥

---

५२. १ तवं येरी° औं पु; २ आणि औं पु ख; ३ अतिभार नि गो·२.

५३. १–२ अंधकारें कोंदली नि ख मुं गो२; २ पडीला पु४; ३ सृष्टी नि; ४ °दाटी स खवर्ग रा तं; ५ दिसेना ख गो२.

५४. १ थोर नि पु४ ख नां मुं; २ कुक्षीं पु नां मुं, वृक्षीं औं; ३ °कंबलीं नि; ४ महाशाखीं औं; ५ आस्वलें नि खवर्ग; ६ वाघुळें नि, वागुळां गो·२, वाघुळ तं.

५५. १ धुमस नि खवर्ग गो२; २ लावूनि नि (स प्रसंप्रा) ख; ३ भंबाळें नि; ४ एकसरा नि, असरा पु धु, कसरा औं.

५६. १ दाउनि औं पु; २ माणसांसी ख मुं; ३ झोंबती मांस भक्षावया नि, मारिती मांस° औं पु, झोंबती मांस° नां, पीडिती मांस° मुं.

५७. १–२ पिंगळियांचे नि खवर्ग; ३ भालुवा ख गो२, भोलुका मुं, भल्लुक तं.

५८. १ °स्वरीं नि; २ कुमोदिनी औं पु; ३ झुंकारीं नि, (हुंकारीं स); ४ °तेज नि औं मुं; ५ विखरीं नि; ६ (–) खवर्ग; ७ आहारातें खवर्ग; ८ जाणती पु४.

चारया[1] निघालीं[2] निधानें । धगधगित प्रकाशमानें ।
ईश्वरकृपेस्तव पूर्वपुण्यें । येवों ह्मणती सभाग्या ॥ ५९ ॥
असो[1] हे[2] निशा दाटली काळी । जेवीं काळपुरुषाची कांबळी ।
ब्रह्मांडदेवतेवरी सगळी । पांघुरविली आप्तत्वें ॥ ६० ॥
ऐसें देखोनि तयेकाळीं[1] । भीमसेन बळियाबळी ।
धैर्यकास घालूनि कवळी । पांचांतेंही येकला ॥ ६१ ॥
स्कंदीं[1] वाहूनियां जननी । कडिये माद्रिकुमर दोन्ही ।
धर्मार्जुन[2] बाहुस्थानीं । पाणितळीं[3] कवळिलें ॥ ६२ ॥
पाठी देऊनि ध्रुवमंडळा[1] । अगस्तीचक्र[2] लक्षूनि डोळां ।
वाम[3] कृत्तिकांचा मेळा । याम्यदिशे निघाला[4] ॥ ६३ ॥
पवनवेगें पवनात्मजु । त्वरें[1] चालिला[2] दक्षिणे[3] उजू ।
जैसा[4] मातला महागजु । कर्दळीवना विखंडी[5] ॥ ६४ ॥
झडपाआड[1] मोडी[2] झाडें । तळवां[3] चूर्ण करीत धोंडे ।
श्वापदसर्पांचीं जुंबाडें । पायांतळीं रगडीत ॥ ६५ ॥
भीमसेनाचा अंगवायो । वाजतां[1] सिंहशार्दूळां प्रळयो ।
ह्मणती वना[2] करावया क्षयो । काय अद्भुत पातलें ॥ ६६ ॥

---

५९. १ चारिया नि पु४, चराया नां मुं; २ निघोनि नि.

६०. १–२ ऐसी औं पु. ही ओवी मुं मध्यें नाहीं.

६१. १ ते काळीं औं पु मुं, तियेकाळीं गो२ रा तं.

६२. १ खांदीं नि ख नां; २ धर्मार्जुना नि; ३ पाणितळें नि मुं गो रा तं.

६३. १ ध्रूव° पु ख नां मुं धु गो॰२; २ अगस्तिचक्रा नि; ३ वामीं नि, वामें औं पु नां मुं रा; ४ चालिला नि औं पु.

६४. १–३ दक्षिणेदिशे निघाला नि, दक्षणमार्गें निघाला खवर्ग; ४ जेवि औं पु; ५ विभांडी नि औं पु मुं, विध्वंसी ख.

६५. १ झांपाआड स; २ मोडीत नि खवर्ग; ३ तळवा नि औं पु४ ख नां गो२ रा.

६६. १ सुटतां नि ( सुटतो स ); २ वन औं ख गो॰२.

शेष वेचतां[1] अठरा[2] घटिका । पूर्वदिशेनें[3] क्षाळिलें मुखा ।
कुंकुम रेखिलें त्या[4] टिळका । अरुणोदयो[5] बोलती[6] ॥ ६७ ॥
भार्गवाचार्य उद्या येतु[1] । तवं[2] अपार क्रमूनि[3] सांडिला[4] पंथु[5] ।
पुढें जान्हवीजळाचा वातु[6] । सुसीतळ[7] पातला ॥ ६८ ॥
हस्त आवरितां कुमुदीं[1] । अवमान मानिला षट्पदीं ।
त्यातें[2] आदरें कोकनदीं । पाचारिलें[3] जवळिके[4] ॥ ६९ ॥
कुक्कुटें[1] चेइरें[2] करितां[3] काका[4] । भयें पळ सुटला उलूकां ।
भोग द्यावया चक्रवाकां । चक्रवाकी चालिल्या ॥ ७० ॥
गाढालिंगनाच्या[1] गांठी । सोडितां दंपत्यें होती कष्टी ।
वस्त्रें वेढिती परी[2] पोटीं[3] । अपूर्णकामें जळजळ ॥ ७१ ॥
स्वैरिणी सांडूनि[1] सखयांतें[2] । दूतीसहित त्वरें बहुतें ।
गृहा येऊनि स्वकर्मातें । संपादिती लौकिकीं[3] ॥ ७२ ॥
वेश्यागारें[1] सांडूनि[2] विट[3] । लोकाचारा पातले[4] नीट[5] ।
वामी कौळिक धूर्त[6] धीट[7] । वेष घेती शिष्टांचे[8] ॥ ७३ ॥

---

६७. १ वेच्चितां औं पु·४ मुं गो·२ ; २ आठ पु४ ; ३ तव पूर्व° औं पु; ४ ( – ) खवर्ग ; ५ °द्य नि धु गो२, त्या अरुणोदय ख मुं; ६ बोलिजे नि औं पु.

६८. १ येत नि पु४ गो२ रा; २ ( – ) पु४ ख ; ३–४ क्रमूनियां नि, क्रमिला औं ; ५ पंथ नि पु४ गो रा ; ६ वात नि पु४ गो२ रा, सुवातु औं पु; ७ शीतळ मंद नि, येवों सीतळ पु४.

६९. १ कुमोदीं औं पु·४ ; २ त्यांतें नि गो ; ३ पाचारिले नि; ४ जवळिकें औं पु मुं रा तं.

७०. १–२ कुक्कुट रव ख नि ( कुक्कुटरवें स ) ; ३ करितो स ; ४ कां स, काकां गो·२ रा.

७१. १ गाढालिंगनें पडली नि ; २ पैं औं पु ; ३ पाठीं मुं गो.

७२. १ टाकूनि पु ; २ संगियांतें स, खागयातें धु तं रा, वागयातें गो२ , श्वालयातें गो ; ३ लौकिका नि.

७३. १ वैश्यागारा नि ; २ सोडूनि नि ; ३ निकट औं पु ; ४ मिनले नि, पावले पु४ ख ; ५ निकट नि पु४ ख मुं, सुभट औं पु नां ; ६ मार्ग औं पु, धूत नां गो तं ; ७ शठ नि ; ८ श्रेष्टांचे मुं गो·२.

तस्करीं सांडिलें तास्कर्या[1] । अभिचारिकीं कौटाळक्रिया ।
जारण मारण मोहन ईया[2] । प्रेतपूजा स्मशानीं ॥ ७४ ॥

घेऊनि अंधकाराची बुंथी । चंद्र स्वेच्छा भोगी जगती[1] ।
प्रकाश वेढूनि सूर्याप्रती । ह्मणे मी शुद्ध पतिव्रता ॥ ७५ ॥

भोग भोगूनि सांडिले राजे[1] । नूतनातें उपजवी[2] लाजे ।
भ्रम[3] घालूनि ह्मणती[4] माझें । ऐश्वर्य[5] सदा[6] अक्षयी ॥ ७६ ॥

गगनसुमद्रीं मुक्ताफळें । अरुणचंचूनें[1] कनकमराळें ।
वेंचूनि घेतां कळाकुशळें[2] । नाहींच केलीं[3] नक्षत्रें ॥ ७७ ॥
कीं[1] व्योमनर्मदेमाजी थोर । कार्तवीर्य[2] सहस्रकर ।
ताराबाणलिंगाचा[3] भार । नित्रटोनि करी[4] परौता ॥ ७८ ॥
कापडी चालिले[1] तीर्थपंथें । सोहमस्मि चिंतिती[2] ज्ञाते ।
भक्त स्मरती हरिहरातें[3] । प्रेमभावें आवडी ॥ ७९ ॥
शाक्त[1] चिंतिती शक्तिप्रतिमा । सौर ह्मणती सूर्यचि[2] आत्मा ।
गाणपत्य गणेशमहिमा । वाखाणिती ब्रह्मत्वें ॥ ८० ॥
प्रातर्होम[1] द्यावया जाणा[2] । अग्निहोत्री उठिले[3] स्नाना ।
येक सिद्ध जाले[4] अनुष्ठाना । जपी तपी सुनेमें[5] ॥ ८१ ॥

---

७४. १ तस्कर्या गो·२ रा तं, तस्करकार्या नि खवर्ग; २ यया नि, त्रया औं.

७५. १ राती औं पु, जेती ख मुं तं.

७६. १ सेजे औं पु; २ भोगवी नां; ३ भ्रंश स; ४ ह्मणे नि; ५ असें नि, ऐसें नां मुं, असो ख, आसे पु४; ६ ऐश्वर्य नि खवर्ग (असों औं), संपदा गो·२.

७७. १ ते अरुण° औं पु; २ विचारकुशळें औं, ३ झालीं स.

७८. १ तो पु४, (–) गो; २ कार्तिवीर्य ख नां मुं धु गो·२ रा तं; ३ तो रावण° औं पु; ४ केला पु४.

७९. १ चालती ख; २ बोलती औं पु; ३ °हरांतें नि.

८०. १ शक्ति धु, शाक्र तं; २ सौरचि पु४ नां गो२.

८१. १ प्रातहोम ख; २ जना ख; ३ उठले नि पु, निघाले मुं, बैसले ख; ४ ले पु४ गो·२ रा, (–) औं, ते ख मुं; ५ सुनेमी ख गो·२.

असो मार्गें वारुणावर्ती । उदया येतां पद्मिणीपति[1] ।
दग्धगृहा वेष्टित[2] पंक्ती । पौरजांच्या[3] दाटल्या[4] ॥ ८२ ॥
गृहगोपुरेंसहित[1] भिंती । जळोनि समान[2] जाली क्षिती ।
विवरद्वारीं भरली माती । कोणातेंहीं लक्षेना[3] ॥ ८३ ॥
किरातपुत्र[1] पुरोचन कुमति । भस्मला त्याच्या देखिल्या अस्ती[2] ।
जनीं निश्चय मानिला चित्तीं । पांडवांच्या ह्मणोनी ॥ ८४ ॥
स्मरोनि[1] पांडवसद्गुणकीर्ति[2] । खेद समान सकळां चित्तीं ।
दुःखवार्ता दूतांहातीं । हस्तनापुरा[3] पाठविली ॥ ८५ ॥
पांडव जळाले[1] जातुषालईं । कृतकृत्यता[2] मानूनि हृदईं ।
धृतराष्ट्रा[3] सुखिया[4] होई[5] । शैल्य[6] तुटलें ह्मणोनि ॥ ८६ ॥
सोम सूर्य गगनसूत्रीं । फिरती[1] तोंवरी पुत्रपौत्रीं ।
भोगीत राहें[2] हे[3] धरत्री[4] । काळसर्पासारिखी[5] ॥ ८७ ॥
पांडव दग्धले तुमच्या[1] यत्नें । पुरोचन नेणो कारण[2] कोणें[3] ।
ऐसी वार्ता ऐकतां जनें । हस्तनापुरीं आक्रांत ॥ ८८ ॥

---

८२. १ पद्मिनीपती नि औं; २ वेष्टिती नि; ३ पौरयांच्या नि; ४ थाटल्या ख, चालिल्या मुं, लागल्या गो२.

८३. १ गृहेंगोपुरें° नां मुं तं, ग्रहेंगोपुरें° पु४ ख रा; २ समसमान पु४; ३ नेणवे औं.

८४. १ किरात औं पु·४ मुं, निषादपुत्र तं, निषादीपुत्र नि; २ अस्थी नि, हस्ती गो२, हास्ती पु४, हस्थि रा.

८५. १ आठवूनि नि; २ पांडवांची गुण° नि, पांडवांची सद्गुण° खवर्ग; ३ °पुरीं नि.

८६. १ जाळिले ख, निमाले धु; २ कृत्यकृत्यता पु·४ धु; ३ °राष्ट्र पु४ मुं तं; ४ सुखी नि औं; ५ होईं पु४ रा तं; ६ शल्य नि औं तं.

८७. १ कीर्ति औं पु मुं; २ राहे औं पु·४ मुं तं; ३ ( – ) नि पु ख नां ४ धरित्री नि तं; ५ °सारिखा नि.

८८. १ तुमचे नि मुं गो·२; २–३ कोणे कारणें नि खवर्ग.

पुत्रनिधन पडतां श्रवणीं । हाहा[1] शब्द करूनि वदनीं ।
प्रज्ञाचक्षु पडिला धरणीं । हृदय हातें[2] पिटीत ॥ ८९ ॥
ह्मणे प्रिय प्राणापरता । पंडु माझा सहोदर[1] भ्राता ।
आजि निमाला ऐसें[2] चित्ता । दुःख[3] वाटे अपार ॥ ९० ॥
अवलोकूनि हे पांडव । बंधुवियोगशोकार्णव ।
प्राशूनि जाले कुंभोद्भव । वज्रहृदयी[1] पापात्मा ॥ ९१ ॥
शेखीं[1] पांचही कुळदीपक । अस्त[2] पावले जैसे अर्क ।
शून्य पडिले तिन्ही लोक । ऐसें[3] आज मज वाटे ॥ ९२ ॥
भीष्म द्रोण कृप बाल्हिक । शोकें स्पर्शले येकयेक ।
दुर्योधनादि करिती शोक[1] । सत्यमिथ्या[2] नेणवे ॥ ९३ ॥
सकळ प्रजा करिती रुदन[1] । ह्मणती पांडव पंचप्राण[2] ।
गेले त्यास्तव[3] दुःख दारुण । मरणातुल्य आम्हुतें ॥ ९४ ॥
येक आठवती[1] धर्मा । येक वर्णिती[2] बळिया भीमा ।
येक अर्जुना[3] नरेंद्रोत्तमा । येक नकुळ सहदेवा ॥ ९५ ॥
दुर्योधनादि कृत्रिम क्लेशें । ह्मणती[1] विदुरा जालें कैसें ।
येरु विलपे[2] कांहीं हांसे[3] । ह्मणे नैश्वर्य[4] सर्वही ॥ ९६ ॥

---

८९. १ (+) कार नां गो·२ ; २ हस्तें नि.

९०. १ सोहदर पु गो, सोहोदर पु४, सोदर नां ; २ ऐसा नि ; ३ खेद नि.

९१. १ °हृदय औं मुं गो·२, वज्रदेही नां.

९२. १ सेखीं नि ख मुं गो·२ रा ; २ अस्ता नि पु४ मुं गो२, अस्तु औं पु ख धु गो रा ; ३ तैसें नि पु४.

९३. १ दुःख औं ; २ सत्य कीं मिथ्या पु४. ही ओवी गो२ मध्यें नाहीं.

९४. १ रोदन नि ; २ पांचही जण मुं धु, पांचैजन औं ; ३ यास्तव नि पु४ ख गो.

९५. १ (+) राया औं ; २ ह्मणती नि खवर्ग ; ३ अर्जुन नि खवर्ग (पु प्रसंप्रा).

९६. १ ह्मणे पु ख नां मुं रा ; २ विलापें पु४, विलपें रा तं ; ३ हंसें पु४, हांसें रा तं ; ४ नश्वर नि पु तं.

नवल नव्हे हें[1] नृपाळा[2] । काय काय देखणें[3] पडेल[4] डोळां ।
ईश्वरइच्छा अलोट काळा[5] । नये सहसा[6] विश्वासों[7] ॥ ९७ ॥
गेलें[1] अंतवंत ह्मणावें । दिसे[2] तें[3] साच केविं[4] मानावें[5] ।
ये[6] संसारस्वप्नीचे राणिवें । भुलों नये सर्वथा ॥ ९८ ॥
येका[1] आधीं येका पाठीं । नाश[2] देखिजे प्रत्यक्ष[3] दृष्टी ।
ये[4] मृत्यलोकींची[5] राहाटी । कोण अक्षई उरलासे ॥ ९९ ॥
सौबळीसहित सुना सकळीं । धृतराष्ट्र गोत्रजमेळीं ।
स्नान[1] करूनि गंगाजळीं । उदकक्रिया सारिली[2] ॥ १०० ॥
धेनुवस्त्रें रत्नकनकीं[1] । बहु दक्षणा स्वहस्तकीं ।
संतुष्ट व्हावया[2] परलोकीं । पांडवोद्देशें[3] देतसे[4] ॥ १०१ ॥
वारुणावता धाडूनि आप्त । ह्मणे पांडव[1] दग्धले[2] जेथ ।
वापी कूप आराम तेथ[3] । अति सुरम्य[4] निर्मावे ॥ १०२ ॥

---

९७. १ (–) नि; २ **भुपाळा** औं पु ख; ३ (–) खवर्ग तं; ४ (+) **या** पु·४ ख; ५ **कळा** औं पु ख मुं धु रा; ६ **सहसां** पु·४ नां तं, **सर्वथा** गो·२; ७ **विश्वासें** पु४.

९८. १ (+) **तें** औं पु; २–३ **दिसतें** नि मुं, **आहेत ते** औं पु; ४ **कैसें** धु, (–) औं पु; ५ **मानावे** औं पु; ६ (–) नि, **हे** गो २. रा तं मध्यें ही ओवी नाहीं. नि मध्यें ही व पुढील ओवी यांची अदलाबदल आहे. औं मध्यें पुढील ओवी जास्त सांपडतेः—

**गेले महानुभाव थोर । गेले देव दैवतांतर ।**
**गेले राहात साचार । कीर्ति अकीर्ति उभयतां ॥ ९८ अ ॥**

९९. १ **एक** धु गो·२; २ **प्रत्यक्ष नाश** नि; ३ (–) नि; ४ **हे** नि; ५ **मृत्युलोकींची** नि मुं तं.

१००. १ **स्नानें** औं पु ख नां मुं रा; २ **साधिली** औं रा.

१०१. १ **रत्नें कनकीं** नि औं पु मुं गो२ रा; २ **होवया** ख नां; **होवावया** तं; ३ **पांडवद्वेषें** गो·२; ४ **करितसे** औं पु, **करिताती** नां.

१०२. १–२ **दग्धले पांडव** नि खवर्ग; ३ **देख** औं पु; ४ **रमणीक** औं पु, **कुसरी** धु.

बिल्व अश्वत्थ तुळसीवनें[१] । चैत्यवेदिका[२] वृंदावनें ।
मठ मठिका[३] देवतायतनें[४] । मनोहरें[५] निर्मावीं ॥ १०३ ॥
येरीकडे दुस्तरवनीं । उदया येतां वासरमणी ।
पांडवीं काय केली करणी । ते[१] सुकर्णीं आकर्णा[२] ॥ १०४ ॥
पावले देवगंगेचें कुळ । सागरातुल्य तुंबळ[१] जळ[२] ।
वीचिकल्लोळ[३] खळाळ । आवर्त भोंवरे भ्रमताती[४] ॥ १०५ ॥
शुशुमार[१] नक्र[२] मछ[३] कछप[४] । तळपतां गगनीं उसळे आप ।
देखोनि संतोष चिंता स्वल्प[५] । भीमहृदया झगटली ॥१०६॥
गंगादर्शनें[१] सुकृतजोडी । परी उतरावयाची अति[२] सांकडी[३] ।
जाणें असे[४] बहु[५] तांतडी । कुरुदेशातें लंघूनी ॥ १०७ ॥
पूर्वे[१] पश्चिमे[२] गंगातीरें[३] । द्विवार करितां येरझारें[४] ।
अकस्मात[५] कर्णधारें[६] । साहीजणें[७] देखिलीं[८] ॥ १०८ ॥
विदुरें बोधूनि[१] गुह्यार्थ । मार्गीं धाडिला नौकेसहित ।
तेणें[२] पूर्वींच येऊन तेथ । वाट पाहात तिष्टतु[३] ॥ १०९ ॥

---

१०३. १ °तुळशीवनें नि गो; २ चैद्यवेदिका औं पु·४; ३ मंडप औं; ४ देवतायनें ख पु·४ गो·२, देवतायानें औं; ५ मनोहर नि नां मुं धु गो.

१०४. १ तें रा नां; २ आइक पा औं पु, ऐकावी गो·२, ऐकावें रा.

१०५. १ अगाध नि, ( – ) औं पु; २ तुंबळ औं पु; ३ विचित्र कल्लोळ नि गो·२, विचित्रवल्ली खवर्ग; ४ भोंवताती नि, भवताती पु·४ गो रा, भोंवती मुं धु.

१०६. १ शिशुमार पु·४ ख गो·२ तं; २ मगर पु४, ( – ) गो; ३ मत्स्य नि ( – ) औं पु मुं, मत्छ गो; ४ कच्छप नि पु४, कत्छप पु; ५ अल्प नि ख.

१०७. १ °दर्शन नि नां; २ ( – ) औं पु मुं गो; ३ साकडी नि; ४ आहे औं पु मुं; ५ अति नि औं पु ख धु, ( – ) नां.

१०८. १ पूर्व नि खवर्ग धु गो; २ पश्चिम नि औं मुं, पश्चमे पु४ ख, पश्चम पु नां धु; ३ °तीर नि; ४ °झार नि; ५ तंव ( तों ) अकस्मात् औं पु; ६ कर्णधार नि; ७ °जणीं नि, °जनें औं पु; ८ देखिला नि.

१०९. १ वोपूनि पु, वदोनि औं; २ तो नि औं पु; ३ तिष्ठतसे नि ख गो·२ रा.

दुरूनि[1] देखतांचि दिठी[2] । धांवोनि[3] पातला धर्मानिकटीं ।
नमस्कारूनि कर्णपुटीं । निरोप सांगे विदुराचा ॥ ११० ॥
यवनभाषेमाजील[1] अर्थ । खनक बोलिला जो कीं[2] गुप्त[3] ।
तोचि मानूनि संकेत[4] । विश्वास येथें धरावा ॥ १११ ॥
परिहारूनि[1] पावकव्यसन[2] । दक्षिणपंथें पांचैजण[3] ।
येतील[4] त्यांलागीं नौकायान । पाठविलें मजहातीं ॥ ११२ ॥
वारुणावत सांडूनि रातीं[1] । निरुत येती[2] दक्षणपंथीं ।
तुवां जाऊनि सत्वरगती । मार्ग निगुती[3] रक्षावा[4] ॥ ११३ ॥
विदुरआज्ञा अति समर्थ । विशेष[1] तुमचे[2] ठाईं आर्त ।
यालागीं येऊनियां येथ । भवदागमन विलोकीं ॥ ११४ ॥
ऐसीं[1] बोलोनि अमृतवचनें । नौके वाहिलीं साहीजणें ।
आवळूनियां[2] अर्धक्षणें । पैलपारा आणिलीं ॥ ११५ ॥
धर्में देतां आलिंगन । अश्रुधारा श्रवती[1] नयन ।
ह्मणे[2] तुझा उपकार पूर्ण[3] । येणें[4] जन्में न विसरों ॥ ११६ ॥

११०. १ साहीजण नि ; २ दृष्टी नि खवर्ग ; ३ वेगें नि , वेगीं खवर्ग.

१११. १ °माजी औं तं ; २ ( – ) नि औं नां मुं ; ३ गुह्यार्थ नि मुं ; ४ यथार्थ औं पु.

११२. १ परिहरोनी औं ख मुं रा तं; २ पावकवनें पु४; ३ पांचहीजण; नि ; ४ येती खवर्ग गो.

११३. १ निगुती औं पु ; २ येतील नि ; ३ निरुती नि धु गो॰२ तं, पुढें औं पु ; ४ लक्षावा औं.

११४. १ यावरी नि मुं ; २ तुमच्या नि तं , तुमचा ( चां ) औं पु॰४ ख नां धु गो रा.

११५. १ ऐसें नि ख मुं गो२ ; २ अवलोकोनि नि मुं , अवलोकितां ख धु , वैसवोनी गो२ , आवरुनी गो.

११६. १ स्रवती नि ; २ ( – ) औं पु ; ३ संपूर्ण औं पु , उत्तिर्ण ख धु ; ४ येकें औं पु.

जेणें जन्मवरी[1] प्रतिपाळिलें । दिव्यमंत्रातें उपदेशिलें ।
संकटीं प्राणातें रक्षिल । आणि पोसिलें[2] दुर्भिक्षीं ॥ ११७ ॥
जळतां राखिलें वैश्वानरीं । बुडतां तारिलें महापूरीं[1] ।
त्यातें[2] विसरे तो अघोरीं । नरकीं पडे दुरात्मा ॥ ११८ ॥
कृतघ्नदोषें दोषभरित । आपुल्या कोटी कुळांसहित ।
जवंवरी[1] तपती चंद्रादित्य । तवंवरी[2] पचे[3] रौरवीं[4] ॥ ११९ ॥
येकदां[1] येक कळावर्मे[2] । ज्ञान करितो सद्गुरु परम ।
येक संकट करी[3] सुगम । तोही सद्गुरु[4] मानावा ॥ १२० ॥
वैरी साधितां कैवारु । येक वेळ करी तोही[1] गुरु[2] ।
येक[3] दोषाचा परिहारु । करी तो गुरु मानावा ॥ १२१ ॥
येक दोनी[1] पांचसात । घडले[2] उपकार करी व्यर्थ ।
तो चांडाळयोनीआंत । जन्म पावे[3] निर्धारें ॥ १२२ ॥
यालागीं क्षता[1] यदुनायक । खनक[2] आणि तूं नाविक ।
पांचवा[3] पंडु आमुचा जनक । पांचै[4] समान आम्हुतें ॥ १२३ ॥
नाविक ह्मणे हें बोलणें । भेद कल्पूनि दुरावणें[1] ।
येके शरीराचीं[2] करणें[3] । काय उपरोध मानिती[4] ॥ १२४ ॥

---

११७. १ **जन्मोनि** औं पु ; २ **पाळिलें** पु४.

११८. १ **माहांपुरीं** पु·४, **महांपुरीं** मुं धु रा ; २ **यातें** औं पु मुं धु गो२.

११९. १ **जोंवरी** नि औं ; २ **तोंवरी** नि औं ; ३ **पडे** ख ; ४ **आघोरि** पु४.

१२०. १ **एकला** नि खवर्ग ; २ **कळाकर्म** नि ; **कमळावर्म** पु४, **वेळांवर्म** रा ; ३ **करितो** नि ; ४ **गुरु** नि गो२.

१२१. १–२ **उपकारू** मुं ; ३ **येकदां** धु तं. ही ओवी नां मध्यें नाहीं.

१२२. १ **दोन** नि मुं ; २ **केले** नि खवर्ग ( **केला** पु४); ३ **पावत** पु, **पावेल** धु गो२.

१२३. १ **रक्षिता** नि औं पु ख मुं गो , **रक्षितां** पु४ नां गो२ ; २ **विदूर खनक** औं पु नां ; ३ **चौथा** नि पु४ ख मुं ; ४ **चौघे** नि पु४ ख मुं , **तत्** औं.

१२४. १ **दुऱ्हावणें** पु४ धु रा ; २ **शरीराचे** नि पु४ ख मुं , **शरीरीचीं** मुं नां गो·२ रा ; ३ **कारणें** नि औं पु४ गो२ रा ; ४ **मानिजे** नि, **मानावा** औं.

मनें[1] चिंतिजे जया ठाया[2] । तेथें[3] जाणें घडतसे[4] पायां[5] ।
तो उपकार मानूनियां[6] । काय चरणा वंदिजे[7] ॥ १२५ ॥
पाई[1] लागोनि स्नेहाळ[2] । उपानह[3] चुकवी कंटक हरळ[4] ।
तो आभार मानूनि कुशळ । काय हृदई[5] कवळिती[6] ॥ १२६ ॥
आह्मीं[1] सेवकीं करणें[2] सेवा । तेथ[3] उपकार कायसा[4] देवा ।
आतां लोभ असों द्यावा । जाणें असे गुप्तत्वें ॥ १२७ ॥
चरण वंदूनि[1] मस्तका[2] । जाता जाला सहीत नौका[3] ।
मार्गा[4] साहीजणीं देखा[5] । गंगास्नानें सारिलीं ॥ १२८ ॥
स्कंदीं[1] वाऊनियां[2] माये । जावळे[3] बंधु घेतले कडिये ।
धर्मार्जुना[4] मार्ग सोये । दाखवीत चालिला ॥ १२९ ॥
निबिड दाटलें[1] दिसे[2] वन । जेवीं भूतळा पातले घन ।
भेदित चालिला भीमसेन । पवनपुत्र ह्मणोनी ॥ १३० ॥
गगनचुंबित[1] वाढले वृक्ष । असंख्य श्वापदगणांचे[2] लक्ष ।
दिनकरकिरणांतें[3] गवाक्ष । शिरावया दिसेना ॥ १३१ ॥

---

१२५. १ मनीं नि ; २ ठायां नां मुं धु रा ; ३ तेथ गो·२ रा ; ४ घडे नि खवर्ग ; ५ पाया नि, पांया पु४ गो, पांयां पु; ६ मानूनि तया औं पु ; ७ वर्जिजे नि धु, वर्णिजे औं पु गो·२ रा.

१२६. १ पायां नि खवर्ग ; २ स्नेहाळ नि औं पु मुं गो२ तं ; ३ उपानव औं पु ख तं, उपान गो·२ रा, उपाये पु४, उपाव नां ; ४ हारळ नि, हारटा पु४ ; ५ चरणे पु, त्यासी औं ; ६ कवळिजे नि, वंदिजे औं पु.

१२७. १ (–) मुं ; २ करावी नि खवर्ग गो·२ ; ३ येथें नि खवर्ग ; ४ कासया मुं.

१२८. १ व्यसुनी औं ; २ मस्तकें नि ; ३ नौके नि ; ४ मग नि मुं ; ५ देखें नि.

१२९. १ स्कंधीं नि औं, खांदी पु ; २ वाहुनियां नि तं ; ३ जवळ नि, दोघे मुं ; ४ धर्मानुज ख नां.

१३०. १–२ दाटलेंसे नि.

१३१. १ °चुंबी नि ; २ श्वापदांचे नि औं मुं रा; °किरणाचें औं पु.

निर्भयपणें करीत[1] वाट । बळें[2] जातसे वीरवाट[3] ।
सरिता माळ[4] माथेघाट । पर्वतांचे लंघितु[5] ॥ १३२ ॥
विसावा[1] न घेतां अर्धक्षण[2] । न सेवितां फळ मूळ जीवन ।
सप्तप्रहरपरियंत[3] जाण । मार्ग अपार सारिला[4] ॥ १३३ ॥
संपूर्ण[1] लोटूनियां दिवसा । यामत्रय[2] क्रमिली निशा ।
यावरी कुंतीचिया मानसा । तृषा अपार[3] लागली[4] ॥ १३४ ॥
ह्मणे भीमा मेळवीं उदक । बहुसाल[1] श्रमले[2] हे[3] बाळक ।
आतां बैसोनि नावेक । दे विसावा बंधूंतें ॥ १३५ ॥
अवश्य ह्मणोनि वृकोदर । लक्षिला[1] न्यग्रोध तरुवर ।
सरळ शाखा मंडपाकार । छाया विशाळ तळवटीं ॥ १३६ ॥
अफाट[1] फांटे वरी खांदिया । भूमी स्पर्शल्या[2] पारंबिया ।
पक्क फळें सांडिलीं[3] तयां[4] । उपमा प्रवाळमणींची[5] ॥ १३७ ॥
वानर पक्षी अनेकवर्णी । वटीं वसिन्नल्या वटयक्षिणी[1] ।
भीम[2] देखोनि बद्धपाणी । अभय मागती वसावया ॥ १३८ ॥

---

१३२. १ काढीत औं, क्रमितां ख; २ त्वरें नि; ३ वीर वरिष्ठ नि, वीर वांठ औं धु, वीरवांट पु रा, विवरवाट मुं, विवर बंट गो२, निर्भय बंट गो; ४ पर्वत औं; ५ लंघिती नि नां, लक्षिती मुं.

१३३. १ विसांवा नि (स प्रसंप्रा), मुं धु तं, विसावां औं पु·४ ख नां; २ अर्धक्षीण पु४ गो·२; ३ °पर्यंत नि औं पु४ ख मुं गो रा तं; ४ सांडिला खवर्ग (क्रमीयला ख).

१३४. १ पूर्ण गो·२ रा; २ याममात्र औं पु, यानंतरें पु४, यामार्ध नां; ३-४ लागली अपार औं पु नां.

१३५. १ बहु औं पु; २ श्रमलें औं पु ख रा; ३ हें औं पु गो२, (-) पु४ ख नां मुं तं.

१३६. १ रक्षीला पु४.

१३७. १ अफांट नां धु गो तं; २ रुळती नि; ३ पडलीं औं; ३-४ सांडिलयां पु·४ ख मुं; ५ प्रवाळमाणिकांची औं ख.

१३८. १ वनयक्षिणी नि खवर्ग; २ भीमा नि.

तेथें माता आणि अनुजें[1] । स्वहस्तें[2] निजवूनि तृणसेजे[3] ।
आपण उदकाचेनि व्याजें[4] । महावन विलोकी ॥ १३९ ॥
तवं[1] जळचर पक्षियांचे[2] शब्द । उत्तर दिशे ऐकिले विविध ।
तेथें आला[3] तवं[4] अगाध । जळकासार[5] देखिलें[6] ॥ १४० ॥
घर्में[1] दाटली[2] सुवर्ण तनु । स्नानें[3] वोल्हावला सुमनु ।
जळप्राशनें पंच प्राणु । विश्रांतीतें पावले ॥ १४१ ॥
अरण्यकर्दळीपर्णपात्र[1] । निर्मूनि[2] भरिलें[3] तोय पवित्र ।
विशेष मागुतीं[4] उत्तरी[5] वस्त्र । आर्द्र करूनि घेतलें ॥ १४२ ॥
पातला वटवृक्षानिकटीं । तवं पांचही लोळती भूतळवटीं ।
देखोनि[1] आकांतला पोटीं । शोक करी आक्रोशें ॥ १४३ ॥
ह्मणे विधातया[1] मूर्खा । काय रेखिली[2] कर्मरेखा ।
आह्मां ऐशा[3] अभाग्य[4] पुरुषां[5] । काय निमित्य[6] निर्मिलें ॥ १४४ ॥
कुंतिभोजाची नंदिनी[1] । वसुदेवाची[2] पितृभगिनी[3] ।
राया पंडूची वरपत्नी[4] । स्नुषा विचित्रवीर्याची ॥ १४५ ॥

---

१३९. १ **अनुज** औं ख मुं, **आवुज** पु४ ; २ **स्वच्छ** ख ; ३ **सेजे** ख, **तृणशेजे** नि ; ४ **काजें** नि. ही ओवी धु तं मध्यें नाहीं.

१४०. १ ( – ) औं पु ; २ **श्वापदांचे** औं पु ; ३ **येतां** खवर्ग ; ४ ( – ) औं पु ; ५ **जळकांसार** औं मुं गो·२ ; ६ **देखिला** नि.

१४१. १ **धुम्रे** गो, **घर्में** गो२ ; २ **गादली** गो·२ रा ; ३ **त्याणें** औं पु. ही ओवी स धु तं मध्ये नाहीं. प्रक्षिप्त असणें शक्य आहे.

१४२. १ °**कद्ळी**° नि ख रा तं ; २ **मुनी** पु, **भीमें** औं, **निर्मळ** ख ; ३ **भरलें** नि ; ४ ( – ) औं मुं, **मागुती** नि, **मागुतें** पु ; ५ **उत्तरीय** नि गो२, ( – ) पु, **आणीक** औं.

१४३. १ **देखो** नि.

१४४. १ **विधातिया** नि पु४ ; २ **रे लिहिली** औं पु गो ; ३ **ऐसिया** ख नां, **ऐस्या** पु धु, **ऐश्या** गो ; ३–५ **ऐसियातें देखा** औं ; ४ **पुरुखा** नि तं ; ६ **निमित्तें** नि.

१४५. १ **नंदनी** नां गो ; २ **वासु**° ख नां गो·२ रा तं ; ३ **पवित्र भगिनी** नि ; ४ **वीरपत्नी** नि, **श्रेष्ठ पत्नी** औं. ही ओवी मुं मध्यें नाहीं.

आह्मां पापिष्टांची[1] माता । जेवीं कां[2] दीनभणगाची कांता ।
भूतळवटीं[3] लोळे प्रेता । तुल्य दिसे[4] मज दृष्टी ॥ १४६ ॥
सत्यशील[1] पवित्र परम[2] । पुण्यश्लोकांमाजी प्रथम[3] ।
धर्मस्वरूप राजा धर्म । कर्म भोगी केवढें[4] ॥ १४७ ॥
ज्याचिये उपमे दोघे[1] त्रिजगतीं । भार्गवराम कां[2] दाशरथी ।
तो हा अर्जुन वीर[3] क्षिती । लोळे रंकासारिखा ॥ १४८ ॥
ज्याचिया रूपा वेधोनि पुढती । देवांगना न लविती[1] पातीं ।
चातुर्या[2] लाजोनि[3] सरस्वती[4] । पांडुरवर्णा[5] विवर्णा ॥ १४९ ॥
ते हे माद्रीतनय[1] दोन्ही । अति सकुमार[2] सर्वगुणी ।
कौस्तुभ[3] आणि सिमंत[4] मणी[5] । जेवीं कां धुळीं[6] लेपिले ॥ १५० ॥
याहीपरतें[1] थोर दुःख । भोगिलें अथवा[2] भोगिती लोक ।
हें[3] सर्वथा[4] न घडे देख । येक[5] पांडवां वेगळें ॥ १५१ ॥

---

१४६. १ **पापिष्ठांची** नि मुं ; २ ( – ) नि खवर्ग ; ३ **भूतळीं** नि औं पु४ मुं ; ४ **गमे** औं पु.

१४७. १ **सत्यसीळ** पु४ ख नां धु गो२ रा ; २ **धर्म** पु४ ख नां मुं ; ३ **उत्तम** नि खवर्ग गो ; ४ **केव्हडें** पु तं.

१४८. १ ( – ) नि खवर्ग ; २ **कीं** नि पु४ ख मुं , ( – ) औं गो ; ३ **परि** पु४.

१४९. १ **लाविती** नि औं तं , **लववीति** पु४ ; २–३ **चातुर्यें लाजे** औं पु ख ; ४ **सरस्पती** गो२ ; ५ °**वर्ण** नि औं पु नां मुं , °**वर्णी** ख तं.

१५०. १ **माद्रीकुमर** नि औं पु ख ; २ **सुकुमार** नि तं ; ३ **स्यमंत** नि ; ४ **कौस्तुभ** नि , **श्रीमंत** औं पु नां ख गो२ रा तं ; ४–५ **सीमंतिणि** पु४ ; ६ **धुळीनें** नि औं.

१५१. १ **यापरतें** औं पु , **याहीवरी** धु , **ऐसियापरी** मुं ; २ **आणि** नि , **वा** तं ; ३ **परी हें** नि धु , **परी** औं पु ; ४ ( + ) **ऐसें** औं पु ; ५ **येका** नि औं पु४ ख मुं तं.

विश्ववनिता हो[1] पवित्र । पोटीं प्रसवे[2] सभाग्य पुत्र ।
रूपवंत[3] विद्यापात्र[4] । जन्मउंन[5] कां[6] सर्वथा[7] ॥ १५२ ॥
रूपविद्याबळवरिष्ट[1] । त्या आह्मां[2] पांडवां ऐसी वाट ।
इतर मानवांतें[3] कष्ट । काय होती कळेना ॥ १५३ ॥
भाग्यरेखा नसतां[1] भाळीं । वंध्या विद्या कळा सकळीं[2] ।
जेवीं[3] प्राणेंवीण मोकळीं । काय करावीं इंद्रियें ॥ १५४ ॥
अभाग्य जाळूनि[1] केलें नाहीं[2] । ऐसा[3] निश्चय मानूनि देहीं[4] ।
पुत्रेंसहित[5] भोगीं[6] मही[7] । धृतराष्ट्र[8] सभाग्य[9] ॥ १५५ ॥
ऐसा दीर्घस्वरें शोक । भीम[1] करितां भयानक ।
ताळवृक्षीं[2] करालमुख[3] । हिडंबनामा[4] राक्षस ॥ १५६ ॥
तेणें ऐकतांचि कर्णीं[1] । साही जणें[2] देखिलीं[3] नयनीं ।
ह्मणे आहार जोडला वनीं । अनायासें ये काळीं ॥ १५७ ॥
हिडंबा[1] नामें त्याची बहिणी[2] । तीतें प्रेरी[3] आज्ञावचनीं ।
साही[4] मानवें मारूनी । शीघ्र आणीं भक्षावया[5] ॥ १५८ ॥

---

१५२. १ ( – ) पु नां, हे गो; २ प्रसवावा नि पु·४ नां रा, प्रसवा औं धु गो·२, प्रसवावया मुं; ३–४ रूपविद्याबळपात्र नि; ५ जन्मोन पु, जन्मोत पु४, जन्मूनि नां मुं; ५–६ जन्म बाळका ख; ५–७ काज नाहीं ययाचें नि, जन्मे ऐसें वर्तोन का औं.

१५३. १ °वरिष्ठ नि ख; २ ( – ) औं ख; ३ मानवालागीं औं.

१५४. १ न सरतां नि, नव्हतां औं पु; २ सकळी नि औं पु ख मुं गो रा तं; ३ जैसीं नि.

१५५. १ जळोनि धु, जाणोनि मुं; २ पाहीं धु; ३ ( + ) दीर्घस्वरें तं; ४ हृदयीं नि औं पु ख नां; ५–७ धृतराष्ट्रा सुखीं होई नि; ८–९ शल्य तुटलें म्हणोनी नि.

१५६. १ भीमें गो·२ रा; २–३ तालवृक्षविक्राळमुख नि; ४ हिडिंब° नि.

१५७. १ वचनीं नां; २ जनें औं पु, जणी नां मुं तं; २–३ मानवें देखोनि नि.

१५८. १ हिडिंबा° नि तं; २ भगिनी नि खवर्ग; ३ प्रेरितां नि; ४ साहीं पु४ रा तं; ५ भक्षाव्या गो·२ तं.

आतां हिडंबापरिणयन[1] । हिडंबराक्षसाचें हनन ।
तें परिसोत[2] विचक्षण । टीका व्यासऋषीची ॥ १५९ ॥

इति श्री आदिपर्व भारत । मुक्तेश्वरकविविरचित[1] ।
कथामृतें[2] स्वर्गामृत । लोकोपकारा पातलें[3] ॥ १६० ॥

इति श्रीभारते आदिपर्वणि षट्त्रिंशोऽध्यायः ॥

---

१५९. १ हेडिंबा° नि, °पर्णन औं पु मुं, हिडंबावर्णनें पु४, हिडंबा वर्णन ख नां, °परणन धु, °परियण गो२ तं; २ परिसतु पु४ ख नां गो रा.

१६०. १ °कवि वदत तं; २ कथारूपें नि औं पु४ नां मुं गो॰२ रा; ३ कारणें मुं धु.

॥ श्री ॥

# अध्याय सदतिसावा

## श्रीगणेशाय नमः

हिडंबा[1] अवलोकी लोचनें[2] । तवं निद्रिस्त[3] पांचही जणें ।
भीम[4] देखतां पंचबाणें । हृदयवर्मीं ताडिलें ॥ १ ॥
जांबुनंदाचा सोज्वळ[1] पुतळा । कीं[2] कनकमेरूचा[3] मध्य मुसळा ।
रत्नशिखरें तैशा सरळा । भुजा वर्तुळा[4] शोभती ॥ २ ॥
प्रथमवयसेची[1] रिघवणी । स्मश्रुरेखा[2] श्यामवर्णी ।
विशाल भाळ नयन दशनीं । तेज फांके बोलतां ॥ ३ ॥
ह्मणे हा मूर्तिमंत मदन । नीटनेटका[1] बळसंपन्न ।
याचें होऊनि अंगनारत्न । स्वेछाभोग भोगावे ॥ ४ ॥
याचेनि पाडें सुंदर भर्ता । शोधितां न मिळे पृथ्वीवरुता ।
बंधुआज्ञेनें करितां घाता । लाभ[1] कांहीं दिसेना ॥ ५ ॥
मांसभक्षणें क्षुधाहरण । तृप्ति जाणवे[1] अर्धक्षण ।
याचा[2] रक्षूनियां प्राण । अनंत काळ सुख भोगुं ॥ ६ ॥
ऐसा[1] विचार[2] करोनि[3] चित्तीं । सांडोनि राक्षसरूपाची[4] बुंथी[5] ।
वस्त्राभरणीं दिव्य युवती । उभी ठेली सन्मुख ॥ ७ ॥

---

१. १ **हिडिंबा** नि तं पु , **हेडंब** नां मुं , **हिडंब** धु रा ; २ **नयनें** नि खवर्ग गो ; ३ **निद्रिस्थ** नि , **निद्रिस्तें** पु रा ; ४ **भिमें** पु४ ख.

२. १ **सबळ** नां ; २ ( – ) नि ; ३ **कनकतरूचा** नां ; ४ **वर्तुळ** खवर्ग ( नां प्रसंप्रा ).

३. १ °**वयसीची** नि औं नां , °**वयसाची** गो२ ; २ **स्मश्रृ**° औं पु ख मुं धु गो , **श्मश्रु**° नि.

४. १ **नेटका नीट** ख.

५. १ **लभ्य** नां. नि मध्यें ५ व ६ ओव्यांची अदलाबदल आहे.

६. १ **जाणावी** नि धु ; २ **याचे** नि औं पु ख मुं.

७. १–३ **ऐसें विचारूनि** नि ; ४ **राक्षसपणाची** नि ख नां ; ५ **बुद्धि** ख तं औं.

विनयें बोले मधुरवचन । तुह्मीं कोणाचे[1] कोठील[2] कोण[3] ।
येथें यावया काय कारण । ऐसें कळलें पाहिजे ॥ ८ ॥
दिसतां[1] अत्यंत सकुमार । गुणसंपन्न राजकुमर ।
नगरत्यागें वनगव्हर । प्रवेशलेती ये काळीं ॥ ९ ॥
नीलोत्पलाहूनि सकुमारी[1] । पहुडली[2] हे कवण नारी ।
स्वगृहाऐसे[3] घोर कांतारीं । निद्रासनीं निर्भय ॥ १० ॥
हिंडब राक्षसाचें[1] वन । सुरां असुरां दुर्गम स्थान ।
येथें आलेती पांचैजण[2] । मातेसहित नेणतां ॥ ११ ॥
पडतां[1] मनुष्याची घाणी । राक्षसा[2] चेतवला[3] क्षुधाग्नि ।
काळरूपी येचि[4] क्षणीं । येथें[5] येईल[6] भक्षावया ॥ १२ ॥
सर्वनाश मांडल्या काळें । उरे तें उरविजे विचारकुशळें ।
तुज येकासि अंगबळें । वांचवीन या[1] हेतू[2] ॥ १३ ॥
अंगिकार करूनि माझा । भर्तार[1] होई पुरुषराजा ।
मनोभावें तुझी भाजा । मी जालीं[2] जाण[3] पां[4] ॥ १४ ॥
पृष्टी[1] बाहूनि महावीरा । तूतें[2] नेईन द्वीपांतरा[3] ।
येर अवघीं[4] राक्षसआहारा । पात्र[5] होती अदृष्टें ॥ १५ ॥

---

८. १–३ **कोठील आहां कवण** नि.

९. १ **दिसतसां** पु मुं तं.

१०. १ **सुकुमारी** नि ; २ ( + ) **ते** नि ; ३ °**ऐसी** नि , **स्वग्रहाऐसी** पु४ ख.

११. १ ( + ) **हें** नि पु ; २ **पांचहीजण** नि पु४ नां मुं धु.

१२. १ **येतां** नि ; २ **राक्षस** नि पु नां , **रक्षिसाचा** पु४ ; ३ **चेतला** नि औं नां तं , **चेतेल** पु मुं ; ४ **याच** नि ख ; ५–६ **येईल येथें** खवर्ग.

१३. १ **हा** नि , **निज** औं ; १–२ **पाहें तूं** मुं.

१४. १ **भ्रतार** नि औं पु४ नां मुं गो२ ; २ **झालें** नि ; ३–४ **येकाळीं** नि.

१५. १ **पृष्टीं** नि मुं , **पुष्टी** पु गो तं ; २ **तुह्मां** औं पु ; ३ **दिगांतरा** ख , **देशांतरा** नां , **द्विपां°** गो ; ४ **आघवीं** औं पु ; ५ **प्राप्त** नि औं पु नां.

होयें[1] राक्षसाची बहिणी । परी मी[2] शुद्ध[3] अंतःकरणीं ।
दयाशीळा[4] तुझे चरणीं । सत्यभावें[5] विनटलें[6] ॥ १६ ॥
हांसोनि भीम[1] बोले[2] शब्दु । सांडूनि जननी[3] सखे[4] बंधू ।
तुझा विषयभोगस्वादु । विषप्राय मज वाटे ॥ १७ ॥
हिंडबाऐशा राक्षसथाटी । येकसरें पातल्या[1] कोटी ।
वज्रप्राय[2] माझिये मुष्टी–। तळीं होती शतचूर्ण ॥ १८ ॥
राक्षस आलिया[1] ये काळीं । कौतुक पाहें आपुलां[2] डोळीं ।
घायें मेळवीन धुळी । अर्धक्षण[3] न लगतां[4] ॥ १९ ॥
ऐशा[1] उभय मुखींच्या[2] वार्ता । राक्षस ऐके वृक्षावरुता ।
करकराटें खाऊनि दांतां । उडी घाली सत्वर[3] ॥ २० ॥
अट्टहास्यें[1] देतां हाक । वनचर बुजाले येकेंयेक[2] ।
पडताळूनि प्रचंड रूख । काळरूपी धाविन्नला[3] ॥ २१ ॥
तालप्रमाण सलंब सरळा । अंजनाचळासमान[1] काळा ।
खदिरांगार तैसी[2] डोळां[3] । आरक्तता भ्यासुर ॥ २२ ॥

---

१६. १ **मीं होयें** औं पु, **होय** नि ख नां मुं गो रा तं; २ ( – ) औं पु; ३ **निर्मळ** नि; ४ °**शीळ** खत्रं गो रा तं; ५–६ **मी विनटलें सद्भावें** नि.

१७. १–२ **बोले भीम** नां गो; ३–४ **सखे जननी** पु४.

१८. १ **पातल्यां** औं पु; २ **वज्रप्राये** पु·४ धु.

१९. १ **आलियां** औं पु·४; २ **आपुलिया** नि, **आपुला** औं पु धु, **आपुल्या** ख नां मु गो२ रा तं; ३ **अर्धक्षिण** पु४ गो·२; ४ **लागतां** नि औं ख नां गो.

२०. १–२ **ऐसी उभय मुखींची** नि औं पु·४ गो; ३ **सत्वरा** पु४ मुं.

२१. १ °**हासें** औं पु गो·२ रा तं; २ **एकाएक** नि, **येक येक** पु४ ख मुं गो२; ३ **धांवला** नि औं.

२२. १ **अंजनासम** नां धु रा; २ **तैसा** औं पु नां, **तैसे** पु४ गो·२; ३ **डोळे** पु४.

विक्राळ दाढा विकट[1] दशन[2] । मस्तकीं[3] जटा[4] पिंगट[5] वर्ण[6] ।
आरक्त स्मश्रु अति तिक्षण । खर्गप्राय[7] नखधारा ॥ २३ ॥
वनीं[1] आश्वल माजला[2] मस्ती । तेविं[3] धांवे उभविल्या हस्तीं ।
सिंदुरवर्ण सर्पाकृती । जिव्हा लाळी[4] त्रिषातें[5] ॥ २४ ॥
अवयव लोपले रोमेतळीं[1] । कुंडलें लेइला सिसाळीं[2] ।
दृष्टी[3] देखतां तात्काळीं । प्राणहाणी प्राणियां ॥ २५ ॥
राक्षसी ह्मणे भीमसेना । वेगीं उठवीं[1] पांचैजणां[2] ।
सर्वांतेंही नेईन गगना[3] । स्कंदीं वाउनि क्षणार्धें[4] ॥ २६ ॥
भीम ह्मणे भयपीडिते । श्रमोनि पहुडलिया[1] बंधुमाते ।
निद्राभंग करावया येथें[2] । संकट काय सांग पां ॥ २७ ॥
निद्रा न[1] भंगतां[2] यांची । रक्षा करीन राक्षसाची ।
ऐसें ऐकतां[3] क्रोधाची । उलुका[4] सांडी राक्षस ॥ २८ ॥
भगिनीसि बोले निष्ठुरवाणी । दोषरूपें[1] परजारिणी ।
आहार जोडतां पापिणी । आचरलीस विप्रातें ॥ २९ ॥
आतां वधूनि साही जणें[1] । सेखीं तुजही घेईन प्राणें ।
वृक्ष भोंवडूनि सत्राणें । भीमाउजू टाकिला ॥ ३० ॥

---

२३. १–२ शंखवर्ण धु तं गो, शामवर्णि गो२, शंकुकर्ण रा; ३–६ हृदय कठीण वज्राप्रमाण गो२; ७ खड्गप्राय नि.

२४. १ वनींचा नि; २ मातला नि; ३ तैसा नि; ४ झळाली स, लळलळित औं, लवलवी मुं; ५ वीषवत स, वीशाळी धु, विषानें तं.

२५. १ रोमतळीं नि पु तं, रोमातळीं औं पु४ ख नां मुं; २ विशाळीं औं मुं; ३ दंष्ट्रा मुं.

२६. १ (+) या नि, उठवा औं पु; २ पांचहीजणां नि पु४ धु नां; ३ जाणा औं नां; ४ ये समयीं नि.

२७. १ पडल्या मम नि; २ तुतें नि.

२८. १ (–) पु४ ख नां; २ नव्हतां पु४; ३ ऐकोनि नि गो पु४; ४ उल्का नि औं पु ख.

२९. १ °रूपे नि नां.

३०. १ जनें औं पु.

पादप[1] पडताळूनि भीम । वारूनि[2] सांडिला[3] द्रुमें[4] द्रुम ।
वर्मी[5] लक्षूनि राक्षसाधम । वक्षस्थळीं ताडिला ॥ ३१ ॥
तेणें दुखवला सत्राणें । भीम[1] हाणीतला चंडपाषाणें ।
करतळें वारूनियां[2] चरणें । निशाचर लोटिला ॥ ३२ ॥
प्राण घ्यावया संकटीं । हस्त[1] घातला[2] भीमकंठीं ।
परस्परें पडतां मिठी । मल्लयुद्ध माजलें[3] ॥ ३३ ॥
तळप्रहर[1] मुष्टिप्रहर[2] । गुडघे कोंपर मस्तकप्रहर[3] ।
कळाकर्षण[4] पादप्रहर[5] । येरयेरां हाणिती ॥ ३४ ॥
मुष्टिघात वोपितां बळें । डोलों लागलीं[1] पर्वतमौळें[2] ।
थरारोनि पृथ्वीतळें[3] । महाकंपु दाविजे ॥ ३५ ॥
करूनि खिखाट[1] गर्जना । कंठीं रोऊं धांवे दशना ।
भीमें हाणोनि चडकणा । दंतपंक्ती पाडिल्या ॥ ३६ ॥
पांडव ह्मणे पापभरिता । शब्द न करीं मदोन्मत्ता ।
श्रमोनि निजेलीं[1] बंधुमाता । निद्रा त्यांची भंगेल ॥ ३७ ॥
दणके[1] वाजती[2] दणदणा । चेवो[3] आला[4] पांचैजणा[5] ।
दोघे भिडती[6] आंगवणा । प्राण निकुरें[7] घ्यावया ॥ ३८ ॥

---

३१. १ ताड गो·२ ; २–३ निवारिला औं ; ४ (–) नि ; ५ वर्म नि.

३२. १ भीमें पु४ ख नां मुं ; २ वारून नि.

३३. १–२ मिठी घातली नि ; २ घातले गो·२ तं ; ३ मांडिलें नि औं नां , मांडलें पु·४ ख गो२.

३४. १ तळवेप्रहर औं पु४ नां मुं गो रा , °प्रहार नि ; २ °प्रहार नि ; ३ लत्ताप्रहार नि पु४ , करेंकर पु नां , करें कठोर औं , जानुप्रहर ख , प्रहर गो२ ; ४ काळकर्षण नि , कळाकर्षणें स नां मुं ; ५ °प्रहार नि.

३५. १ लागती औं पु४ ख नां गो ; २ सर्वपाताळें गो२ , पर्वतमेळे तं ; ३ सप्तपाताळें स.

३६. १ किंकाट नि औं नां , किंकाटें पु मुं गो·२.

३७. १ निजे औं पु धु गो , पहुडलीं नि.

३८. १ दनक औं पु ; २ वाजतां नि पु रा त , नाद औं ; ३ चेव नि ; ३–४ वाजतां चेवो औं ; ५ पांचांजणा नि ; ६ भिडतां औं पु·४ नां मुं ; ७ निकरें नि.

चौदंत जाले भद्रजाती । मृगेंद्रें कवळिला मृगपति ।
कीं सपक्ष पर्वत पर्वतीं । झगटे तैसे मिसळले ॥ ३९ ॥
शरभ शरभाचिये कवे । कीं गंडभैरव गंडभैरवें ।
तेवीं दोघे भिडतां हांवे । धर्मार्जुनें[1] देखिलें ॥ ४० ॥
कुंती सावध पाहे दृष्टी । तवं दिव्यांगना उभी निकटीं ।
ह्मणे तूं[1] कोण वो[2] गोरटी । महावनीं[3] येकट ॥ ४१ ॥
अप्सरा यक्षिणी[1] वनदेवता । कोण हें सांग[2] मज[3] आतां ।
रंभेसमान स्वरूपता । वस्त्राभरणीं शोभसी ॥ ४२ ॥
येरी वृतांत[1] जाणवी वचनीं[2] । हिंडबदैत्याची[3] मी भगिनी[4] ।
तुह्मां निद्रिस्त[5] देखोनि वनीं[6] । वधावया धाडिलें ॥ ४३ ॥
अवलोकितां भीमसेनातें । व्यसनीं पाडिलें मज[1] मन्मथें ।
तो म्यां कायावाचाचित्तें । प्राणेश्वरू नेमिला[2] ॥ ४४ ॥
तुमचें न करूनियां हनन । कामबुद्धी[1] रातलें मन ।
हें देखोनि क्रोधायमान । राक्षस पाठी पातला[2] ॥ ४५ ॥
तो हा[1] भिनलासे झुझा[2] । परी जयस्वी[3] वल्लभ माझा ।
जो कां द्वितीय पुत्र तुझा । भीमनामा प्रतापी ॥ ४६ ॥
ऐकोनि राक्षसीचें वचन । वेगीं सरसावे अर्जुन ।
सज्जूनियां धनुष्यबाण । राक्षसा उजू धाविन्नला[1] ॥ ४७ ॥

---

४०. १ **धर्मानुजें** औं पु·४ नां.

४१. १ ( – ) औं पु४ ; २ ( – ) गो·२; ३ **असती वनीं** गो·२ ४ **एकली** नि , **येकटी** औं ख.

४२. १ **योगिनी** औं ; २–३ **मज सांग** नि ख नां.

४३. १ **वृत्तांत** नि औं ख तं ; २ ( – ) नि ; ३ **हिंडिंबराक्षसाची** नि औं पु मुं धु ; ४ **बहिणी** नि पु४ मुं धु गो रा ; ५ **निद्रिस्थां** नि ; ६ ( – ) नि औं पु , **नयनीं** पु४ ख धु मुं.

४४. १ ( – ) पु४ ख नां गो ; २ **भाविला** नि.

४५. १ °**बुद्धीं** नि , °**बुधी** औं धु ; २ **धांवला** नि.

४६. १ **ही** औं पु ख धु गो·२ , **हे** नां ; २ **झुजा** नि; ३ **यशस्वी** नि.

४७. १ **धांवला** नि , **धाविनला** पु ख नां मुं रा तं.

नकुळ सहदेव धैर्यमूर्ती[1] । खड्गें पडताळूनि हातीं ।
धाविन्नले बंधुसाह्यार्थी[2] । मारूं ह्मणती राक्षसा ॥ ४८ ॥
भीम वचनें वारी त्यांसी । निश्चळ बैसा धर्मापासीं[1] ।
राक्षस मारूनि क्षणार्धेसी । तुह्मांप्रती[2] येतसें ॥ ४९ ॥
नावेक कौतुक पाहा दृष्टी । ऐकोनि थोकले धर्मापाठीं[1] ।
तवं राक्षसें वज्रमुष्टी । भीममाथां वोपिली ॥ ५० ॥
ते[1] साहोनि[2] बाहुबळीं । उचलूनि टाकिला भूतळीं ।
कूष्मांडफळ आदळे शिळीं । तेवीं गात्रीं भंगला ॥ ५१ ॥
सोमयागीं पशु मारिती[1] । तैसा धुमासिला मुष्टिघातीं ।
उभयचरण धरोनि हातीं । तिक्षण[2] भूमीं वोढिला[3] ॥ ५२ ॥
राक्षसचरण राक्षसकंठीं । गोऊनि दुणता[1] केला कटीं[2] ।
पायें चेपितां कडकडाटीं[3] । अस्तिखंडें[4] शतचूर्ण ॥ ५३ ॥
आर्द्रदुंदुभीचा[1] नादु । तैसा करूनि घोर शब्दु ।
राक्षसें प्राण त्यागितां बंधु । धर्मादिक तोषले ॥ ५४ ॥
टाळिया[1] वाजवोनि[2] हस्तकें । जयजय कृष्ण ह्मणती मुखें ।
स्वर्गींहूनि सुरनायकें । पुष्पांजुळी[3] वोपिल्या ॥ ५५ ॥

---

४८. १ धर्ममूर्ती पु नां पु गो ; २ °साह्यार्थी नि ( स प्रसंप्रा ) औं पु४ मुं.

४९. १ मातेपासीं औं ; २ तुह्मांपाशीं नि खवर्ग. ही ओवी नां मध्यें नाहीं.

५०. १ धर्मानिकटीं नि.

५१. १ तें नि औं गो२ ; २ सोडुनी धु.

५२. १ मर्दिति पु४ ; २ तीक्ष्ण नि औं पु४ मुं ; ३ पाडिला गो, ताडीला गो२.

५३. १ दुमता नि ; २ पाठीं नि, कंठी पु४ धु गो२ तं ; ३ काटितटीं स ; ४ अस्थिखंडें नि औं.

५४. १ ऐके दुंदुभीचा पु४, इंद्रदुंदुभीचा ख.

५५. १ टाळी औं पु ख नां ; २ पिटोनि नां मुं ; ३ पुष्पांजळी वि ( स प्रसंप्रा ).

राक्षसाचे नवही[1] द्वारीं । अशुद्ध लोटलें पृथ्वीवरी ।
सिंदुरवर्ण सरिता थोरी । भयानक अभासे[2] ॥ ५६ ॥
प्रेत सांडोनियां क्षिती । भीम पातला धर्माप्रती ।
प्रथम नमस्करूनि कुंती । राजा पाठीं[1] वंदिला ॥ ५७ ॥
हिडंबेतें ह्मणे वचनीं । तूं जातीची राक्षसिणी ।
बंधुवैर स्मरोनि मनीं[1] । अपाय[2] करिसी आम्हुतें ॥ ५८ ॥
वेगीं जाईं आपुल्या ठाया । कैंचा पुरुष कैंची जाया ।
उदास बोल[1] ऐकोनि[2] पायां[3] । येरी लागे सद्भावें ॥ ५९ ॥
पृथे[1] चरणीं ठेऊनि माथा । ह्मणे अनुमोदीं आपुल्या सुता ।
उपेक्षा न करीं वो सर्वथा । मी राक्षसी ह्मणोनी ॥ ६० ॥
मदनापासाव जे वेदना । पुरुषवियोगें पावती ललना ।
तो[1] अनुभव तुझिया मना । विदित असे सुजाणे ॥ ६१ ॥
पृष्ठीं वाऊनि साहीजणें । तारुनि नेईन दुस्तर वनें ।
समईं[1] समईं भंगोनि विघ्नें । सुख देईन समस्तां ॥ ६२ ॥
माझे पोटीं जन्मेल कुमर । तो करील शत्रूचा संव्हार[1] ।
साक्षी करूनि यादवेश्वर । प्राण रक्षील पार्थाचा ॥ ६३ ॥
आतां आपुलेनि स्वहस्तें[1] । गांठी पाडीं मज भीमातें ।
कुंती ह्मणे ज्येष्ठ पुत्रातें । विचार हृदया आणिजे ॥ ६४ ॥

---

५६. १ नव नि; २ वाहातसे नि.
५७. १ उपरी धु.
५८. १ ( – ) मुं; २ घात नि.
५९. १ शब्द नि औं पु; २–३ ऐकोनियां नां मुं गो२.
६०. १ पृथेचे नि.
६१. १ हा तो नि.
६२. १ त्या त्या नि, त्या पु, ( – ) मुं गो.
६३. १ संहार नि औं मुं.
६४. १ हस्तें नि औं ख नां, हातें धु.

परचित्तपरीक्षासुजाण[१] । धर्मराज विवेकनिपुण ।
शुद्धभाव देखोनि मन । करुणारसें कळवळी[२] ॥ ६५ ॥
भविष्यार्थ जाणे ज्ञाता । ह्मणे[१] विधिनें[२] नेमिल्या[३] अर्था[४] ।
अंगिकारावांचूनि[५] वृथा[६] । काज नाहीं[७] आग्रहीं[८] ॥ ६६ ॥
ह्मणे भीमा माझिये आज्ञा । अंगीकारीं हे पुण्यांगना ।
ईपासाव[१] अपाय प्राज्ञा । नाहीं ऐसें मी जाणें ॥ ६७ ॥
आदरें बोले राक्षसीतें । दिवसा भीम दिधला तूतें ।
रात्रीं रक्षावया आमुतें[१] । सायंकाळीं आणावा ॥ ६८ ॥
भीम बोले निश्चयगोष्टी । येक पुत्र तुझे पोटीं ।
जन्मल्यानंतरें[१] हे[२] राहाटी । पुढां करणें घडेना ॥ ६९ ॥
ऐकोनि दोघांचिया वचना । अवश्य ह्मणोनि लागली चरणा ।
पृष्टीं[१] वाऊनि भीमसेना । क्रीडावनातें[२] गेली ॥ ७० ॥
गुहागव्हरीं[१] पर्वतमौळीं । नाना रमणीक वनस्थळीं ।
नदीपुलिनीं[२] गंगाकुळीं[३] । क्रीडा करिती[४] मनेछा ॥ ७१ ॥
कनकमेरूचे रत्नशिखरीं । सीतळ हिमालयपरिसरीं ।
रजताचळाचे पाठारीं । सुरतोपचारीं क्रीडती[१] ॥ ७२ ॥

---

६५. १ परिचीत परीक्षा° पु४ ख ; २ कवळिला नि पु नां मुं गो·२.

६६. १ ( – ) औं पु ; १–४ होणार तैसेंच सर्वथा नां ; ५ अंगिकाराविणें नि ख ; ५–६ म्हणे विधिनें नेमिल्या अर्था नां ; ७–८ कायसा आग्रहो नां ; ८ आग्रहा नि मुं , आमुतें पु४ , सर्वथा ख.

६७. १ इजपासाव नि , इयेस्तव औं पु , इयापासाव नां.

६८. १ त्यातें पु४ , तेथें ख.

६९ १ झालियानंतर नि ; २ ( – ) औं पु·४ नां मुं.

७०. १ खांदीं नि , पुष्टीं औं पु गो ; २ क्रीडावना पैं नि.

७१. १ °गंव्हरी पु४ , °गंव्हरें पु , °गंव्हारें गो२ , ;°गंव्हारी तं ; २ °पुलिनें पु धु रा , °पुलिगें गो·२ ; ३ गंगाजळीं नि ; ४ करी नि खवर्ग ख प्रसंप्रा ).

७२. १ क्रीडत औं पु. नि मध्यें ७२ व ७३ ओव्यांची अदलाबदल आहे.

द्रोणाचळीं चंद्राचळीं । मंदराचळीं[1] विंध्याचळीं ।
मलयाचळीं सिंहाचळीं[2] । सुखसमेळीं रममाणें[3] ॥ ७३ ॥
सोमकांतसिळाचळीं[1] । सूर्यकांतकाश्मीराचळीं ।
हेमभूमिकारत्नस्थळीं[2] । सुखसमेळीं क्रीडती ॥ ७४ ॥
कर्पूरकर्दळीकेचे[1] वनीं । कुंकुमकेशरउद्भवस्थानीं[2] ।
सुरतानंदें क्रीडती दोन्ही । मद्यपानीं मनेछा ॥ ७५ ॥
मानससरोवरीं[1] हंसतडागीं । सुवर्णपंकजवनपरागीं ।
प्रवाळवल्लीच्या सुरंगीं । सुखसंयोगीं[2] क्रीडती ॥ ७६ ॥
भक्षें[1] भोज्यें[2] पिशिताशनें । नानारसांचीं रसपानें ।
फळ[3] तांबूल[4] सुगंधसुमनें[5] । भोगोपचारीं[6] वोळगे ॥ ७७ ॥
लोटल्या[1] येक संवत्सर । भीमवीर्यें महाक्रूर ।
राक्षसीगर्भीं[2] जन्मला कुमर । भीमभैमी[3] अद्भुत[4] ॥ ७८ ॥
पितयातुल्य पराक्रमगुणीं[1] । कराळवदन शंकुकर्णी[2] ।
आजानबाहु[3] विकटदशनी[4] । लंबोष्टी[5] रक्ताक्ष ॥ ७९ ॥

---

७३. १ मंद्राचळीं औं पु·४ गो रा, मुद्राचळीं ख ; २ हिमाचळीं नि औं पु ; ३ क्रीडती नि.

७४. १ सोमकांत शीतळ तळीं नि औं पु४, सोमकांत शीतळ जळीं ख तं ; २ °भूमिके रत्नस्थळीं नि खवर्ग.

७५. १ °कर्दळीचे नि औं ख नां ; २ केसरकस्तुर° औं, कुंकुमकस्तुरिउद्भव° पु४.

७६. १ मानससरीं पु गो, °सरोवर नि ; २ °संभोगीं नि. ख मध्यें ही ओवी नाहीं.

७७. १ भक्ष्य नि औं गो, भक्ष पु·४ ख नां मुं गो२ रा ; २ भोज्य नि खवर्ग गो ( पु प्रसंप्रा ) ; ३ फळें नि ; ४ तांबोळ पु ख नां मुं ; ५ सुवर्ण सुमनें पु४ ; ६ °चारें नि.

७८. १ लोटल्यां औं पु धु ; २ राक्षसी उदरीं नि, राक्षसीजन्मी पु·४, राक्षसीजन्मे औं, (–) ख नां मुं ; ३–४ पितियातुल्य पराक्रमी नां.

७९. १ पराक्रमीं औं पु·४ ख, पराक्रमकरणीं मुं ; २ शंकवर्णी धु नां, शंखवर्णी स औं ख मुं; ३ आजानुबाहु नि; ४ °दशनीं नि; ५ लंबोष्ठी नि औं.

मस्तक पाषाणघट[1] निष्कच । शब्द करी महाउंच[2] ।
यालागीं नामें[3] घटोत्कच । माता ठेवी आवडी[4] ॥ ८० ॥
राक्षसीगर्भ ततक्षणीं[1] । जन्मत[2] युवा[3] बाळपणीं ।
शस्त्रास्त्रीं प्रवीण[4] गुणीं । रूपें[5] अनेक[6] पालटी ॥ ८१ ॥
नमस्कारूनि पांचही[1] पिते । भावें वंदिलें पितृमाते ।
पुत्र देखोनि पांडवांतें । श्रेहानंद[2] न संटे[3] ॥ ८२ ॥
ह्मणे मांडल्या विषम वेळ । घेऊनि राक्षसांचें दळ ।
स्मरतां पावोनि[1] तात्काळ । निर्दाळीन[2] शत्रूतें ॥ ८३ ॥
हिडंबा नमस्कारूनि धर्मा । बोले जोडोनि पाणिपद्मा[1] ॥
कार्य विशेष[2] मांडल्या तुह्मां । आठविजे[3] दासीतें ॥ ८४ ॥
सीघ्र येऊनि पुत्रेंसहित[1] । संपादीन अवघड कृत्य ।
ग्रासूं पातल्या कृतांत । पायें लोटीन माघारा[2] ॥ ८५ ॥
ऐसी[1] बोलूनियां युक्ती । घटोत्कच धरोनि हातीं ।
गेली उत्तरदिशेप्रती । गगनपंथें[2] राक्षसी ॥ ८६ ॥
शक्रशक्ति प्रेरितां कर्णें । अर्जुन रक्षावया प्राणें ।
भैमी निर्मिला[1] शचीरमणें । पुत्रलोभें यापरी ॥ ८७ ॥

---

८०. १ पाषाण मुं, °घट्ट नि; २ घनघोर वाच्य औं, ३ नांव नि; ४ तयातें नि.

८१. १ तत्क्षणीं नि पु; २ जन्म औं पु नां, जन्मतां मुं तं; ३ योद्धा ध्रु; ४ परम नि, पवित्र ध्रु गो॰२, नाम ख; ५ रूप नि ख मुं; ६ आणिक नां मुं.

८२. १ पांचै औं पु ख गो॰२ रा; २ परमानंद नि; ३ संडे रा तं, संठे मुं, संडवे नां.

८३. १ पावेन नां; २ निर्दळीन पु ध्रु गो२ रा.

८४. १ करपद्मा औं पु नां मुं, पादपद्मा ख तं, हस्तपद्मा पु४; २ विषम नि ख नां; ३ (+) मज औं पु.

८५. १ पुत्रसहित नि नां; २ माघारां नि, माघारें गो.

८६. १ ऐशा पु४ ख मुं गो रा तं; २ गगनपथें नि.

८७. १ रचिला खवर्ग (नां प्रसंप्रा).

धर्म ह्मणे भीमार्जुना । आतां त्यागूनि यया[1] वना ।
स्थळें[2] अवलोकीत[3] नयना । सत्यपंथें चालावें ॥ ८८ ॥
अवश्य ह्मणोनि पवित्राचारी । जटावल्कलें[1] अजिनांबरी[2] ।
माता वाऊनि पृष्टीवरी[3] । ज्येष्ठापाठीं निघाले[4] ॥ ८९ ॥
अवलोकीत[1] विचित्र[2] वनें । सेविती फळें सरिताजीवनें ।
तपोधनाचीं आयतनें । अत्यादरें वसवीती[3] ॥ ९० ॥
सांग अभ्यासिले[1] वेद । शास्त्रसिद्धांत मतभेद[2] ।
अर्थवाद यथार्थवाद । विचारविद[3] जाणती ॥ ९१ ॥
वेदीं वर्णोक्त पाठसिद्धी । शास्त्रीं संपूर्ण अर्थसिद्धी ।
नीतिशास्त्रीं[1] क्रियासिद्धी[2] । अनुभवसिद्धी वेदांतीं[3] ॥ ९२ ॥
ऐसियापरी सार्थक काळ । आत्मचिंतनीं फेडित[1] वेळ[2] ।
व्यर्थ जाऊं नेदिती[3] पळ । कृष्णस्मरणावेगळें ॥ ९३ ॥
मछ[1] त्रिगर्त पांचाळ । कीचकदेशाचें मंडळ ।
उलंघूनि[2] विशाळ[3] शैल[4] । पुण्यारण्या पातले ॥ ९४ ॥
दिवस[1] पक्षीं[2] पंचराती[3] । स्थळींस्थळीं[4] करूनि वस्ती ।
पुढां[5] चालतां दैवगती । अलभ्य लाभ जोडला ॥ ९५ ॥

---

८८. १ या नि आ पु नां, (-) पु४ ख मुं; २ स्थळ नि; ३ अवलोकोनियां नि खवर्ग.

८९. १ °वल्कल नि; २ °वरीं नि (स प्रसंप्रा); ३ पाठीवरी खवर्ग, पुष्टीवरी गो·२ रा; ४ निघाला नि धु पु४.

९०. १-२ अवलोकिती विचित्रें नि; ३ सेविती नां.

९१. १ संपादिले गो२; २ मत्तभेद पु नां धु गो रा, मंत्रवेद मुं; ३ विचारवेदी तं.

९२. १-२ नीतिशास्त्रोक्तीं विविधी नि, °शास्त्रांचिया सिद्धी पु, °शास्त्रोक्ति या सीधि पु४; ३ वेदांत नि खवर्ग (परियत पु४).

९३. १ काढिती नि, फेडितां खवर्ग, लोटिती धु; २ सकळ धु; ३ न देती नि.

९४. १ मत्स्य नि; २ लंघूनि औं पु मुं; ३ महा नि; ४ शैल्य पु४ ख नां मुं, शैळ धु गो·२.

९५ १-३ पंचरात्री सप्तरात्री नि, कोठें दिवसेक पंचरात्री औं; २ पंथीं पु नां, पक्षिणी पु४ ख गो२ तं, पक्षिणी रा; ४ स्थळोस्थळीं नि धु; ५ पुढें नि पु४ ख नां तं; ६ देखिला नि. मुं मध्यें ही ओवी नाहीं.

पितामहा[1] व्यास भगवान । दयाब्धि कृष्णद्वैपायन ।
आदरें द्यावया दर्शन । मार्गीं उभा देखिला[2] ॥ ९६ ॥
अवलोकितां श्रीगुरुमूर्ति । पांडवां आनंद न धरे[1] चित्तीं[2] ।
जैसा प्राण परते प्रेतीं । तेवीं जालें समस्तां ॥ ९७ ॥
भावें घालितां लोटांगण । अश्रुधारा श्रवती नयन ।
मस्तकीं वंदोनि चरण । उकसाबुकसीं स्फुंदती ॥ ९८* ॥
मस्तक स्पर्शोनि हस्तकें । श्रेहें शांतवी निजबाळकें ।
ह्मणे सर्वही मज ठाउकें । मुखें कांहीं न[1] बोला[2] ॥ ९९ ॥

---

९६. १ **पितामह** नि औं पु·४ मुं रा ; २ **ठाकला** पु४ , **जोडला** तं.

९७. १ **धरवे** नि पु४ नां , **संटे** औं पु ; २ **क्षिती** पु४ ख नां गो·२.

९८. * खवर्ग मध्यें २,३ व ४ चरण पुढीलप्रमाणें आहेतः-**साही वंदिती श्रीचरण । द्वैपायन आलिंगण । दे प्रेमभावें पांडवां ॥**. या पुढें नि व खवर्ग मध्यें पुढील ओव्या जास्त आहेतः—

**जोडोनियां करपंकज । स्तवन करी धर्मराज ।**
**ह्मणे तूं आमुचा पूर्वज । सांभाळावया आलासी ॥ ९८ अ ॥**
**जयजय सत्यवतीनंदना । पराशरात्मजा गुणनिधाना ।**
**योगियांच्या मुकुटरत्ना । भवार्णवतारका ॥ ९८ आ ॥**

या ओवीखालीं औं पु मध्यें पुढील श्लोक आहेः—

अचतुर्वदनो ब्रह्मा द्विबाहुरपरो हरिः । अभाललोचनः शंभुर्भगवान्बादरायणः ॥

**येकाननीं[1] चतुरानन । तूं[2] द्विभुज[3] नारायण ।**
**भाळांवकावीण त्रिनयन । हें महिमान स्वामीचें ॥ ९८ इ ॥**

१ च्यारी मुखें नसतां औं पु ; २–३ नसोन चतुर्भुज औं पु.

**कौरवी[1] क्लेशगिरितळीं । आम्हां निजविलें संकटानळीं[2] ।**
**तव स्मरणकुलिशें[3] कृपासलिलीं । लया गेलीं सकळ विघ्नें ॥ ९८ ई ॥**

१ कौरव नि ; २ °टाजळीं नि, °टाचळीं स ख नां मुं ; ३ स्मरणें स औं.

९९. १–२ **नोबोला** ध , **नोंधला** तं , **न बोलावें** नि ( स प्रसंप्रा ). खवर्ग मध्यें या ऐवजीं पुढील ओवी आहेः—

**ऐसें ऐकोनियां वचन । व्यासें केलें समाधान ।**
**नाश पावतील दुर्जन । कल्याण तुमचें होईल ॥ ९९ ॥**

दुर्जनीं भोगविलें दुःख । तितुकें स्वयें[1] सेविती[2] विख ।
सीघ्र पावाल अक्षय सुख । क्षमाशील ह्मणोनी ॥ १०० ॥
पृथे सांडीं चिंताज्वर । चक्रवर्तिया[1] युधिष्ठिर ।
दानोदकाचा सागर । आठवा करील भूतळीं ॥ १०१ ॥
पुढती माझें आगमन । तवंवरी स्वस्थ[1] करुनि मन ।
नेमूनि देतसें[2] वस्तीस्थान । तेथें गुप्त वसावें ॥ १०२ ॥
येकचक्रनाम[1] नगरी[2] । तेथें[3] पवित्र[4] ब्राह्मणागारीं[5] ।
वास[6] करावा[7] षण्मासवरी[8] । प्रगट[9] कोण्हा[10] नेणतां[11] ॥ १०३ ॥
नेमिल्या काळें[1] येईन भेटी । तेवेळीं सांगेन विचारगोष्टी ।
तैसी पुढें करावी राहाटी । कृपादृष्टी अनुवादे ॥ १०४ ॥

---

१००. १ तिहीं स, तेहिं धु, सर्व गो २ ; २ सेविलें स धु.
ही व पुढील ओवी खवर्ग मध्यें नाहीं.

१०१. १ °वर्ती नि धु.
नि खवर्ग मध्यें पुढील जास्त ओव्या आहेतः—

रमाधव धरिजे चित्तीं । आणि[1] स्वधर्म पाळिजे सुमति[2] ।
तेणें सकळ अरिष्टें भस्म[3] होती । धर्मराया जाण पां ॥ १०१ अ ॥

१ ( – ) नि औं ; २ सुमतीं नि; ३ शांत नि.

येथूनि भाग्याचा उमाळा । भीम नासील दुष्ट कुळा[1] ।
पुढें विजयलक्ष्मी माळा । गळां घालील आनंदें[2] ॥ १०१ आ ॥

१ दैत्यांला औं पु ; २ निर्धारें नि मुं , पार्थाचे नां.

१०२. १ स्वस्त धु गो२ ; २ देतों नि.
खवर्ग मध्यें याऐवजीं पुढील ओवी आहेः—

ऐसें सांगोनि वर्तमान । केलें पांडवांचें समाधान ।
स्वयें पातला अंतर्धान । मुकुटमणि योगियांचा ॥ १०२ ॥

१०३. १ आतां येकचक्र° खवर्ग ; २ नगराप्रती खवर्ग ; ३–५ पांडव जातील सहकुंती खवर्ग ; ६–८ तेथें येकाग्र करूनि चित्तवृत्ती खवर्ग ; ९–११ श्रोतीं सादर परिसावें खवर्ग , चिंता दुरुस्त करावी गो·२; १०–११ कोणा न होतां नि.

१०४. १ काळीं नि गो·२. ही व पुढील ओवी स खवर्ग मध्यें नाहीं.

दर्शनें[1] देऊनि[2] समाधान । अदृश्य जाला बादरायण ।
कुंती आणि पांचहीजण । येकचक्रा पातले[3] ॥ १०५ ॥
इति श्री भारते[1] आदिपर्वणि । मूळ[2] व्यासोक्ति कृष्णवेणी[3] ।
भीमा[4] मुक्तेश्वराची[5] वाणी[6] । येकरसी[7] समरसें[8] ॥ १०६ ॥
संतअवधान[1] वर्षाकाळीं । पुरें मातल्या[2] पृथ्वीतळीं ।
साक्ष[3] शंकर मध्यस्थळीं । जो[4] पारखी[5] दोहींतें[6] ॥ १०७ ॥
यालागीं यथायोग्य उपमा । साजे काडलूरसंगमा ।
धर्मगंगा परिहरी श्रमा । कृष्णा वारी तृष्णेतें ॥ १०८* ॥

इति श्रीभारते आदिपर्वणि सप्तत्रिंशोऽध्यायः ॥

---

१०५. १–२ ऐसें करून नि ; ३ पातलीं नि.

१०६. १ ( – ) पु४ नां मुं ; २ ( – ) नि खवर्ग ; ३ तेचि मंदाकिनी नि खवर्ग ; ४ वैशंपायन नि खवर्ग ; ५–६ ओघजनीं नि ख, बुद्धि वोघजनीं पु, बुद्धि बोधुजनीं औं, बुद्धि दोघेजनि नां, वोघजननीं मुं ; ७ येकांगरसीं गो, येकांगशशि गो२, येकार्थरसिं रा ; ७–८ मित्रात्मजा जाणिजे नि खवर्ग ; ८ समरसा धु.

१०७. १ सप्ता आवर्षण गो, संत आवर्षण गो२ ; २ माजल्या गो ; ३ साक्षात् तं ; ४–६ कृष्ण वारी तृष्णेतें गो२.

नि खवर्ग मध्यें या ऐवजीं पुढील ओवी आहेः—

अर्थ[1] गुप्त[2] सरस्वती सुंदर । तो स्वामी लीलाविश्वंभर ।
भारत[3] त्रिवेणीवोघ[4] परिकर । अक्षय[5] वट जन्मेजया ॥ १०७अ ॥

१–२ आर्त गुह्य स ; ३ भरतां नि (स प्रसंप्रा), भरत पु ; ४ त्रिवेणी घोर पु, त्रिवेणी योग पु४ ; ५ आक्षय पु नां, अक्षय्य नि.

१०८. * या जागीं नि खवर्ग मध्यें पुढील ओवी आहेः–

श्रवणतीर्थीं तीर्थविधान । सांगता[1] तीर्थउपाध्या ब्राह्मण ।
मुक्तेश्वर परम दीन । कवि[2] किंकर संतांचा ॥ १०८ ॥
१ सांगतां नि ; २ कीं तो नि ( स प्रसंप्रा ).

॥ श्री ॥

# अध्याय अडतिसावा

## श्रीगणेशाय नमः

येकचक्रपुरी[1] आंत[2] । ब्राह्मणगृहीं जननीसहित ।
वसते जाले तें अद्भुत । प्रगट कीं[3] गुप्त विचारा ॥ १ ॥
विनयार्जवें मृदु मंजुळ । वचनें आप्त जाले सकळ ।
दीन[1] ब्राह्मणाचे[2] बाळ[3] । ऐसें जनीं भाविलें[4] ॥ २ ॥
सत्य विनीत[1] प्रिय भाषणीं । त्यातें[2] वश्य सकळ प्राणी[3] ।
पांडव आथिले इहीं गुणीं । यालागीं मान्य सकळांतें ॥ ३ ॥
सत्य आणि सहनसीळ । तेणें जिंकिलें[1] विश्व सकळ ।
ऐसिये[2] गुणीं सर्व कुशळ । ह्मणोनि[3] वंद्य[4] विश्वातें[5] ॥ ४ ॥
सर्वभूतीं[1] समान दया । निर्जर नमस्कारिती तया ।
ऐसिये गुणीं भूषित काया । ह्मणोनि प्रिय[2] देवांतें[3] ॥ ५ ॥
वृत्ती लागीं[1] निराभिमान[2] । भिक्षेसि जाती पांचहीजण[3] ।
आणिलें[4] येकत्र करोनि[5] अन्न[6] । मातृहस्तीं वोपिती ॥ ६ ॥

---

१. १ °चक्रनगरी नि नां, °चक्री पुरी औं पु ख, °चक्री नाम नगरी धु; २ नगराआंत गो२; ३ (–) नि औं धु.
नां मध्यें हा सबंध अध्याय गहाळ आहे.

२. १–३ अत्यंत प्रिय ते सोज्वळ नि, अत्यंत प्रिय सोज्वळ खवर्ग; ४ भाविजे नि.

३. १ वचनी तं, शुद्ध औं; २ त्यासी नि मुं; ३ प्राणी नि (स प्रसंप्रा).
औं पु मध्यें २ व ३ चरणांची अदलाबदल आहे.

४. १ जिंतिलें पु मुं धु; २ ऐशिया नि, ऐसे खवर्ग; ३ यालागीं ख; ४ मान्य ख, प्रिय तं; ५ सर्वांतें औं पु, सकळांतें ख रा.

५. १ सर्वांभूतीं गो; २ वंद्य खवर्ग; ३ सर्वांतें खवर्ग.

६. १ जाली नि खवर्ग; २ निरभिमान नि पु४; ३ पांचैजन औं पु ४ आणिती नि खवर्ग, (+) तें नि; ५–६ करून नि खवर्ग.

जननी आपुलेनि हातें । अर्ध[1] वोपी भीमसेनातें[2] ।
आहार विशेष असे[3] त्यातें । यालागीं[4] बंधू रक्षिती ॥ ७ ॥
शेष उरलें पंचधा करी । च्यारी[1] वोपी चौघां करीं ।
येक भाग आपुल्या[2] उदरीं । क्षुधाग्नीतें शांतवी ॥ ८ ॥
ऐसे लोटले दिवस कांहीं । पुढां[1] एके दिवसीं पाहीं ।
अकस्मात ब्राह्मणगेहीं । शोकध्वनी माजल्या[2] ॥ ९ ॥
ग्रहस्त[1] भार्या सुत कन्यका । चौघे कवळूनि येकमेकां ।
दीर्घस्वरें करिती शोका । तें पृथेनें परिसिलें ॥ १० ॥
मातेसि बोले भीमसेन । ब्राह्मण[1] करितीं[2] दीर्घरुदन[3] ।
त्या दुःखासि काय कारण । तें विचारीं पवित्रे ॥ ११ ॥
असेल पर्वताहूनि थोर । तेंहीं[1] परिहरीन[2] साचार ।
गृहीं वसों तो[3] उपकार[4] । कांहीं उत्तीर्ण या[5] होणें ॥ १२ ॥
पुत्र गेलियां[1] भिक्षाटणा । कुंती प्रवेशे[2] विप्रसदना ।
तवं द्विजाची विलापकरुणा । कर्णरंध्रीं नेघवे[3] ॥ १३ ॥
ह्मणे बळिष्टा[1] पूर्वकर्मा । कोण प्रस्थावो[2] योजिला आह्मां ।
जो[3] मरणावांचूनि निर्गमा । आन मार्ग[4] असेना ॥ १४ ॥

---

७. १ अर्धें नि; २ भीमातें नि पु४; ३ आहे औं पु; ४ म्हणोनि नि.

८. १ चार नि; २ आपुले नि ख मुं, आपुला ( लां ) पु·४ धु गो रा.

९. १ पुढें नि खवर्ग; २ मांडिली नि औं पु·४ मुं, मांडल्या ख धु, माजली गो२, माजला तं.

१०. १ गृहस्थ नि, गृहस्त गो तं.

११. १ ब्राह्मणें गो रा; २ करी नि; ३ °रोदन नि. ही ओवी खवर्ग मध्यें नाहीं.

१२. १ तरी मी नि खवर्ग ( ते मी पु४ ); २ परिहारीन नि खवर्ग, ( + ) संकट नि; ३ ते नि; ४ प्रत्योपकार गो२; ५ पैं पु४, यां पु रा.

१३. १ गेलिया नि ख मुं, गेलेया गो·२; २ प्रवेशली नि पु४ ख मुं; ३ न घेववे नि.

१४. १ बळिष्ठा नि मुं; २ प्रस्तावो नि गो२, प्रस्ताव औं पु ख, प्रस्थावा पु४; ३ जें औं पु; ४ कांहीं नि खवर्ग.

धीग[1] धीग[2] संसारीं[3] नर निर्धन । धीग[1] धीग[2] प्राणी पराधीन ।
धीग[1] धीग[2] राजा पुरुषार्थहीन । जो[4] व्यसनीं पाडी प्रजांतें ॥१५॥
याचिलागीं[1] तुज सुंदरी । मागां बोधिलें[2] बहुतांपरी ।
हें स्थळ त्यागूनि स्थळांतरीं । निर्भयदेशीं वसावें ॥ १६ ॥
पूर्वजांचा वसता ठावो । यालागीं येथेंचि[1] धरिला[2] भावो ।
आतां अनर्थाचा[3] घावो । कोण वारी सांग पां ॥ १७ ॥
जळो या[1] मृत्युलोकींचा वास । जेथें नाहीं सुखाचा लेश ।
सुख भाविती त्याचा वोस[2] । ज्ञानविचार[3] जाणावा[4] ॥ १८ ॥
विषय[1] द्रव्य[2] दारा कुमरें । जेथें आभासे[3] सुखाचें वारें ।
वियोगकाळीं ब्रह्मांड भरे[4] । शोकदुःखें[5] अपार ॥ १९ ॥
माझेनि मरणें[1] कुटुंबा[2] मरण । कुटुंबत्यागें दुःख दारुण ।
आह्मां चौघांमाजी कोण । मृत्या वोपूं सांग पां ॥ २० ॥
आतां असो अवघी बोली । स्नेहें बाळातें[1] प्रतिपाळीं ।
मी हें[2] देह द्यावया बळी । बकारण्या जातसें ॥ २१ ॥
भार्या ह्मणे प्राणेश्वरा । उसंतुं[1] नको[2] शोकसागरा ।
मी सांगेन त्या विचारा । अत्यादरें अनुष्टीं[3] ॥ २२ ॥

---

१५. १–२ धिक् धिक् नि ( धिग् धिग् स ); ३ संसारी नि ख धु; ४ ( – ) नि.

१६. १ यालागीं ख मुं गो·२ ; २ बोलिलों धु तं.

१७. १ येथें नि गो ; १–२ धरिला येथेंचि पु·४ मुं ; ३ अरिष्टाचा नि.

१८. १ ( – ) नि खवर्ग ; २ वेश खवर्ग ; ३ श्वान विचारें औं पु ख, श्वानविचार पु४ मुं ; ४ जाण पां पु मुं गो२·

१९. १–२ विषयेंद्रिय औं पु ; ३ भासे खवर्ग गो ; ४ भरें नि गो·२ तं ; ५ °दुःख पु४ ख मुं रा तं.

२०. १ मृत्यें नि, स्मरणें पु ; २ कुटुंबासीं नि. मुं मध्यें दुसरा चरण विघ्न आलें तें निस्तरण असा आहे.

२१. १ बाळांतें तूं नि ; २ ( – ) नि खवर्ग गो२.

२२. १–२ उपशोनी कां पु४ , उपसो नको ख ; ३ अनुष्टीं नि मुं.

अंगिकारूनि[1] देह[2] मरणा । मी जाईन राक्षसवना[3] ।
दुहिता[4] आणि[5] निज[6] नंदना । संरक्षूनि असावें ॥ २३ ॥
शरीरेंसी वित्त जीवित । वेंचूनि[1] करी पतीचें हित ।
तेचि[2] उभय लोकाआंत[3] । पवित्र ऐसें बोलती ॥ २४ ॥
जन्मला प्राणी पावेल[1] मरण । येथ[2] कां व्याकुळ करिसी[3] मन ।
आपुल्या सुखालागीं धन । पुत्र दारा इत्यादि ॥ २५ ॥
ह्मणोनि माझेनि येके[1] त्यागें । क्षेम आपणा[2] उरवा[3] तिघें ।
अपत्यपाळण तुज मागें । कदां[4] नोहे[5] माझेनि[6] ॥ २६ ॥
ऐसें जननीतें[1] बोलतां । तीतें ह्मतें वारी दुहिता ।
ह्मणे चिंता न करीं ताता । वाक्य माझें अवधारीं ॥ २७ ॥
माझा[1] देह[2] तवं[3] निश्चितीं । अर्पिला[4] पाहिजे[5] पुढिला[6] हातीं ।
तेचि भावना धरोनि[7] चित्तीं । त्याग माझा करावा ॥ २८ ॥
भर्तार[1] भाऊनि केवळ । स्वयें[2] वरीन मृत्यकाळ[3] ।
तुह्मी दोघे असिल्यां[4] कुशल । पुत्र[5] पावेल[6] वृद्धीतें ॥ २९ ॥
नरकापासूनि तारी[1] पुत्र[2] । ऐसें बोले वेदशास्त्र[3] ।
पुत्र रक्षिल्या[4] पवित्र[5] । लोक[6] होती तुह्मांतें ॥ ३० ॥

---

२३. १–२ अंगिकारुनियां औं पु ; ३ बकारण्या औं, राक्षसभुवना नि पु·४ मुं ; ४–६ आपण निजकन्या नि.

२४. १ वोपूनि धु गो ; २ ते नि खवर्ग (त्या मुं), (+) कुलीन नि ; (+) स्त्रिया मुं ; ३ लोकांत नि मुं.

२५. १ पावे नि खवर्ग ; २ तेथें नि ; ३ करावें नि.

२६. १ एक नि मुं तं ; २–३ उरावें आपण नि, उरणें आपण पु, उरिजे आपण औं ; ३ उरवावीं गो·२ ; ४–६ माझेनि न करवे सर्वथा मुं.

२७. १ जननी गो·२.

२८. १–३ माझ्या देहातें नि औं पु·४ ख; ४ दीधला गो२, वोपिलें नि, ४–५ अर्पिजेल खवर्ग ; ६ पुढिल्या नि ख ; ७ करूनि पु४.

२९. १ भ्रतार नि औं मुं गो२ ; २ सैंवरीं मुं, अवस्ये धु ; ३ मृत्यु-काळ नि पु·४ रा गो२ मुं ; ४ असल्या नि, असा मुं ; ५–६ पुढती पावाल नि.

३०. १–२ तारित खवर्ग (तारितां ख) ; ३ (+) बहुत पु४, (+) वक्ता ख ; ४ रक्षिल्यां औं पु·४ धु; ५ त्वरित पु४, तुह्मातें बहुता ख ; ६ लेकी पु·४ ख, कन्या औं मुं.

ऐकोनि तिघांची[1] वाणी । बाळक[2] बोले बोबडा[3] वचनीं ।
मातापितया[4] आणि[5] बहिणी । शोक कांहीं[6] न करावा ॥ ३१ ॥
हातीं[1] घेऊनि तृणकाडी । ह्मणे मी आपुले आंगप्रौढी[2] ।
वना जाऊनि तांतडी । निर्दळीन[3] असुरातें ॥ ३२ ॥
एकोनि बाळकाचें वचन । स्नेहें कळवळी[1] पृथेचें मन ।
मोहें देऊनि आलिंगन[2] । मग विचारी[3] वडिलांतें[4] ॥ ३३ ॥
ह्मणे कवण[1] संकट[2] तुह्मां । मांडलें असे ब्राह्मणोत्तमा ।
तें[3] सांगता[4] साचार[5] आह्मां । परिहरे[6] तें[7] विचारूं ॥ ३४ ॥
द्विज ह्मणे वो[1] स्नेहभरिते । व्यर्थ[2] काय[3] सांगिजे तूतें ।
आमुचें अरिष्ट हरिहरातें । हारिलें[4] न वचे[5] सर्वथा ॥ ३५ ॥
बकनामा राक्षस[1] बळी । नगरासमीप वनस्थळीं ।
वसे[2] त्यातें जनीं सकळीं । नेमिलासे विभाग[3] ॥ ३६ ॥
देशप्रजासहित नगर । राक्षस रक्षी निरंतर ।
भूतारिष्ट[1] कां[2] परचक्र । स्पर्शों नेदी स्थळातें ॥ ३७ ॥

---

३१. १ (+) ही गो·२ ; २ **बाळ** नि औं पु ; ३ **बोबडे** नि ख तं ; ४ **माते पितया** नि पु ख गो२ रा ; ५ (–) नि खवर्ग ; ६ **सहसा** औं पु.

३२. १ **हातें** पु४ ख ; २ **आंगें प्रौढी** ध , **प्रौढी** पु४ ; ३ **निर्दाळीन** नि ( स प्रसंप्रा ) पु४ ख मुं तं.

३३. १ **कळवळलें** नि मुं गो·२ , **कवळी** पु४ ख ; २ **आलिंगन** नि मुं , **आळिंगण** पु गो·२ ; ३ **पाचारि** ख ; ४ **वडिलातें** नि ( स प्रसंप्रा ).

३४. १ **संकट** औं पु ख मुं ; २ **कोण** औं पु , **कवण** ख , **काय** मुं ; ३–४ **तैसेंच सत्य सांगा** नि खवर्ग ; ४–५ **साचार सांगतां** गो·२ रा ; ६ **परिहारे** ध ; ६–७ **परिहारातें** पु४ गो२.

३५. १ (–) नि पु ख ; २ (–) खवर्ग ; ३ **कासया** औं पु·४ ख गो·२ रा ; ४ **हरिलें** ख मुं गो रा , **वारीलें** गो२ ; ५ **जाय** नि.

३६. १ **राक्षस** औं पु ख ध गो·२ ; २ **भक्ष** गो ; ३ **भक्ष्यभाग** नि ( स प्रसंप्रा ).

३७. १ **भूतअरिष्ट** नि खवर्ग ; २ **कीं** नि , (–) औं मुं.

चतुष्पदादि[1] द्विपद लोक । रोगरहित रक्षी बक ।
त्यातें[2] प्रजा[3] नरनायक[4] । वेतनातें[5] अर्पिती[6] ॥ ३८ ॥
भक्ष्य[1] भोज्यें[2] भरोनी रथीं । महिषयुग्म[3] जुंपणें[4] पंक्तीं[5] ।
सूप[6] शाक[7] दधि घृतीं । घट भरोनि ठेवावे ॥ ३९ ॥
मांसागळा[1] पुरुष येक । राक्षसभक्षणालागीं[2] देख ।
रथीं वाहूनि सन्मुख । बकारण्या पाठवणें[3] ॥ ४० ॥
नेम चुकल्यां[1] येक दिवस । रात्रीं येऊनि राक्षस ।
कुटुंबेसीं करी[2] ग्रास । कालरूपी दुरात्मा ॥ ४१ ॥
ते[1] आमुतें[2] पातली पाळी । आह्मीं चौघें येक[3] मेळीं ।
यांत कवणातें[4] वोपूं बळी । हें[5] तूं सांग[6] जननीये ॥ ४२ ॥

---

३८. १ **चतुष्पद** नि खवर्ग (औं प्रसंप्रा); २ **म्हणोनि त्यातें** नि; ३–४ **प्रजानायक** नि, **प्रजेचा नायक** औं ख; ५ **वेतनभारा** औं; ६ **आर्पितो** नि.

३९. १ **भक्ष** पु·४ ख मुं गो·२; २ **भोज्य** नि पु४ ख मुं गो·२; ३ °**युग्में** नि, **महिष महिषे** पु४; ४ **जुंपिती** नि, **जुंपिजे** औं, **जुपिले** पु४ ख; ५ **रथीं** नि खवर्ग (औं प्रसंप्रा); ६–७ **दुग्धशर्करा** गो; ७ **शाखा** नि औं पु.

४०. १ **मांसाआगळा** नि; २ **राक्षसातें देती** औं; ३ **पाठविणें** नि (स प्रसंप्रा), **कारणें** मुं.

याखालीं नि खवर्ग मध्यें पुढील ओव्या जास्त आहेत :—

नित्य साटी[1] खंडी अन्न । दाहा खंडी मांस[2] प्रमाण ।
अजा शतानुशत जाण । त्यावरी येक पुरुष देणें ॥ ४० अ ॥

१ साठ नि; २ मास नि.

ऐसा नित्य[1] राक्षसाचा[2] नेम । प्रत्यहीं[3] देतसे[4] निःसीम ।
चुकतां[5] आन[6] सारिखे[7] काम । भावें भोजन करविती ॥ ४० आ ॥

१–२ राक्षसाचा नित्य नि; ३–४ प्रतिदिनीं मुं; ४ देती नि; ५ न चुकतां पु, चुकल्यां मुं; ६–७ न चुकेचि औं, अनारिसें पु४, अनर्थ मुं.

४१. १ **चुकल्या** नि ख मुं गो·२ रा; २ **करील** नि ख धु, (–) पु४.

४२. १ (–) नि खवर्ग (औं प्रसंप्रा); २ (+) **आज** नि; ३ **एके** नि पु४ ख; ४ **कवण** नि औं; ५ **तें** नि; ६ **सांगें** नि.

क्रयें[1] मेळउं पारिखा जन[2] । तरी मी दरिद्री द्रव्यहीन ।
राजा दुष्ट[3] निर्दय जाण[4] । सोडवी कोण आम्हुतें ॥ ४३ ॥
आह्मां चौघांतेंहीं जाण । जीर्णे मरणें समसमान[1] ।
यालागीं चौघेंजणें प्राण । राक्षसातें निवेदुं ॥ ४४ ॥
कुंती ह्मणे ऐक विनंती । प्रकट[1] न[2] बोलें[3] कवणाप्रति ।
तुमचें[4] अरिष्ट करावया[5] शांति । सामर्थ्यता[6] मज असे[7] ॥ ४५ ॥
पांच पुत्र माझां[1] पोटीं । त्यांत दुसरा[2] सबळ सृष्टीं ।
तो जाईल राक्षसभेटी । तुजपालटें जाण पां ॥ ४६ ॥
मंत्रबळ आंगबळ । उभय शक्तीं[1] प्रळयानळ[2] ।
अन्न वोपूनि क्षेम कुशळ । गृहा येईल[3] जाण[4] पां[5] ॥ ४७ ॥
ब्राह्मण ह्मणे आपणालागीं । पराचा[1] प्राण लोटणें आगीं ।
अकीर्तिदोषकर्दम[2] आंगीं[3] । स्पर्शों नेदी सर्वथा ॥ ४८ ॥
तीर्थवासी दीन ब्राह्मण । गृहा पातला[1] जो[2] शरण ।
त्याचें[3] वोपूनि[4] देहदान । काय हा प्राण रक्षणें ॥ ४९ ॥

---

४३. १ विक्रयें नि ख, येक औं पु; २ जाण औं; ३ ( – ) ख मुं; ४ दुष्जन ख, दुर्जन मुं, जन पु·४ धु गो·२ रा.

४४. १ समान पु.

४५. १–२ ऐसें कोण बोले खवर्ग; ३ बोला नि; ४ परी तुमचें औं पु ख, परी पु४, तरी मुं; ५ कराव्या औं गो·२ रा; ६ सामर्थ्य तें नि, ( सामर्थ्य तों स ); ७ आहे नि.

४६. १ माझ्या नि तं, माझा पु·४ धु रा, माझे औं ख; २ दुजा नि.

४७. १ शक्ती नि ( स प्रसंप्रा ), शक्तीनें औं पु; २ तो प्रबळ औं पु; ३–५ तात्काळ येईल औं पु.

औं पु मध्यें ४७ व ४८ ओव्यांची अदलाबदल आहे.

४८. १ पराचे नि औं पु सुं, परावे पु४ ख; २ हा अकीर्ति° नि, अपकीर्ति° ख धु गो; ३ जगीं नि.

४९. १–२ पातले जे नि खवर्ग; ३ त्यांचें नि पु; ४ वोपोनियां नि.

पृथा बोले रहस्यगोष्टी । गुज सांटवीं[१] आपुलां[२] पोटीं ।
मीनल्या राक्षसांच्या कोटी । मृत्यु नाहीं मत्पुत्रा ॥ ५० ॥
मागां[१] वधिले थोर थोर । असो[२] तो[३] न[४] बोलों[५] विस्तार ।
राक्षस आणि माझा कुमर । भेटल्यां[६] चोज देखसी ॥ ५१ ॥
वचन बोलोनि अमृतमय । स्वस्थ केलें ब्राह्मणहृदय ।
तवं[१] पातले पांचही[२] तनय । भिक्षान्नातें[३] घेऊनी[४] ॥ ५२ ॥
वृत्तांत[१] परिसोनि मातृमुखें । भीम ह्मणे बहुसाल निकें ।
येकांतीं[२] धर्म बोले दुःखें । मातेप्रति सखेद ॥ ५३ ॥
पारिख्यालागीं[१] स्वपुत्रासी । मृत्यु इछीना राक्षसी ।
तुझी विचारबुद्धी कैसी । त्यागूं ह्मणसी पुत्रातें[२] ॥ ५४ ॥
ज्याचेनि बळें आह्मां जीवन । रात्रीं पहुडों सुखसंपन्न ।
ज्यातें शकुनि[१] दुर्योधन । मृत्युस्वरूप[२] मानिती ॥ ५५ ॥
स्वप्नीं चित्रीं[१] देखतां लेख[२] । वोथरें[३] कौरव मारिती हाक ।
ऐसें सुरत्न[४] अमोलिक । सर्पदंष्ट्रे[५] खोविसी ॥ ५६ ॥

---

५०. १ सांठवी नि ( सांठवीं स ); २ आपुले नि मुं पु४ , आपुला पु धु , आपुल्या औं गो२.

५१. १ मागें नि खवर्ग; २ आतां असो नि; ३ ते नि ख, तें स औं पु·४ मुं; ४–५ नोबोलों धु, नोबोलें रा , वदलें पु४ , न बोलें ख गो तं; ६ भेटल्या नि गो·२ रा , मीनल्या ख , भेटतां मुं.

५२. १ यावरी नि ; २ पांचै औं पु ख गो·२ रा ; ३ भिक्षान्न पु ख , भिक्षान्नें पु४ मुं , भिक्षा समग्र औं ; ४ घेऊनियां नि मुं.

५३. १ वृतांत औं पु·४ धु गो ; २ येकला धु , येकटा रा , येकटीं गो२ तं. मुं मध्यें ही ओवी नाहीं.

५४. १ पराव्यालागीं पु४ ; २ कुमारातें नि.

५५. १ शंकोनि पु४ मुं; २ मृत्युरूप नि खवर्ग.

५६. १ चित्रा नि , चित्र ख मुं ; २ देख औं मुं ; ३ वोथरोनि नि औं मुं , वोथरे स ख धु गो२ तं , वैथर पु४ ; ४ सुतरत्न नि ; ५ °दंष्ट्रीं नि.

कुंती वदे[१] हास्यवदन[२] । पुत्रा बोलसी दीनवचन[३] ।
साक्षी[४] देतसे माझें मन । राक्षस तृण भीमातें[५] ॥ ५७ ॥

नागायुतबळ शरीरीं । तुळणे[१] हलुवट[२] वज्रधारी ।
त्यातें[३] राक्षसभयाची भारी[४] । भूतबाधा कल्पिसी ॥ ५८ ॥

सुखें असतां[१] ब्राह्मणधामीं । खंडल्या कौरवभयाच्या ऊर्मी ।
त्याच्या संकटा पुरुषीं तुह्मीं । साह्य कैसें[२] न व्हावें ॥ ५९ ॥

माझिया अंकापासूनि तळीं । पडतक्षणीं[१] जन्मकाळीं ।
शिळा आतली[२] रांगोळी । आंगभारें याचिया ॥ ६० ॥

चिंता अल्पमाळ न धरीं चित्तीं[१] । राक्षस निवटेल भीमा[२] हातीं ।
मातृवचनें धर्ममूर्ति । आल्हादला[३] बोलतु ॥ ६१ ॥

ह्मणे म्यां पाहिलें तुझें चित्त[१] । मीही जाणें हा वृतांत[२] ।
परोपकाराहूनि अर्थ । श्रेष्ठ कोण भूलोकीं ॥ ६२ ॥

आप पर हा विचार । अधमजनाचा अधमाचार[१] ।
उत्तम पुरुषाचा निर्धार[२] । विश्वकुटुंब आपुलें ॥ ६३ ॥

जें केलें तें बहुत बरवें । श्रेय[१] मानिलें माझेनि जीवें ।
दीन संकटीं रक्षावें[२] । दंड कीजे दुष्टातें ॥ ६४ ॥

---

५७. १ बोले नि खवर्ग; २ हांस्य° औं पु गो; ३ °वदन नि औं मुं गो·२ ; ४ साक्ष नि औं पु मुं ; ५ भीमासी नि.

५८. १ तुळणें नि पु·४ मुं ; २ हळवट नि ; ३ तयासी धु ; ४ शरीरीं नि, शारी औं पु·४, भरी धु.

५९. १ वसतां औं पु ख मुं गो२ रा, बैसतां पु४ ; २ कैसे नि.

६०. १ पडतेक्षणीं नि, पडे ते क्षणीं तं ; २ झाली नि खवर्ग.

६१. १ चीति पु४ ख धु ; २ याच्या खवर्ग ; ३ परमआल्हादें धु तं.

६२. १ चीत पु४ ; २ वृत्तांत नि ख तं, व्रतांत औं पु४.

६३. १ आचार औं पु मुं ; २ विचार खवर्ग.

६४. १ श्रये पु४ धु, श्रय गो·२ ; २ रक्षावे स ख गो.

युद्धभिक्षेतें याचितां । पृष्टी[1] वोडवी कृतांत[2] दाता[3] ।
त्या भीमेंसि[4] राक्षसवार्ता । मशयकप्राय[5] मी जाणें ॥ ६५ ॥

असो हरूनि तमिस्राभानु । गगनीं उदेला[1] स्वभानु[2] ।
मातृआज्ञेनें भीमसेनु[3] । अन्न घेऊनि निघाला ॥ ६६ ॥

हर्षयुक्त बैसला रथीं । शकुनीं[1] विजय[2] सूचिला[3] पथीं ।
ब्राह्मण राहऊनि शीघ्रगती । बकारण्या[4] पातला[5] ॥ ६७ ॥

विशाळ वनामाजी निरुतें । विजनीं सोडिलें[1] रथातें ।
महीष[2] हाकित[3] ग्रामपंथें[4] । पळत नगरा[5] पातले ॥ ६८ ॥

दीर्घस्वरें दीधली हाक । ह्मणे येथें[1] कवण काक कीं बक ।
वसे तेणें आपुलें मुख । शाम[2] कीं गौर दावावें[3] ॥ ६९ ॥

---

६५. १ श्रष्टी औं पु·४, **पुष्टी** गो·२; २–३ **कृतांता** नि औं ख; ४ **भीमासि** नि ख मुं; ५ **मशक°** नि (स प्रसंप्रा) तं. मुं मध्यें पहिले दोन चरण **युद्धीं भीमा काय चिंता । सिक्षा लाविल कृतांता ।** असे आहेत.

६६. १ **उदेलया** नि; २ **स्वर्भानु** नि, **स्वर्भान** रा धु, **सुभानु** औं पु·४ तं, **सहस्रभानु** ख; ३ **भीमशेनु** पु·४ ख धु गो·२ रा.

या खालीं नि खवर्गमध्यें पुढील ओवी जास्त आहे:—

**षड्रस पक्वान्न[1] । साटी[2] खंडीया प्रमाण ।**
**गाडा भरूनियां[3] जाण[4] । भीमसेन[5] निघाला[6] ॥ ६६ अ ॥**

१ पक्वान्नें घेऊन नि; २ साठी नि; ३–४ भरूनि भीमसेन नि; ५–६ बकारण्या पातला नि.

६७. १ **शकुन** नि पु४; २ **विजयो** धु गो·२ रा, **लाभ** पु४; ३ **सुचवी** नि; ४–५ **आपण जाया निघाला** नि.

६८. १ **सांडिलें** खवर्ग; २–३ **म्हैसे पिटितां** नि; ३ **हाकिले ते** धु तं; ४ **नगरपंथें** ख रा; ५ **ग्रामा** ख रा.

६९. १ (–) नि खवर्ग; २ **श्याम** नि (स प्रसंप्रा) पु·४; ३ **दावणें** नि, **दाखवावे** औं पु.

येतां न येतां मुखाआंतौती[1] । अन्नविषई[2] पडली माती ।
आयुष्य वेचलें[3] ह्मणोनि हातीं । ग्रास[4] तोही लाभेना[5] ॥ ७० ॥
ऐसी गर्जना करूनि जाण । मार्गींच[1] सारिलें संध्यास्नान[2] ।
भक्षूं[3] आदरिलें अन्न । उपचारेशीं[4] स्वादिष्ट ॥ ७१ ॥
हाक ऐकोनि कठोर । कोपें धांविन्नला[1] निशाचर ।
अन्न भक्षितां देखोनि क्रूर[2] । प्रळयानळ[3] धडकला ॥ ७२ ॥
ह्मणे महिष[1] दवडूनि[2] दुरीं । आणि[3] माझिया आहारातें[4] स्वीकारी ।
कोण[5] हा[6] मूर्ख[7] आपुले[8] करीं[9] । शीर छेदी[10] आपुलें[11] ॥७३॥
प्रत्योत्तर[1] नेदूनि मुखें । भोजन सारी यथासुखें ।
जेवीं निंदेनें[2] वाजतां[3] मुखें । साधु नेम न[4] संडी[5] ॥ ७४ ॥
राक्षस क्षोभला दुर्धर । विक्राळतुंड पर्वताकार ।
घर्घराटें[1] गगनोदर । प्रतिशब्दातें[2] परिसवी[3] ॥ ७५ ॥
दांत खाऊन करकराटीं । दोन्ही वळोनि[1] वज्रमुष्टी[2] ।
भीमसेन ताडिला पाठीं[3] । सिंह[4] जैसा कुंजरें ॥ ७६ ॥

---

७०. १ मुखाआतौती स औं पु४ धु, मुखातौती मुं गो॰२ रा; २ अन्नाविषयीं नि पु॰४ मुं; ३ सरलें नि; ४ ग्राम पु४; ५ लाधेना नि, लागेना गो॰२.

७१. १ मार्गीं औं पु४; २ हो तें स्नान धु तं; ३ आपण भक्षूं नि; ४ उपचाराशीं नि.

७२. १ धांवे नि खवर्ग, २ क्रुर धु गो॰२ रा, थोर मुं; ३ (+) सा नि.

७३. १ म्हैसा नि, ह्मैस ख, महिषी तं; २ दवडिला नि; ३ (–) खवर्ग गो॰२; ४ अन्नातें धु; ५–९ ऐसा कोण हा दुराचारी गो; ७ मुख्य औं पु॰४; ८ आपुला (लां) धु रा तं; १०–११ छेदीन मी याचें खवर्ग.

७४. १ प्रत्युत्तर नि; २ निंदोनि नि, निंदे पु, निदेसिं औं, निंदक गो; ३ वर्जितां नि, गर्जतां औं, निंदितां गो; ४–५ सांडीना खवर्ग; ५ सांडी नि, सोडी धु, खंडी तं.

७५. १ घरघराटें नि; २–३ प्रतिशब्दें गाजवी नि. मुं मध्यें ही ओवी नाहीं.

७६. १–२ वळूनियां मुष्टी पु ख; ३ पृष्टीं नि पु४, पुष्टी औं पु, मुष्टीं ख; ४ सींह्य ख धु.

तेंही[1] नाणूनियां लक्षा । भीम स्वेछा[2] भक्षी भक्षा ।
मग उपडूनि[3] चंड[4] वृक्षा । पुढती[5] भीमा[6] ताडिला[7] ॥७७॥
घायें वृक्ष जाला चूर्ण । भोजनीं न चळे[1] भीमसेन ।
मग घेऊनि[2] शत[3] पाषाण । पाठोपाठीं[4] ताडितु[5] ॥ ७८ ॥
तेंही पुष्पाचिये[1] परी । न[2] मनूनि[3] मौन्यें[4] भोजन करी[5] ।
संतापला[6] उभय[7] करीं । हस्त[8] दोनी[9] कवळिले[10] ॥ ७९ ॥
भीमें पसरूनि वाम[1] पाणी । राक्षसहस्त[2] धरिले[3] दोन्ही ।
भोजन सारोनि बळखाणी । उभा ठेला सन्मुख ॥ ८० ॥
ह्मणे आतां मजसीं भिडें । पाहों[1] सामर्थ्य केतुलें[2] गाढें ।
नगर पीडिलें त्याचें वोढें[3] । आजि काढीन येकदां ॥ ८१ ॥
राक्षस चढोनियां तवका । भीमा[1] हृदई मारी[2] थडका ।
लत्ताप्रहरें[3] ताडितां खडका—। वरुता[4] पडे सन्मुख[5] ॥ ८२ ॥
पुढती[1] उठोनि[2] सहस्र झाडें । भवडूनि[3] मारी[4] शिळा[5] धोंडे[6] ।
तितुकीं साहूनि[7] जुंबाडें । जटा[8] मुष्टी[9] कवळिल्या[10] ॥ ८३ ॥

---

७७. १ तेही पु४ ख रा ; २ स्वस्थ नि ; ३ उचलोनि गो·२ ; ४ प्रचंड ख गो·२ , (–) मुं ; ५–६ भीमा पाठीं नि ; ७ तगटिलें धु तं , ताडिलें गो२ रा.

७८. १ ढळे औं पु , टळे पु४ ; २ उचलोनि नि ; ३ (+) हात औं पु , चंड नि ; ४ पुढती तेणें नि ; ५ ताडिला नि. ख मुं मध्यें ही ओवी नाहीं.

७९. १ पुष्पाचिया नि; २–४ मानूनियां नि; ४ (–) खवर्ग; ५ सारी औं पु·४ मुं गो२ रा; ६ संतापोनि नि; ७ उभउनी पु ख; ८–१० दक्षिण हस्त कवळिला नि धु ; १० धरियेले औं , वसविले पु·४ ख , उभविले मुं .

८०. १ उभय पु४ ; २ साक्षेपें हात मुं ; ३ कवळिले औं.

८१. १ पाहूं औं पु ख रा , पाहें पु४ ; २ कितुलें नि मुं रा तं , केवढें ख ; ३ बाहाडें गो.

८२. १ भीम नि पु मुं गो ; २ हाणे मुं ; ३ °प्रहारें नि ; ४ वरी नि ; ५ उताणा नि.

८३. १ पुडती औं पु४ ; २ उपडोनि ख मुं ; ३ भोवंडोनि नि औं तं ; ४–५ मारिले नि पु ख मुं ; ६ धडाडें औं ; ७ वारूनि पु औं ख , मारूनि पु४ ; ८ केश मुं ; ९ मुष्टीं नि पु रा, मस्तकीं पु४, मस्तकीचें मुं; १० कवळिली नि.

वामहस्तें धरूनि केशीं । सव्य नेमिला[1] कंठप्रदेशीं[2] ।
माज[3] मोडितां कासाविसी । हाक[4] मारी[5] आक्रोशें[6] ॥८४॥
मध्यें तोडिजे युक्षदंड[1] । त्यापरी केला तो[2] दुखंड ।
नानानखधारीं प्रचंड । गरूड खंडी सर्पातें ॥ ८५ ॥
वज्र हाणितां निघातें । दुखंड होइजे पर्वतें ।
तेविं मारूनि राक्षसातें । भीम जाला जयस्वी[1] ॥ ८६ ॥
चूर्ण जालीं[1] अस्तिजाळें[2] । बाहेर पडलीं नेत्रबुबुळें[3] ।
मुखीं[4] नासिकीं कर्णबिळें । रक्त[5] वाहे भडभडां ॥ ८७ ॥
यापरी असुर[1] पावला[2] मरणा । भयें[3] सकंप राक्षससेना ।
नमस्कारूनि भीमसेना । प्राणदाना[4] मागती ॥ ८८ ॥
जे जे भक्षिती[1] माणसें । त्यांसी[2] दंडीन बकाऐसें[3] ।
भूतदयाळ[4] त्यां संतोषें । अभय माझें सर्वदा[5] ॥ ८९ ॥
भीमआज्ञा[1] वंदोनि शिसीं । स्वकर्में[2] सांडिलीं[3] राक्षसीं ।
आप्त होवोनि मनुष्यांसीं । नगरीं वसों लागले ॥ ९० ॥
चरण धरूनि वामकरीं । प्रेत टाकिलें[1] नगरद्वारीं ।
प्रभात[2] जालियां[3] पुरुषनारी[4] । पाहों[5] येती[6] कौतुकें[7] ॥९१॥

---

८४. १ कांपिला औं, सुदला ख, न्यासिला नि पु·४, ताडिला गो ; २ कटीप्रदेशीं पु४ ख मुं रा तं; ३ मान नि; ४–६ प्राण त्यागी तत्काळ मुं.

८५. १ इक्षुदंड नि, इछुदंड तं ; २ ( – ) खवर्ग.

८६. १ यशस्वी नि पु४ ख मुं.

८७. १ झालिया नि ख ; २ अस्थिजाळें नि औं ; ३ °बुबळें पु४ ख धु तं ; ४ मुख खवर्ग ; ५ अशुद्ध गो.

८८. १–२ पावला असुर औं पु ; ३ भय नि ; ४ °दान नि औं.

८९. १ भक्षितील औं पु; २ त्यांसीं नि; ३ ययाऐसें नि; ४ °दया नि ; ५ सर्वदां नि ( स प्रसंप्रा ) पु४ ख मुं.

९०. १ भीमाज्ञा नि ( स प्रसंप्रा ) औं पु·४ ख ; २ स्वकर्म नि; ३ सांडिलें नि.

९१. १ टांकिलें स गो·२ , टाकी औं पु; २–४ प्रातःकाळीं नगरनारी औं , प्रातःकाळ जालियावरी मुं ; ३ होतां नि ; ४ नरनारी नि पु ; ५–७ नरनारी पाहों ठेले मुं.

करूनि करपादप्रक्षाळण[1] । त्रिपदामंत्रें[2] शुद्धाचमन[3] ।
प्रवेशोनि ब्राह्मणसदन । मातृचरण वंदिले ॥ ९२ ॥
नमस्कारूनि जेष्ट[1] बंधु । नमिला ग्रहस्तब्राह्मण[2] साधु ।
ह्मणे स्वामी[3] प्रकट[4] शब्दु । सहसा[5] कोठें न[7] वदावा[8] ॥९३॥
मात विस्तारली[1] नगरीं । राक्षसप्रेत[2] पडिलें द्वारीं[3] ।
पाहों पातल्या नगरनारी[4] । कोटिच्या[5] कोटी संतोषें[6] ॥९४॥
राजा ह्मणे जयाचा वार । त्यासि[1] पुसा[2] हा विचार ।
कोणें वधिला निशाचर । अतिबळिष्ट बळियाढा[3] ॥ ९५ ॥
ब्राह्मण ह्मणे घेऊनि अन्न । प्रवेशलों राक्षसवन[1] ।
तवं[2] तेजस्वी तपोधन । मंत्रवादी पातला ॥ ९६ ॥
तेणें मंत्रूनि प्रोक्षितां पाणी । राक्षस निमाला ततक्षणीं[1] ।
हें म्यां प्रत्यक्ष देखिलें नयनीं । अत्यद्भुत राजया ॥ ९७ ॥
प्रकट[1] दिसत[2] असतां[3] आह्मां । गुप्त जाला तो[4] नेणवे[5] तुह्मां[6] ।
राजा ह्मणे अगाध महिमा । कोण जाणे सिद्धांचा[7] ॥ ९८ ॥

---

९२. १ **पादप्रक्षालन** नि, **पाद°** पु४ ख; २ **त्रीपादमंत्रें** पु४ गो॰२; ३ **शुद्धाचमन** पु॰४ ख धु गो॰२ रा.

९३. १ **ज्येष्ठ** नि, **ज्येष्ट** औं पु४ ख तं; २ **ब्राह्मण गृहस्थ** नि; ३–४ **प्रगटों नेदी** मुं; ४ **प्रगटों** औं पु॰४; ५–८ **कोठें स्वामी समर्था** मुं; ७–८ **नेदावा** औं पु॰ ४.

९४. १ **विस्तारिली** नि पु४; २ **प्रेत** पु४ ख; ३ **नगरद्वारीं** पु४ ख; ४ **नरनारी** नि खवर्ग तं; ५ **कोटीचे** नि; ६ **आनंदें** नि.

यापुढें औं मध्यें पुढील ओवी जास्त आहे:—

**पाहा पां केव्हढें सामर्थ्य । कवणें मारिलासे दैत्य ।**
**ग्रामपाठकाचें कृत्य । ईश्वरें केलें या काळीं ॥ ९४ अ ॥**

९५. १ **तयासि** नि; २ **पुसावा** नि पु॰४ ख; ३ **बळियाडा** औं पु॰४ गो२, **बळगाढा** नि.

९६. १ **राक्षसभुवन** पु४ ख मुं; २ **तों** औं पु४.

९७. १ **ततक्षीणि** पु४ गो२.

९८. १ **प्रगट** नि खवर्ग, **प्रघट** गो॰२; २–३ **दिसतां** खवर्ग; ४ (–) नि औं पु४ ख मुं गो२; ५–६ **न कळे सीमा** मुं; ७ **श्रेष्ठांचा** मुं.

राक्षस मारूनि महा क्रूर[1] । पीडेवेगळें केलें नगर ।
हें तवं प्रत्यक्ष[2] दिसे[3] येर[4] । काय तें[5] आह्मां नेणवे ॥ ९९ ॥
मुष्टिघातें केलें कंदन । गात्रेगात्र[1] जाला[2] चूर्ण ।
मंत्रूनि मारिला हें वचन । हो[3] साचार[4] तैसेंची[5] ॥ १०० ॥
नमस्कारूनि ब्राह्मणोत्तमा । गौरऊनि[1] धाडिला[2] स्वधामा[3] ।
विशेष पांडवाचा प्रेमा । वाढता जाला विप्रातें[4] ॥ १०१ ॥
बकाख्यान हें[1] सर्वदा । जे[2] परिसती[3] धरूनि[4] श्रद्धा ।
त्यांच्या[5] कुळीं राक्षसबाधा । नाहीं ह्मणे श्रीव्यास ॥ १०२ ॥
इति श्रीभारतकथा गहन । जालें बकासुरहनन[1] ।
पुढें[2] द्रौपदी[3] धृष्टद्युम्न[4] । जन्मती[5] तें[6] अवधारा ॥ १०३ ॥
मुक्तेश्वरकवीची वाणी । पादुकारूपें श्रीगुरुचरणीं ।
चालतां दिसे परि[1] गमनागमनीं[2]। स्वतंत्र नोहे विचारा ॥१०४॥

इति श्रीभारते आदिपर्वणि अष्टत्रिंशोऽध्यायः ॥

---

९९. १ क्रुर पु मुं गो·२ रा; २ प्रतक्ष ख गो; ३ देखिलें ख; ४ वज्रप्रहर औं; ५ ( – ) खवर्ग.

१००. १ गात्रगात्रीं नि गो२ रा; २ केला नि, केलें मुं धु; ३ नव्हे पु, कैंवि नि, सत्य मुं; ४ सोच गो२; ५ मानावें नि.

१०१. १ गौरवें गो·२ रा; २ धाडिलें नि औं पु, धाडी पु४; ३ स्वाश्रमा नि; ४ द्विजातें नि मुं.

१०२. १ ( – ) औं पु·४ मुं; २ हें पु·४, ( – ) ख मुं; ३ ऐकती ख; ३–४ श्रवण करूनी धरिती मुं; ५ त्यांचे नि खवर्ग ( पु४ प्रसंप्रा ).

१०३. १ °सुराचें हनन नि खवर्ग; २ पुढां गो·२ रा; ३–४ धृष्टद्युम्नजनन मुं; ५–६ जन्म प्रभवे औं, ते सावध मुं.

१०४. १–२ पवित्रागमनीं नि पु४ ख, पवित्र अगमनीं स औं पु, परिगमनीं गो·२. मुं मध्यें ही ओवी नाही·

# शब्दकोश

( पहिला आंकडा अध्यायाचा व पुढचा ओवीचा )

अंगद—बाहुभूषण. २७–३०.
अजिन—( हरणाचें ) कातडें. ३०–१६.
अटण—भ्रमण. ३५–८९.
अतसी—अळशी, जवस. ३५–५८.
अनुवादणें—स्पष्ट करून सांगणें. २८–१०५.
अपर—दुसरी, अन्य. ३०–१५०.
अपाडें—अतिशय. २७–१८३.
अपूप—अनरसा, पुरी. २९–६१.
अंबर—वस्त्र. ३७–८९.
अभिचार—जारणमारण. २७–१५२.
अभिचारक—चेटूक करणारा. ३६–७४.
अमा—अमावास्या. ३४–१०५.
अमृतफळ—आम्रफल. ३४–४.
अयन—सहा महिने. ३६–१.
अरिषट्क—षड्रिपु–काम, मोह, मद, क्रोध, लोभ आणि मत्सर. २७–२२.
अरुवार—मृदु. २९–८४.
अलात—कोलीत, ३२–२९.
अलिउळ—भ्रमरांचा थवा. ३१–१८०.
अलोट—अलंघ्य. २७–१४३.
अवगणें—धारण करणें. २७–८.
अवघ्राण–हुंगणें (प्रेमाचें द्योतक).२९–१६३.
अवस्वर—अवसर, प्रसंग. ३१–७३.
अशन—भक्षण. ३४–५३.
अशुद्ध—रक्त. ३२–५४, ३७–५६.
असिलता—तरवार. ३१–५७.
अस्तमान—सूर्यास्त. २९–७८.
अस्ति—अस्थी, हाड. २९–१०.
अहिफेणा—अफू. २९–६२.
अळुमाळ—किंचितदेखील. ३६–२.
आइणीपाइणी—वासना. ३१–११९.
आखु—उंदीर. ३४–६९.
आंगवण—बळ. ३२–५१, ३७–३८.
आगळिक—वैशिष्ट्य. ३१–४६.
आगळें—विशेष. २६–७.
आज्य—तूप. २८–९१.
आटण—भ्रमण. २७–१.
आटणें—फिरणें. २७–१६२.
आतणें—होणें. ३०–१५, ३८–६०.
आतुडणें—सांपडणें, प्राप्त होणें. २७–१५.
आथिला—युक्त. ३८–३.
आदरणें—स्वीकारणें. ३८–७१.
आयतन—स्थान. ३७–९०.
आर्जव—सरलत्व. २८–४२.
आर्तवंत—उत्सुक. २८–५४.
आर्ति—इच्छा. ३०–१३०.
आवर्त—भोंवरा. ३६–७.
आवांका–अवसान, धैर्य. ३१-४३, ३२-१४.
आव्हानणें—निमंत्रण करणें. २७–१५३.
आशीष—आशीर्वाद. २६–९.
आसव—मद्य. २९–७३.
आस्तरण–अंथरूण. २८–९२, २९–१२८
आस्फोट—आवाज. ३१–१०३.
आहवनीय—एक प्रकारचा अग्नी. ३१–८८
आळवाळ—आळें. ३०–१३०.
इडेंपाडें—ईर्ष्येनें. ३१–५३, ३३–१८.
इषिका—काडी. ३०–११०.
इसाळ—स्पर्धा, खुमखुमी. ३१–५४.

उजू—कडे, समोर. ३१-१०३.
उत्काथित—कढविलेलें. २९-५८.
उत्तीर्ण—उतराई. ३२-२.
उत्पल—कमळ. ३७-१०.
उदित—तयार. २७-१६९.
उन्मेष—ज्ञानप्राप्ति. ३६-१४.
उपक्रीत — एक प्रकारचा पुत्र. २७-९०.
उपचार—आतिथ्य. ३८-७१.
उपबोध—जाणीव. ३६-७.
उपरिका—माडी. २९-४९.
उपागच्छ-स्वतः होऊन 'मी तुमचा पुत्र होतों' म्हणून जवळ आलेला. २७-९०.
उपायन—नजराणा. ३५-११०.
उभविर्णे—उभारणें. २८-७७.
उरग—सर्प. २९-१०४.
उर्णापट—लोंकरीचें वस्त्र. २६-३३.
उलुका—(उल्का) कोलीत. ३६-३५.
उलूक—घुबड. ३०-६४.
उसंतणें—आश्रय करणें. ३८-२२.
ऊर्ध्वरेता—ब्रह्मचारी. २७-६८.
ऊर्ध्वशून्य—अधःशून्य, मध्यशून्य, ऊर्ध्वशून्य व निःशून्य अशीं चार प्रकारचीं शून्यें म्हणजे आकाशें आहेत. २७-६२.
कटुक—कडू. २९-५९.
कथिका—कडी. २९-८२.
कंदर्प—काम. २८-१२.
कपित्थ—कवठीचें फळ. २९-९०.
करवाळ—तरवार. ३१-५४.
करविल—एक जलचर प्राणी. २९-७७.
करांडणें—कुरतुडणें. ३४-४८.
कराळ—भयंकर. ३७-७९.
कर्मविंदाण—कर्मांची गती. २८-१४.
कवडा—मोठी कवडी. ३४-२०.
कवळणें—मिठी मारणें. २८-७६.
कवा—मिठी, पकड, वेंघ. ३७-४०
कश्मळ—मोह. २७-१३१.
कषाय—तुरट. २९-५९.
कहाळ—शिंग. ३२-३०.
कळत्र—पत्नी. २७-९२.
कळेवर—देह. २८-४४.
कक्ष—गवत, जंगल. ३६-५४.
कक्षावळी—कांखेची चौपदरी (?).३४-३५.
काद्रव्य—सर्प. २७-२११.
कानीन—कौमार्यावस्थेंत झालेला पुत्र. २७-८८.
कापडी—यात्रेकरू. ३६-७९.
कार्तवीर्य—सहस्रार्जुन. ३६-७८.
कार्मुक—धनुष्य. २९-२७.
कासार—तळें. ३६-१४०.
किलिचापाट—ढलप्या, कडीपाटाच्या फटीं-मधून बसविलेल्या झिलप्या. ३१-१५.
कीर—खरोखर. ३०-२१३.
कुड—खोटा, वाईट. ३२-१०३.
कुंभोद्भव—अगस्ति. ३६-९१.
कुरंग—हरिण. २७-३.
कुहर—बिळ. ३६-४०
कूष्मांड—कोहळा. ३७-५१.
कूळ—तीर. २८-४५.
कृष्णद्वैपायन—व्यास. २७-७८.
कृष्णागरू—उत्तम चंदन. २८-७८.
कोकनद—लाल कमळ. ३६-६९.
कोथळ—धड, शरीर. ३२-५३.
कौटाळ—वांकडी करणी. ३६-७४.
कौसल्या—काशी राजाची कन्या अंबिका. २६-४६.
कौस्तुभमाळी—वामन, विष्णु. ३४-२२.

कौलिक–मांत्रिक, वाममार्गी शाक्त. ३०-८७.
कौलिकाचार—दुष्कर्म,शाक्तकर्म.२७-११६.
क्रव्याद—मांसभक्षक. २६–८२.
क्रीत—विकत घेतलेला. २७–९०.
खंडणें—फिटणें. २७–७०.
खनक—खणणारा. ३६–८.
खर्ग—( खड्ग ) तरवार. ३०–२०८.
खर्पर—खापर. २९–५८.
खांदी —फांदी. ३६–१३७.
खेटक—ढाल. ३१–५४.
खेडकुलि—खेळण्याची जागा. २९–५०.
गंगाफळ—भोपळा. २९–९०.
गजघंटा—हत्तींचा समुदाय. २९–७०.
गंडभैरव—गेंडा; एक काल्पनिक पक्षी. ३७–४०.
गंतव्य—गमन. ३५–४८.
गतिप्रद—स्वर्गप्राप्ती करणारा. २७–९४.
गदारोळ—आरोळी, ओरड. ३६–५५.
गभस्ति—सूर्य. २७–१५४.
गव्हर—गुहा. २६–४८.
गार्हपत्य—एक प्रकारचा अग्नि. ३१–८८.
गुप्तागार—चोरघर. २९–४९.
गुल्म—झुडूप, झाडी. ३१–६.
गुसळणें—घुसळणें. ३४—३४.
गुह्यक—नावाडी (?). २८–४५.
गोधा—हाताचें संरक्षण करणारी चामड्याची पिशवी. ३१—३०.
गोमटी—सुंदर. ३०–१२.
गोमायु—कोल्हा. २६–८२.
ग्रीवा—मान. ३२—७६.
घडियाळ—एक जलप्राणी. २९–७७.
घांटी—गळा, नरडें. २९–२२.
घायवारा—प्रहार, तडाखा. ३२—३६.
घारणें—व्यापणें, घेरणें. २९–९५.
चडकण —चपराक. ३७–३६.
चंडकिरण–सूर्य. २६–५९.
चढोवढी—स्पर्धेनें, ईर्ष्येनें. ३१–६६.
चतुष्पथ–चवाठा. २७–९७.
चत्वारि—चार. २७–११५.
चपेटघात—पंजाचा आघात. २७–१०६
चर्मधारण—ढाल वापरणें. ३०–१६७.
चाभाडा—जबडा, मुख. ३०–२३३.
चामकणें—चालणें. २६–४.
चाळणें—करणें. २६–८६, ३०–७३.
चूडारत्न—मस्तकीं धारण केलेलें रत्न. २७–३०.
चूत—आंब्याचें झाड. २८–८.
चेइणें—जागें होणें. ३६–४४.
चैत्य—वृक्षाभोंवती घातलेला पार. ३०–१७४.
चोज—नवल, कौतुक. २९—१६४.
चोष्य—चोखण्याचें, रस घेऊन चोंथा फेंकण्याचें. ( ऊंसासारखें ) २९–६०.
चौताळणें—चवताळणें, क्षोभणें. २९–६५.
जपाकुसुम—जासवंदीचें फूल. २६–३३.
जवनीक—पडदा. ३१–१३६.
जाकळणें—ग्रासणें, पोळणें. २७–१३, २९–१३९.
जातवेद—अग्नि. ३६–४६.
जातुष—लाखेचें. ३५–१५२.
जानु—मांडी. २८–१७.
जांबुनद—सोनें. ३७–२.
जामदग्न्य —परशुराम. २७–२००.
जितवण—निंबलोण, कुरवंडी. २९–१६५.
जीणणें—जिंकणें. २७–१०२, ३२–६१.
जीणें—जगणें. २८–८०.

जीवन—पाणी. २७–१६३.
जुंतणें—जुंपणें. ३०–३०.
जुंबाड—झाडी, समुदाय. ३८–८३
जेपाळ—एक रेचक वनस्पति. याच्या बीस जमालगोटा म्हणतात. २९–६२.
जोहर—अग्नि. ३६–४३.
जोहारणें—वंदन करणें. २६–२२.
ज्यालें—जीवित, जीणें. ३४–५८.
झोंट—झिपरी, पुढील केंस. ३०–१६२.
झोटिंग—पिशाच. २७–१११.
टाकणें—आटोक्यांत असणें, शक्य असणें. ३४–२८.
टाकुनी—तडक, सरळ. ३०–८०.
टिपणें—शिवणें, स्पर्श करणें. २९–७५.
डांग—काठी. ३१–६०.
डाय—डाव. २९–६.
डिवणें—धक्का देणें. २९–१०.
डिवरें—शिंगें रोखून. ३१–६७.
डोणी—लहान होडी. २९–७२.
ढाळें—हलुहळू. २९–६६.
तगट—जर. २८–८४.
तडकयंत्र—तोफ. ३१–३१.
तपिनणें—तप करणें. २७–६१.
तरळणें—दिपणें. २६–३५.
तवक—आवेश, संताप. ३८–८२.
तावणें—नमविणें. ३१–६८, ३३–२३.
तिक्त—तिखट. २९–५९.
तितिक्षा—सहिष्णुता, शांति. २८–४२.
तिमिंगिळ—एक प्रचंड मासा. ३२—४१.
तुक—वजन. २६–२५.
तुकणें—बरोबरी करणें. २६–२४.
तुंड—तोंड. ३८–७५.
तुळवट—तुळई. ३१–१७.
तूणीर—भाता. ३०–१६८.
तैलपाचित—तळलेलें. २९–५८.
त्राहाटणें—मोठ्यानें वाजविणें. ३२–४.
त्रिपुरांतक—शंकर. २८–५.
त्रिवळी—(पोटाला पडणाऱ्या) तीन वळ्या. २८–१७.
थडका—रपाटा. ३८–८२.
थडी—तट, कांठ. २९–७८.
थरकवणें—कांपविणें. ३३–६.
थाटी—जमाव. ३७–१८.
थावणें—स्थिरावणें, राहणें. २६–६३.
थिल्लर—डबकें. ३४–१९.
थोकणें—थांबणें. २८–४५, ३१–१३६.
थोवा—थवा, समुदाय. २६–७९.
दंडपाणि—यम. २७–१६६.
दत्त—दिलेला. २७–९०.
दंदशूक—सर्प. ३४–४०.
दध्योदन—दहिभात. २९–८५.
दशन—दांत. ३४–४८.
दंष्ट्रा—दाढ. २९–२४.
दक्षणाग्नि–एक प्रकारचा अग्नी. ३१–८८.
दाटणें—आंवळणें, दडपणें. २९–२२.
दिठी—दृष्टि. ३६–११०.
दिवाभीत—घुबड. २६–८४.
दुणता—दुडती. ३७–५३.
दुर्णे—दुप्पट. २६–२५.
दुश्चित—खिन्न, व्यग्रचित्त. २७–४.
देवतटिणी—भागिरथी. २८–९६.
देवर—दीर. २७–९३.
दोंद—वाढ, तृप्ति. २८–१२५.
दोंदील—तृप्त, आनंदित. २८–३.
दोर्दंड—भुजदंड. ३१–१०.
धनुर्वाडा—धनुर्धर. २८–६४.

धरा—पृथ्वी. २६–१५.
धालिया—तृप्ती पावलेला. २९–१२१.
धुमकस्तु—धुडगूस. ३६–५५.
धुमसणें—बुकलणें, चेंचणें. ३७–५२.
धृति—निश्चय, धैर्य. २८–१२०.
नकुळ—मुंगुस. ३४–४६.
नामाथिला—प्रसिद्ध. ३१–१४७.
नाराच—बाण. ३२–६४.
नाहो—नाथ. ३३–२०.
निकुर—हट्ट, निकर. ३१–६६.
निकुरें—निश्चयेंकरून. ३०–२११.
निकेतन—वसातिस्थान. ३५–१३१.
निकेन—नीट. २६–६०.
निगुतीं—व्यवस्थित. २६–२७.
निगूढ—गुप्त, सुरक्षित. २६–७५.
निघात—आघात. ३८–८६.
निघोट—संपूर्ण. ३१–१७.
नियोगी—अधिकारी. २८–६०.
निराळ—आकाश. २८–७१.
निरुढी—लोकाचारांत, बाह्यतः. ३४–८१.
निरूतें—खरोखर, निश्चयानें. ३८–६८.
निर्गम—बाहेर जाणें. ३६–२५.
निर्जरसरी—देवनदी. २८–५१.
निर्वाळणें—चकचकीत करणें. ३१–१३.
निवटणें—नष्ट करणें. ३५–८१.
निवातकवच—राक्षसाचें नांव. २७–२०१.
निवेदणें—अर्पण करणें. २९–११६.
निशाण—रणभेरी, डंका. ३२–५.
निशैल्य—निःशल्य, निष्कंटक. २९–१०१.
निष्कच—केस नसलेला. ३७–८०.
निष्टंक—निश्चयात्मक. ३१–११८.
निष्ठणें—निसटणें. २७–१७९.
निस्तरणें—दूर करणें. ३६–१९.
नीर—पाणी. ३६–२३.
न्यामक—नियामक. २८–६०.
न्याहा—ध्वनि. ३१–१००.
पंचानन—सिंह. २९–५.
पटकुल—रेशमी वस्त्र. २९–७४.
पडखळणें—हल्ला करणें. ३२–६२.
पडताळणें—प्रचीति पाहाणें. ३०–२६; हातांत घेणें, पेलणें. ३७–२१.
पडदणी—स्नान करतेवेळीं नेसण्याचें लहान वस्त्र. २९–७४.
पढियंती—आवडती. २६–७३.
पयोधर—स्तन. २८–१६.
परमेष्ठी—ब्रह्मदेव. २७–१२८.
परावा—परका. २७–१३७.
परिक्रीत—रेतमूल्य देऊन परपुरुषापासून स्वस्त्रीस झालेला पुत्र. २७–८८.
परिग्रह – कुटुंब, परिवार. २८–४३.
पारिसर—जवळचा भाग. ३०–७.
परिहार—निवारण. ३४–२.
पळिपणें—जळणें, पोळणें. २९–११७.
पाकशासनी—अर्जुन. ३१–१३७.
पांग—ताबेदारी, यातायात. २७–२२.
पाचारणें.—बोलावणें २७–३२.
पाठार—पर्वताच्या शिखरावरील पृष्ठभाग. २६–४८.
पाड—तुलना, बरोबरी. २८–१२१.
पाणिचोर—चांचे. ३१–५९.
पाथर—दगड. २९–१७.
पादरक्षा—वहाण. ३४–८.
पारपत्य—देखरेख, व्यवस्था. ३५–११६.
पारिखा—परका. ३८–४३.
पार्थिव—राजा. ३०–९१.

पालव—पदर. ३५-८५.
पालाणणें—तयार ठेवणें, सज्ज करणें. २९-६५.
पिंगळा—पक्षिविशेष. ३६-५७.
पिंडिका—गोळा. ३५-१३४.
पिशित—मांस. ३४-५३.
पीन—लठ्ठ, पुष्ठ. ३४-४७.
पुराराति—शंकर. २७-१८१.
पुरोडांश—होमद्रव्य. ३१-१६९.
पुष्कर—कमळ. २८-९.
पुष्कराज—एक रत्न. ३१-१८.
पुष्टी—पाठ. ३०-९९.
पुंसवन—पत्नी गरोदर असतां तिला मुलगा व्हावा म्हणून दुसऱ्या किंवा तिसऱ्या महिन्यांत करण्यांत येणारा एक विधि. २७—९६.
पृथा—कुंती. ३७-६०.
पेरोज—रत्नविशेष. ३१—१८.
पेलणें—हाकलणें, दामटणें. २९-७०.
पेसी—फाक, तुकडा. २६-६६.
पेह्य—पिण्याजोगें. २९-६०.
पोत—नौका. २९-७१.
पौनर्भव—स्त्रीला दुसऱ्या विवाहापासून झालेला पुत्र. २७-८८.
पौलोमी—शक्राची स्त्री. २६-१२.
प्रणीत—स्वस्त्रीच्या जागीं थोर पुरुषाच्या अनुग्रहापासून झालेला पुत्र. २७-८८.
प्रत्युत्थान—उत्थापन. ३१-२७.
प्रपास्थान—पाणपोई. ३५-३१.
प्रवाळ—पोवळें. २६-२६.
प्रस्थान—प्रयाण. ३२-४.
प्रस्थावो—प्रसंग. ३८-१४.
प्रज्ञाचक्षु—धृतराष्ट्र. २६-५३.
प्राकृत—सामान्य माणूस. ३६-८.
बचनाभी-बचनाग, एक विषारी मुळी. ३४-७९.
बद्धकक्षा—वस्त्रानें झांकलेली आहे कांख ज्यांची ते. ३१-३०.
बद्धगोधांगुलीत्राण—गो आणि अंगुली-त्राण ज्यांनीं बांधलीं आहेत ते. पहा-गोधा. ३१-३०.
बभ्रु—मुंगुस. ३४-७३.
बस्त—बकरा. २९-१९.
बहुवस—पुष्कळ. २६-१०.
बहुसाल—फार. ३८-५३.
बळियाढा—वीर. २६-९९.
बादरायण—व्यास. ३७-१०५.
बाहा—दंड, हात. ३४-६१.
बाळकेळी-बालक्रीडा. २८-१२३.
बीजें—गमन. ३०-२१.
बुंथी—पांघरूण. ३५-१४३.
भणग—दरिद्री. ३०-९१.
भद्रजाती—गजेंद्र. २६-४९.
भद्रासन—सिंहासन. ( कल्याणप्रद असें ). ३०—८०.
भर्जित—भाजलेलें. २९-५८.
भाग्याथिला—भाग्यवान. २८-७४.
भाजा—भार्या. ३७-१४.
भाणवस—स्वयंपाकी. २९-६१.
भारद्वाज—द्रोण. ३०-२३७.
भार्गवाचार्य—सूर्य. ३६-६८.
भावणें—मानणें. ३०-२०.
भिंडिमाळ—गोफण. ३१-६०.
भूर्ज—वल्कल, झाडाची साल. २७-३२.
भेंड—लवकर पेट घेणाऱ्या लांकडाचें एक झाड. ३५-५४.

भेरी—नगारा. ३२-४.
भोळीव—भोळेपण. ३५-१४३.
मखर—मकर (?). ३१-५८.
मघवा—इंद्र. २६-१२.
मंडक-मांडा. २९—८३.
मन्मथ—काम. २६—१०१.
मराळ—हंस. ३६—७७.
महेंद्रजाळ—नजरबंदीची विद्या.२८-७१.
माग—मार्ग. २७-१०४.
माज—मध्य, कंबर. ३८-८४.
मांदी—समुदाय. २९-१०३.
माधवी—मधुमालती. २७-१७५.
मिनणें—प्राप्त होणें. २९-१२९.
मुक्त—मोतीं. २६-४.
मुंज—गवत. ३५-५४.
मुरडणें—पिरगाळणें, हस्त फिरवून नापसंती दर्शविणें. २७-१२६, ३५-६.
मुक्ष—मुख्य. ३२-२४, ३५-३.
मेदिनी—पृथ्वी. ३१—८४.
मैंद—ढोंगी, दांभिक. ३५-१२६.
मोद्ळा—गोळा. ३०-१८०.
मौळ—शिखर. ३७-३५.
याम—प्रहर. ३६-१३४.
याम्यदिशा—दक्षिणदिशा. ३६-६३.
युक्ष—इक्षु, ऊंस. २९-९०.
यूथ—कळप. २७-१.
येळापत्र—सर्पाचें नांव. २९-११५.
रक्ताक्ष—तांबडे डोळे असलेला. ३७-७९.
रजत—रुपें. २८-९८.
रश्मी—लगाम. ३१-१६७.
रहंवर—रथ. ३१-४०.
राणीव—राज्यपद. ३४-१००.
रातणें—रमणें, अनुरक्त होणें. २६-४९.
रुख-वृक्ष. ३३-२९.
रुण—ऋण. ३०-२०२.
रुषेश्वर—ऋषेश्वर. २७-३२.
लंबोष्ट्री—लांब ओठांचा. ३७-७९.
लवडीसवडी—तांतडीनें. ३४-५१.
लाक्षा—लाख. ३५-५५.
लेखा—पर्वा. २९-४१.
लेह्य—चाटून खावयाचें. २९-६०.
वक्त्र—मुख. ३०-१११.
ववणें—जाणें. २८-५.
वटक—वडा. २९-८२.
वत्सनाभिनाग—बचनाग, एक प्रकारचें विष. २९—६२.
वयसा—वय. ३७-३.
वरवाळणें—नाउमेद होणें. ३२—४०.
वरान्न—वरण. २९-८३.
वर्म—चिलखत, कवच. ३०-१६७.
वंश—वेळू. ३०-१७४.
वसा—चरबी. ३५-१३४.
वसुमती—पृथ्वी. ३०-६७.
वहिला—लवकर. ३०-९३.
वळंघणें—चढणें. २७-४१.
वागस्तंभ—मुखस्तंभिनी विद्या. ३०-१८७.
वाजणें—प्राप्त होणें, थडकणें. २९-१४८.
वाटिव—पराक्रम. ३१-४५.
वाड—अधिक. ३०-९४; मोठें. ३४-४.
वानी—नमुना, मासला. २९-८७.
वामी—वाममार्गी. ३६-७३.
वारण—हत्ती. ३२-४८.
वावो—अवकाश, अवसर. ३२-२१.

वासरमण—सूर्य. ३६–१०४.
वाह्नो—वाव. ३२–६९.
वाळणें—बाजूला सारणें, कमी करणें. ३५–९.
वाळव्यजन—चवरी. २९–६६.
विखंडणें—उध्वस्त करणें. ३६–६४.
विचुंवु—बुचकळा. ३०–१०८.
वितान—छत. २९–५३.
विंदाण—लीला. २८–१४.
विद्रुम—पोवळें. २६–२८.
विभांडणें—नाश करणें. ३२–५०.
विलग—विपरीत. ३१–१३५.
विशीर्ण—म्लान, उतरलेलें. ३१–१४५.
विषम—संकटयुक्त. २९–१५३.
विषाण—शिंग. ३१–९६.
विहित—उचित, योग्य. २७–११६.
वीचि—लाट. ३६–१०५.
वीरबाह्नो—योद्धा. ३३–२०.
वीरवाट—पराक्रमी. ३१–९, ३६–१३२.
वैडुर्य—एक रत्न. २६–२७.
वोखटें—वाईट. ३५–१३.
वोज—मार्ग. २६–६२.
वोडण—ढाल. ३१–४१.
वोडवणें—पुढें करणें. २९–१३५.
वोढें—उट्टें. ३८–८१.
वोथर—घबराट, भय. ३८–५६.
वोप—चकाकी. ३५–५६.
वोपणें—देणें, अर्पण करणें. २६–११९.
वोरंग—बेरंग. ३१–११०.
वोसंग—मांडी. ३०–१८.
वोळकंबणें—लोंबकळणें, लटकणें. ३६–५४.
वोळगणें—आश्रय करणें. २६–२२.
व्यवधान—अडचण, अडथळा. २७–१६४.
व्यसन—संकट. २९–११४.
व्याज—निमित्त. ३६–१३९.
शची—इंद्रपत्नी. ३७–८७.
शतघ्नी—तोफ. ३०–१६६.
शफरी—एका माशाचें नांव. २९–१७२.
शाक्त—शक्तिपूजक. ३६–८०.
शातकुंभ—सोनें. २६–६.
शार्दुळ—व्याघ्र. ३०–२१९.
शाल्मली—सांवर, राळ. ३५–१३४.
शाल्योदन—साळीचा भात. २९–८२.
शावक—बच्चा. २८–१.
शिल्पिक—कारागीर. ३०–२४३.
शिस—शीर्ष, डोकें. ३८–९०.
शुशुमार—सुसर, मगर. २९–७७.
शोधणें—शुद्ध करणें, घांसणें. ३४–३७.
श्मश्रु—मिशी. ३१–१७१.
शृंगाळ—शृगाल, कोल्हा. ३४–४७.
श्रांतला—श्रमलेला. ३०–६३.
श्रोत्रिय—वैदिक. ३०–८८.
संकर्षण—बळराम. ३३–५.
संगी—बरोबरचा, स्नेही. २७–३५.
सत्रागार—अन्नछत्र. ३५–३१.
सत्राणें—सर्वशक्ति एकवटून, जोरानें. ३७–३०.
संभ्रम—आदर, प्रेम. २६–१२.
सरी—नदी. २८–५१.
सर्पिष—तूप. ३५–५५.
सवंचोर—बाहेरून सभ्य दिसणारा चोर. ३५–१२९.
सव्य—डावा. ३७–८८.
सहस्रनेत्र—इंद्र. ३०–१६.

सहोढ—माता गर्भवती असतां तिचा विवाह होऊन तिजपासून झालेला पुत्र. २७-९०.
साजीव—टवटवीत. ३१-१०८.
साटोपें—आवेशानें. ३१-३९.
सादवणें—बोलावणें. २७-१७५.
साबरें—ताटवा, कुंज. २९-५१.
सार—साय, सत्त्व. २९-८४.
सारंग—मृग. २७-७.
सावचित्त–सावधान, लक्षपूर्वक. २७-२३१.
सावित्र—कर्ण. ३१-१३७.
साक्षेप—निष्ठा, उद्योग. ३०-१७५.
सिंगण—वर उडवून देणें. ३१-५२.
सिब्री—शिवि राजा. २७-२००.
सिसाळ—शीर, मस्तक. ३७-२५.
सीत—धनुष्याची दोरी. ३०-२०४.
सुबळात्मजा—गांधारी. २६-६२.
सुढाळ—सुरेख. ३१-२०.
सुभग—सुंदर, भाग्यशाली. ३१-७४.
सुरकवडी—एक खेळ. २९-८.
सुरवाडणें—सुकाळ असणें, पोषण होणें. २९-१.
सूणें—घालणें. २९-४६.
सूदणें—घालणें. २६-७१.
सेखीं—शेवटीं. ३५-१४४.
सैंधव—जयद्रथ. २९-२८.
सोस—हांव, हव्यास. ३२-२८.
सौदामिनी—वीज. ३१-८१.
सौवळी—गांधारी. २६-६७; शकुनि. २९-३६.
सौर—सूर्योपासक. ३६-८०.
स्कंद—खांदा. २६-५.
स्थविर—वृद्ध. २८-५९.
स्वयंजात—स्वस्त्रीच्या पोटीं स्ववीर्यापासून जन्मलेला. २७-८८.
स्वक्षेत्र—स्वस्त्री. २७-९१.
स्वाड—शुभ, चांगला. ३५-१०७.
स्वेदित—वाफ देऊन शिजविलेलें. २९-५८.
हडबडणें—गोंधळून जाणें. ३२-६.
हरळ—खडा, दगड. ३६-१२६.
हव्यवाट—अग्नि. २८-९४.
हळवट—हलका, हीन. ३१-१४९.
हळुवट—हलका, क्षुद्र. ३८-५८.
हाकारणें—बोलावणें. २७-२९.
हातवसणें—हातांत घेणें, उगारणें. ३४-८५.
हुताश—अग्नि. २७-९६.
हुताशन—अग्नि. २७-२०१.
हेळणा—अनादर, हेटाळणी. ३०-२०९.
होड—पैज. २९-७.
क्षत्ता—विदुर. २९-१४५.
क्षाळणें—धुणें. ३०-१९७.
क्षिती—पृथ्वी. २८-१.
क्षेत्री–क्षत्रिय. ३०-५९.
क्षेवणिणें—रेखणें, लावणें. ३१-१६.
ज्ञातिरेत—अनेक बंधु पुत्रहीन असतां त्यापैकीं एकास पुत्र होऊन त्यामुळें सगळे भाऊ पुत्रवंत ठरतात असा मुलगा. २७-९०.

REFBK-0009093

REFBK-0009093

# शुद्धिपत्र

( पहिला आंकडा पृष्ठाचा; दुसरा ओळीचा. जाड टाईपांतील पाठ संहितेंतील आहेत. )

| पृष्ठ-ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ५५७-२० | उर्मी | ऊर्मी |
| ५६५-१८ | प्रमभरित | प्रेमभरित |
| ५६९-४ | **क्रीडिज**[५] | **क्रीडिजे**[५] |
| ५७२-१६ | ५ आति° | ५ आति |
| ५७३-५ | **वेराग्य** | **वैराग्य** |
| ५७६-२४ | ३ व्या | ४३ व्या |
| ५७७-५ | **ताम्ररज सुवर्णभूमिका**[१] | **ताम्ररजत-सुवर्ण-भूमिका**[१] |
| -१० | तृ प्ति | तृप्ति |
| ५९१-११ | **मंत्राचें**[१] | **मंत्रांचें**[१] |
| ६११-५ | **नगराबाहरी** | **नगरा-बाहेरी** |
| ६४१-२९ | पुं मु | पु मुं |
| ६४३-१ | **पालाणूनि अनक** | **पालाणूनि**[१] **अनेक** |
| ६४४-१५ | ।न | नि |
| ६४७-४ | **काय** | **काय**[४] |
| ६५१-२८ | आ | औं |
| ६५६-७ | **गुरुच** | **गुरूचें** |
| ६५८-१२ | **सांगों** | **सांगों**[७] |
| -२३ | पु. | पु |
| ६६९-१ | **सुमुहुतें**[१] | **सुमुहुर्तें**[१] |
| -२९ | खवग | खवर्ग |
| ६७२-७ | **चड**[२] | **चेंडु**[२] |
| ६७७-५ | **त्यातें** | **त्यांतें** |

| पृष्ठ-ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ६७८-७ | **ऐकें** | **ऐकें**[१] |
| ६८७-२० | घोस तं; | घोस मुं; |
| -२५ | आ | औं |
| ६८९-६ | **पूजूनी**[२] | **पुजूनी**[२] |
| ६९२-२७ | आ | औं |
| ६९३-१७ | हें | (+) हें |
| ६९४-१३ | इडपार्डी | इडेपार्डी |
| -२३ | नि; | नि, |
| ६९७-६ | **मेदनीं** | **मेदिनीं** |
| ७०१-३ | **कर्णाविद्या-वधूची** | **कर्णविद्या-वधूची** |
| ७०६-२० | **अभीसेचींन** | **अभीसेचीनं** |
| ७१२-२१ | मु | मुं |
| ७१३-८ | **जिंणोनि**[३] | **जिणोनि**[३] |
| -१४ | **वाद्यें लागलीं**[१] | **वाद्यें**[१] **लागलीं** |
| ७१४-६ | **द्रुपदात** | **द्रुपदातें** |
| ७१६-१० | **तया**[३] | **तयां**[३] |
| ७१७-१२ | **पांचाळ-राज** | **पांचाळ-राज**[७] |
| ७१९-१ | **मदोद्काच** | **मदोदकाचे** |
| -१८ | आ | औं |
| ७२१-२८ | यानंतरें; | यानंतरें मुं; |
| ७२२-९ | **तजोराशी** | **तेजोराशी** |
| -१२ | **वेळ** | **वेळा** |

| पृष्ठ-ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| ७२२–१४ | तयाच्वि | तयाचि[3] |
| ७२३–११ | यक | येक |
| ७२७–५ | वग्त्र | वग्त्र[2] |
| ७३०–११ | तथति[1] | तथैति[1] |
| ७३१–२ | उगवला | उगवला[4] |
| ७३९–१९ | तान्हेल्य | तान्हेल्यां |
| ७४५–१ | पोटीं | पोटीं[3] |
| ७४६–३० | अपायमार्ग | ३ अपायमार्ग |
| ७५१–७ | मिळावें | मिळावें[1] |
| ७५७–३ | सणकाठिया | सणका-ठिया[6] |
| ७५८–२१ | क | कैं |
| ७६१–८ | बांधले[3] | बांधलें[3] |
| ७६४–२३ | आ | औं |
| ७६६–२० | नागर | नागर नि; |
| ७६८–१३ | गृही[1] | गृहीं[1] |
| ७७०–५ | पारधीच | पारधीचें |
| ७७९–७ | माद्रिकुमर | माद्रीकुमर |
| ७८४–४ | संसार-स्वमीचे | संसार-स्वमींचे |
| ७८७–२ | रक्षिल | रक्षिलें |
| ७९२–२८ | हिडिंत्रा° | हिडिंबा |
| ७९६–९ | उभय मुखींच्यां[2] | उभय-मुखींच्या[2] |
| ७९८–२८ | त | तं |
| ७९९–६ | येकट | येकट[4] |
| ८००–१७ | पु नां पु गो; | पु नां मुं गो; |
| ८०१–४ | नमस्करूनि | नमस्कारूनि |
| ८०५–२ | अवलो-कीत[2] | अवलो-कीत[3] |
| –१६ | जोडला | जोडला[6] |
| ८०८–१७ | साक्षात् | ३ साक्षात् |

... ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७९...
... ग्रंथ
..नगर
ता.
मि:
दि: ..........

# मराठी संशोधनमंडळाचें संशोधन व प्रकाशन

**मुक्तेश्वरकृत महाभारत—आदिपर्व**-खंड १, २ व ३ (१ ते ३८ अध्याय)– चार खंडांत आदिपर्व पूर्ण होईल. प्रत्येकीं
किं. रु, ५–०–०

**महाराष्ट्रभाषेचें व्याकरण**–देशी भाषांतील देशी भाषेचें पहिलेंच म्हणजे १८२४ च्या सुमारास पंडितमंडळानें तयार केलेलें दादोबांच्या मोठ्या व्याकरणा (१८३६) पेक्षांही मोठें. साधी प्रत किं. रु. ४–०–०
वाचनालय प्रत किं. रु. ५–०–०

**मराठी दोलामुद्रितें** अर्थात् इ. स. १८६७ अखेरपर्यंतच्या मुं. म. ग्रंथसंग्रहालयांत असलेल्या मराठी मुद्रित ग्रंथांची वर्णनात्मक नामावलि. ( विस्तृत प्रस्तावनेसह ). किं. रु. १–०–०

**Shala-Paddhati** (मोल्स्वर्थ यांनीं १८२४ सालीं प्रथम मराठींत तयार केलेल्या 'अप्राप्य' पुस्तकाचें त्याच सालीं झालेलें गुजराती भाषांतर. प्रियोळकरांच्या विस्तृत इंग्रजी प्रस्तावनेसह ).
( शिल्लक नाहीं ) किं. रु. १–८–०

**मराठींतील आरंभींच्या क्रिस्ती दौत्रिनी.**
( सोळाव्या–सतराव्या शतकांतील ). किं. रु. १–०–०

**Gramattica Marastta** (इ. स. १७७८ मध्यें रोम-मध्यें पोर्तुगीज भाषेंत मुद्रित झालेल्या मराठी व्याकरणाचें इंग्रजी भाषांतर. विस्तृत प्रस्तावनेसह ). किं. रु. २–०–०

**सांतु आंतोनिची जीवित्वकथा** ( एका पोर्तुगीज पाद्रीनें रचलेला व १६५९ सालीं मुद्रित झालेला मराठी ओवीबद्ध भक्तविजय. पुणें येथील बिशपांचा पुरस्कार व प्रियोळकरांची प्रस्तावना यांसह ).
किं. रु. २–०–०

**गोष्टीशतक व दोनशें सुंदर गोष्टींपैकीं कांहीं**
( मराठी लघुकथेचें आद्य स्वरूप ). किं. रु. १–०–०

**तुकाराम–वाङ्मय** (तुकारामाच्या व तुकारामावरील मुद्रित वाङ्मयाची यादी. ह. भ. प. सोनोपंत दांडेकर यांच्या प्रस्तावनेसह ).
किं. रु. १–०–०

**अमृतानंदविरचित योगराजटिळक** ( श्री. दत्तसांप्रदायाचा ग्रंथ. प्रा. रा. द. रानडे यांच्या पुरस्कारासह ). किं. रु.१–४–०

पत्ताः—**डायरेक्टर**, मराठी संशोधनमंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाकुरद्वार, मुंबई २.